विषारी वारसा

समर्थ - कथा

नारायण धारप

साकेत प्रकाशन

विषारी वारसा

समर्थ - कथा

नारायण धारप

साकेत प्रकाशन

विषारी वारसा

समर्थ - कथा

नारायण धारप

विषारी वारसा
समर्थ - कथा
नारायण धारप
प्रकाशक
साकेत बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
115, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - 431 005,
फोन- (0240)2332692/95.
पुणे कार्यालय
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
ऑफिस नं. 02, 'ए' विंग, पहिला मजला,
धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, 373 शनिवार पेठ,
कन्या शाळेसमोर, कागद गल्ली, पुणे -411 030
फोन- (020) 24436692

Table of Contents

विषारी वारसा

आम्ही आत पाऊल टाकलं आणि दारापाशी पडलेली ती चिठी आम्हाला दिसली. घडी करून कोणी तरी दाराखालून आत सरकवली होती. मी तो कागद उचलला. त्याच्या घड्या उलगडल्या. पेन्सिलीने काही तरी मजकूर घाईघाईने लिहिला होता. उभ्याउभ्याच लिहिला असावा अशी शंका येत होती.

“समर्थ, मी दोन वेळा येऊन गेलो, आपली गाठ पडली नाही. आज रात्री नऊच्या सुमारास येत आहे. कृपया माझ्यासाठी घरी थांबा. आपली गाठ पडणं फार फार महत्त्वाचं आहे. आपला-विजय पोतदार.”

“नऊ वाजता, अं?” समर्थ म्हणाले, “म्हणजे आता यायची वेळ झालीच आहे. दोन-तीन मिनिटंच कमी आहेत नऊला. त्याचीही कॉफी टाक.”

बरोबर नऊला दारावरची घंटी वाजली आणि विजय पोतदार आत आला. वयाने सुमारे पस्तीशीच्या आसपास. किरकोळ अंगयष्टीचा माणूस. समर्थांना पाहाताच त्याने एक खूप मोठा उसासा टाकला.

“आहात का? मला शंका होती आता तरी भेट होतीय का नाही-”

त्याचा आवाजही सामान्य होता. आता भावनेच्या किंचित ताणाखाली आलेला.

“या ना, या, बसा. दोनदा येऊन गेलात वाटतं?”

“अहो-अहो! हे कशाला?” मी कॉफी आणताच तो म्हणाला.

“घ्या हो. आमचीही व्हायचीच होती-” समर्थांनी कप घेतला. माझा असा अनुभव आहे की या कॉफी-कार्यक्रमात भेटायला आलेले लोक बरेच स्वस्थचित्त होतात. काय सांगायचं आहे याची त्यांना संगतवार जुळणीही करता येते.

“आज रात्री तुम्हाला वेळ आहे का, समर्थ?” विजय म्हणाला.

“अजून तुम्ही काहीच सांगितलेलं नाही.” समर्थ हसत म्हणाले.

“आणि मी काही सांगणारही नाही-” विजय आमच्याकडे पहात होता. आमचे आश्चर्य त्याला अपेक्षित होते. घाईने हात वर करीत तो म्हणाला,

“तुम्ही माझ्याबरोबर चला, तुमचा अनुभव काय येतो ते पहा .. कारण मला कशाचीच खात्री वाटत नाही. काय खरं, काय खोटं हे कळेनासं झालं आहे.”

“मला तुम्ही सांगितलं असतं तर बरं झालं असतं--पण मी आग्रह करीत नाही. आपण असं करू-तडजोड करू. मी अप्पाला तुमच्याबरोबर पाठवतो, कोठे न्यायचं असेल ते त्याला न्या-मग आपण पाहू.”

विजयला ती कल्पना फारशी पसंत पडली नाही. (आणि मलाही नाही!) पण उघड नकार देण्याइतका शिष्टपणा त्याच्यात नसावा. शेवटी दहाच्या सुमारास मी या विजय

पोतदारबरोबर निघालो.
पुढे काय होणार आहे यावर चर्चा अर्थात वर्ज्यं होती. तेव्हा मग संभाषणाला विषय फारच मर्यादित होते. आणि विजयही त्याच्याच कोणत्या तरी विचारात मग्न झाला होता. तेव्हा वाटेत बोलणं असं झालंच नाही. आम्ही शेवटी ज्या घरापाशी आलो ते घर मध्यवस्तीतच होतं, पण आसपासच्या सर्व वस्तीपासून अगदी संपूर्ण अलग होतं. प्रवेशद्वार गजबजलेल्या हमरस्त्यावर होतं, पण बाहेरच्या जगाचा संपर्कही आत पोचत नव्हता. कारण रस्त्याच्या कडेने एक उंचच्या उंच भिंत होती. आम्ही तेथे पोचलो तेव्हा दहा वाजले होते. रस्त्यावरची रहदारी बरीच मंदावली होती. मोठे दार विजयने किल्लीने उघडले आणि आम्ही आत जाताच त्याने दार आमच्यामागे लावून घेतले.
आत सर्वत्र शांतता होती. मधे बरेच मोठे अंगण सोडून मग पुढे दुमजली जुन्या बांधणीचे घर होते. पायाखाली फरशीची वाट होती, दोन्ही अंगांना झाडं होती. बकुळी, चाफा, आंबा, शेवगा ...जशी मनात येतील तशी लावल्यासारखी वाटत होती. बंगल्याच्या दारावर एक लहान दिवा जळत होता. त्याचा प्रकाश अगदीच अंधुक होता. त्या अर्धप्रकाशात या झाडांच्या आकृया काळ्या ज्योतीसारख्या दिसत होत्या.
वाटेवरून आम्ही पुढे निघालो. विजयने बंगल्याचे दार उघडले आणि आत जाऊन दिवा लावला. पहिली खोली हॉलसारखी होती. थोडेसेच पण नेटके आणि सुबक फर्निचर होते. दोन्ही हातांना दोन दोन दारे होती. विजय एकामागून एक सर्व खोल्यांतून गेला आणि त्याने सगळे दिवे लावले. आणि मग तो म्हणाला,
“अप्पा, आता वर या.” त्याचा आवाज जरासा चमत्कारिक झाला होता. डोळ्यांतही एक नवीच चकाकी आली होती. मी त्याच्या मागोमाग निघालो. एका खोलीतून वर जायचा जिना होता. वरच्या दिव्याचे बटण खालीच होते. ते दाबून त्याने दिवा लावला आणि आम्ही वर गेलो.
वरचा मजला खालच्याचीच हुबेहुब नक्कल होती. पण येथेच दोन्हीतलं साम्य संपत होतं. खालचा नेटकेपणा येथे नव्हता. सर्वत्र धूळ पसरली होती. एक प्रकारचा कुबट वास येत होता. हवा कुंद झाल्यासारखा. विजय पुढे चालला होता, सर्व खोल्यांत दिवे लावत होता, पण त्याची पावलं आता कचरत पडल्यासारखी वाटत होती. प्रत्येक खोलीच्या दाराशी तो एक पळभर थांबे, मग खांदे उभारून आत पाय टाकी...
वरचा सर्व मजला संपूर्ण रिकामा होता. मी खोल्यांचं वर्णन करीत बसत नाही. धूळ, कोळीष्टकं, पाखरांनी आणलेल्या गवताच्या बारीक काड्या.... ओसाड घराचं एक

मूर्तिमंत चित्र, आणि केवढा विरोधाभास!
"पाहिलंत ना सगळं? आता चला खाली." विजय म्हणाला.
"दिवे नाही मालवत?" तो खाली निघालेला पाहून मी विचारलं.
"दिवे? अं...राहू देत-" त्यानं जास्त स्पष्टीकरण केलं नाही. आम्ही
खाली आलो, हॉलमध्ये समोरासमोर बसलो. मी मनाशी ठरवलं होतं की विजयला आपण होऊन काहीही विचारायचं नाही; त्याला काय सांगायचं असेल ते सांगू देत. (किंवा काय लपवायचं असेल ते लपवू देत!)
"अप्पा, तुमची झोप कशी काय आहे? सावध आहे का?"
"चारचौघांसारखीच. फारशी सावध आहे असं मला वाटत नाही-"
"मग आज तुमच्या खोलीचं दार उघडच ठेवा. रात्री कदाचित् मला तुम्हाला जाग आणावी लागेल-" (हा पहिलाच, ओझरता असा निर्देश!)
"ठीक आहे; जसं तुम्ही म्हणाल तसं-" मी बेफिकीरपणाने म्हणालो, आणि आम्ही झोपायला उठलो.
त्याच्या शेजारच्या खोलीतच त्याने माझी व्यवस्था केली. कापडचोपड पाहून एकेकाळी या घरात बरीच माणसं राहत असावीत असा तर्क होत होता रात्री निरोप घेताना तो दारापाशी एकदोन सेकंद घुटमळला; काही तरी बोलायचा त्याचा विचार असला तर त्यानं तो बदलला. "अच्छा!" एवढंच म्हणून 'तो गेला; जाताना त्यानं दार लोटून घेतलं.
मी खोलीतलं सामान नीट पाहिलं. सामान जुनं होतं, पण उत्तम बनावटीचं होतं. एक प्रशस्त छप्परपलंग; काळ्याभोर लाकडाचं उत्कृष्ट नक्षीकाम केलेलं एक उंच कपाट, दोन लहान टेबलं, एक आरामखुर्ची; सगळं कस चक्क होतं. खाली मऊसर गालिचा होता. दोन उंच खिडक्या बाहेरच्या बागेत उघडत होत्या. मी त्या उघडून टाकल्या. हवेत जरासा गारवा होता, पण खिडक्या लावून घेण्याइतका नाही.
मोठा दिवा बंद करताच आपोआप एक लहान रातदिवा लागला. मंद पिवळा प्रकाश. एखाद्या मेणबत्तीच्या शामदानासारखा. आणि तोच प्रकाश या खोलीला साजेसा दिसत होता. पूर्वीचे मंद रंग त्या पिवळसर प्रकाशात कसे उजाळल्यासारखे दिसायला लागले. खोलीत मनाला एक प्रकारचं समाधान वाटत होतं. पूर्वी ही खोली कोणी वापरली असेल ती असो, खोलीवर समाधानाचा एक ठसा उमटला होता. बाहेरचं जड जग आपल्याला वाटतं तितकं उदासीन नाही, माणसाच्या बऱ्यावाईट भावनांचा ठसा त्याच्यावर जरूर उमटतो, निदान माझा. विश्वास तरी असा आहे.......

झोपेचा विचार मनाला शिवतही नव्हता. ज्या एका खास कारणासाठी मी या अपरिचित वास्तूत आलो होतो, त्यामुळे तर मनाला एक वेगळीच जागरूकता होती. समर्थाकडे विजय कशासाठी आला असावा? आम्हाला काहीही सांगायचं त्यानं का नाकारलं? आजवर असा अनुभव आम्हाला कधीही आला नव्हता. विजयबद्दल माझं मत असं झालं होतं की तो एक सुजाण, विचारी, संयमी स्वभावाचा माणूस आहे. तसा तो भेदरट किंवा छांदिष्ट वाटत नव्हता. येथे खरोखरच असं काही तरी घडलं असलं पाहिजे की त्यामुळे तो इतका अस्वस्थ झाला होता.

विचार करायचा नाही म्हटलं तरी मनाला कोण आवर घालू शकणार? नाना वाटांवरून कल्पना धावायला लागल्या. आणि मी विचारांना आवर घालायचा प्रयत्न केला नाही. एक तर तो निष्फळ ठरला असता आणि मनावर विनाकारण ताण मात्र आला असता. त्या पेक्षा मनाला आसपासच्या वातावरणाशी संवादित होऊ देणंच जास्त फायद्याचं होतं. सुरावर लावलेली तार त्या सुराला जसा पडसाद देते तसं मनही सुसंवादी बनतं, लहानशा प्रेरणेखालीही झंकार करून उठतं.

मनातली विचारांची खळबळ शमली. वारा पडलेल्या वेळी जलपृष्ठ जसा शांत होतो तसं मन शांत झालं. माझी खात्री झाली की निदान या क्षणी तरी माझ्या आसपास अनैसर्गिक असं काहीही नाही. मला झोप लागली.

मला कशानं जाग आली हे समजलं नाही. एका क्षणी मी गाढ झोपेत होतो, दुसऱ्या क्षणी टक्क जागा होतो. सर्व शरीर झणझणत होतं. दृष्टी कशावरच एकाग्र होत नव्हती. केवळ परक्या जागेत जाग आल्याचा हा परिणाम नव्हता; त्याची मला आता सवय झाली आहे. भूकंपात शरीराचा तोल जावा, पायाखाली धरणी गदगदा हेलकावे खावी तसं होत होतं. मी-: समर्थ-विजय....विचार क्षणभर स्थिर होत होता, की लागलीच एक प्रकारच्या मानसिक धुक्यात गडप होत होता. असं काहीच नव्हतं की ज्याच्या आधाराने मन तोल सावरील.....

“अप्पा! अप्पा!” कोणाची तरी अस्पष्ट हाक कानावर आली. भिंतीत एक लख्ख प्रकाशाचा चौकोन उजळला. अजून मी भानावर नव्हतो.

“अप्पा! जागे व्हा!” दारातून कोणीतरी आत येत होतं. आठवण आली. हा विजय. आपण विजयच्या घरी आलो आहोत. काही तरी पहायला. थोडासा तरी उलगडा झाला. सर्व शांत झालं असं नाही, पण या कोलाहलाचा अर्थ तरी समजला. हेच ते! यासाठीच आपण इथे आलो आहोत! मनाला जो आधार हवा होता तो मिळाला. मी कॉटवर सावकाश उठून बसलो.

“अप्पा!” विजय परत म्हणाला.

“ठीक आहे, विजय, मी जागा आहे. आणि मलाही ते जाणवतंय--” विजयने खोलीतला दिवा लावला. त्याचा चेहरा आता स्पष्ट झालाआणि तो एका भेदरलेल्या माणसाचा चेहरा होता. काही क्षण कोणीच काही बोललं नाही आणि त्या शांततेत मला तो आवाज ऐकू आला. आवाज वरून येत होता. वरच्या मजल्यावरून. आणि तसा येणं अशक्य होतं. कारण वरचा मजला संपूर्ण रिकामा होता.
आवाज कोणाच्या तरी संथ पावलांचा होता.
तारेनं खेचल्यासारखा विजयचा चेहरा वर वळला आणि मग त्यानं माझ्याकडे पहात कपाळावरचा घाम बाहीनं पुसला. माझ्याजवळ पोचेपर्यंत विजय काहीच बोलला नाही आणि मग तो हलक्या आवाजात म्हणाला,
“अप्पा, तुम्हाला ऐकू येतंय ना?”
“हो पण-”
“पण नाही. एक शंका तर फिटली. निदान हे भास तरी नाहीत.” माझ्याकडे जरा निरखून पाहत तो म्हणाला, “अप्पा, वर येता? ”
“वर?” मी याची तर खासच अपेक्षा केली नव्हती.
“हो. मी एकदा पाहून आलो आहे-” त्याचं अंग शहारलं. “पुन्हा नाही! जरा भयंकरच प्रकार आहे-आता येता का समर्थांच्यासाठी थांबायचं?”
तो हे प्रांजलपणाने बोलला असेल किंवा मला टोचण्यासाठी असेल, पण परिणाम तोच झाला. मी स्वतःला जरा सावरत म्हणालो, “पाहून येऊ की! नुसतं पाहयला काय हरकत आहे?” मनात आणखीही एक विचार होता. आपण नुसते तटस्थ निरीक्षक राहणार आहोत, हस्तक्षेप करणारच नाही.
“मग चला तर.” विजय आणि त्याच्या मागोमाग मी बाहेर आलो. वरचे सर्व दिवे जळत होते. त्यांचा परावर्तित प्रकाश जिन्यातून खाली ओसंडत होता. मघाचा तो पावलांचा आवाज जरा अस्पष्ट झाला होता. जे कोणी तरी चालत होतं ते डोक्यावरच्या खोलीतून लांब कोठेतरी गेलं असावं...जिन्याच्या पायथ्याशी विजय जरासा घोटाळला आणि मग वर निवाला. मी त्याला फारसा दोष देऊ शकत नव्हतो, कारण माझी पावलंही काही मोठी आत्मविश्वासाने पडत नव्हती.
आम्ही एकदा वर गेलो होतो तेव्हा वरचा मजला संपूर्ण रिकामा होता. तेव्हा आता मध्यानरात्रीच्या वेळी वर कोण किंवा काय वावरत होतं हा मनाला विलक्षण अस्वस्थ करणारा प्रश्न होता, आणि तो मी मोठ्या कटाक्षानं दूर ठेवत होतो. तशी किती तरी साधी आणि नैसर्गिक स्पष्टीकरणं मनासमोर येत होती; पण माझा अनुभव असा होता की शेवटी ती अपुरीच पडतात... सध्या विचार नको होता...

वरच्या खोलीच्या दारापर्यंत आम्ही आलो आणि थांबलो. ती खोली तर प्रकाशित होतीच, पण आसपासच्या खोल्यांतल्या प्रकाशांचे वेडेवाकडे झोत आत येऊन प्रकाश आणखी प्रखर झाला होता. झगझगीत प्रकाशात खोलीतली धूळ आणि अव्यवस्था जास्तच विसंगत वाटत होती. मनावर अपेक्षेचा ताग होता. एखाद्या रंगमंचासारखी उजळलेली ही खोली ... आता यावर कोणतं पात्र प्रवेश करणार आहे? येथे कोणत्या अद्भुत भीषण नाटकाचा खेळ होणार आहे?

मला कशाची कल्पना नव्हती हेच बरं होतं. नाही तर सरळ उभं राहणंसुद्धा मुष्कील झालं असतं. समोरची खोली रिकामी वाटत होती, पण आतल्या आत असं जाणवत होतं की एवढ्यातच तिथे कोणी तरी होतं किंवा येणार आहे... मघाशी अस्पष्ट झालेला पायरव आता पुन्हा कानावर यायला लागला... पावलं आता संथ पडत नव्हती... वेडीवाकडी, गोंधळल्यासारखी, मधे मधे थांबून अशी पडत होती...जणू चालणाराला पुढचं काही दिसतच नव्हतं.... .

अपेक्षेची ती काही मिनिटं माझ्या आयुष्यातील सर्वात वाईट असावीत. मनावर दुहेरी ताण होता. मी स्वतः विलक्षण अस्वस्थ झालो होतो हे तर खरंच, पण विजयबरोबर समर्थांनी मला त्यांचा प्रतिनिधी म्हणून पाठवलं होतं, तेव्हा त्याला धीर देण्याची जबाबदारीही माझ्यावरच होती आणि त्याला धीर तर अगदी आवश्यक होता. कारण तो संपूर्ण भयमीत अवस्थेत होता. दाराची चौकट त्यानं इतकी घट्ट धरली होती की त्याचा हात पांढराफटक पडला होता. डोळे विस्फारून तो समोरच्या रिकाम्या पण प्रकाशित खोलींकडे पाहत होता. पूर्वी एकदा तो वर येऊन गेला होता तेव्हा त्याच्या धैर्याचं मला कौतुक वाटल्याखेरीज राहिलं नाही. अर्थात त्यावेळी त्याला कशाचं ज्ञान नव्हतं. तेव्हा धाडस करणं जरा सोपं होतं, पण वर काय आहे हे माहीत झाल्यावरसुद्धा तो परत एकदा माझ्याबरोबर येथपर्यत आला होता. भीती ही एक नैसर्गिक, संरक्षक प्रतिक्रिया आहे. अविचारीपणाने साहस करणारा माणूस शेवटी प्राणास मुकतो. पण वर काय आहे याची कल्पना आल्यावरही परत त्यासमोर उभा राहाणारा विजय धैर्याचा तर खराच! तिने

पावलं जवळ जवळ येत होती. चालणारा वाटेत कशावर तरी आपटला, . काही क्षण थांबला आणि परत चालायला लागला. उजवीकडच्या खोलीतून तो (किंवा ती किंवा ते!) येत होता. ज्या क्षणी असं वाटलं की आता उत्कंठा असह्य होणार त्याच क्षणी कोणी तरी खोलीत आलं.

अनैसर्गिक असंच काही तरी दिसणार अशी मनाची तयारीच झाली होती. आणि म्हणूनच तो माणूस दिसताच एक लहानसा धक्का बसला. निदान बाह्यतः तरी त्याच्यात अनैसर्गिक असं काहीच नव्हतं.. दारातून तो खोलीत आला तेव्हा त्याची

मान खाली छातीवर वाकली होती. कसल्या तरी गाढ विचारात असल्यासारखी हातांची छातीशी जुडी केलेली होती. वयाचा अंदाज येत नव्हता तरी तो चाळीशीच्या आतलाच वाटत होता. वास्तविक तो इथे असायलाच नको होता. त्याचं अस्तित्व हेच मुळी आमच्या जगावर एक आक्रमण होतं. पण तरीही त्याचा साधेपणा क्षणभर डोळ्यांना फसवीत होता...पण क्षणभरच!

स्थळकाळाची चौकट विस्कळित करून त्यातून निर्माण झालेलं हे दृश्य आपल्याबरोबरच परकेपणा घेऊन आलं होतं. नेहमीच्या जगातलं आणि त्याबाहेरचं असा भेद करणारं जणू एखादं सहावं अदृश्य इंद्रियच आपल्या मनात असतं की काय देव जाणे ... पण त्याच्या आगमनाबरोबरच शरीरात अनंत मार्गांनी प्रतिक्रिया सुरू झाल्या होत्या.

त्याचा स्थळकाळावरचा हा प्रक्षेप हीच विसंगती होती. पडद्याला पडलेली एक सुरकुती होती आणि ती केवळ त्याच्यापुरतीच मर्यादित राहू शकत नव्हती. त्या विसंगतीच्या लहरी आमच्यापर्यंतही पोचत होत्या. मी कोठे तरी वाचलं होतं की सर्व बाह्यसृष्टीचं आपलं ज्ञान हे केवळ काही सूक्ष्म शक्तिकंपनांवरच अवलंबून आहे. आणि येथे तर ती कंपनेच विस्कटत होती....जणू काही सृष्टीवरून एखादा अपारदर्शक डाग सरकत होता, असं म्हटलं तर चूक ठरणार नाही की या खोलीत आता आलेला 'तो' आपल्या भोक्ती आपल्या स्थळकालाचा काही अंश घेऊन आला होता. काही क्षणभर आमच्या डोळ्यासमोरचे आमचे जग विरघळत होते आणि त्या जागी या नवागताच्या जगाचे चित्र उमटत होते. एखाद्या पांढऱ्या प्रकाशाच्या खोलीत कोणी लाल दिवा घेऊन प्रवेश केला की त्याच्या आसपासचा भाग लालसर व्हावा तमंच काहीसं होत होतं.

एवढे सगळे विचार मनात क्षणार्धात येऊन गेल तोपर्यंत समोरच्या त्या माणसाने खोलीत पाचसात पावलंच टाकली असतील. खोलीच्या जवळजवळ मध्यापाशी येऊन तो थांबला. अजून त्याची मान खालीच होती आणि त्याचा चेहरा पाहयची मला संधी मिळाली नव्हती. त्याने छातीवरची हाताची जुडी सोडली, हात एकमेकांत गुंतवून पिळवटले आणि मग ढिलेपणाने खाली सोडले. त्याची प्रत्येक हालचाल अस्वस्थतेची सूचक होती. एक-दोनदा तो स्वतःभोवतीच फिरला आणि मग त्याची मान सावकाश वर झाली ...

इतका हताश, इतका भग्न चेहरा मी आजवर पाहिलाच नव्हता. मनातल्या कोणत्यातरी दुःखाच्या आचेखाली चेहऱ्यावरचे सर्व भाव होरपळून गेल्यासारखे वाटत होते. डोळे सताड उघडे होते, पण ते भावहीन होते. काही क्षण तरी त्याच्या

आगमनातली भयानकता विसरून जाऊन मला त्याच्यासंबंधी एक अस्फुट सहानुभूती वाटायला लागली ...
पाहता पाहता त्याची आकृती धूसर होत होती. त्याच्या बाह्यरेषा किंचित विरघळल्या, मग त्याचे रंग फिकट झाले . . . काही क्षण तर तो एखाद्या वाफाळलेल्या काचेसारखा पारदर्शक अवस्थेत दिसत होता . . . आणि मग तो पारच दिसेनासा झाला. काही तरी बोलण्यासाठी मी विजयकडे वळून पाहिलं. पण तो तसाच ताणलेल्या अवस्थेत दारापाशी उभा होता. गेले काही क्षण त्यानं श्वासही घेतला नसावासा वाटत होतं. तो कशाचा तरी कानोसा घेतः होता. . .काही क्षणांतच त्याचं समाधान झालंसं दिसलं आणि त्यानं ओठावर बोट ठेवून मला गप्प राहण्याची खूण केली व मग सावकाश त्या खोलीत पाय टाकला. एका हातानं त्यानं मला त्याच्या मागोमाग यायची खूण केली.. त्याच्या या अनपेक्षित हालचालीनं माझ्या ओठावरचे शब्द तिथेच जिरून गेले. होते. मी विजय मागोमाग निघालो.
ती प्रकाशित खोली ओलांडताना शरीरावर शहारा आल्याखेरीज राहिला नाही. समर्थांबरोबरच्या अनुभवानं एक गोष्ट मला चांगली माहीत झाली होती. आपल्या डोळ्यांना प्रत्यक्ष असं काही दिसत नसलं तरीही या गूढ शक्तीच्या हालचाली एका जरा वेगळ्या आणि तरल पातळीवर चालूच असतात. . .फक्त आपली नजर त्या टिपण्याइतकी संवेदनक्षम नसते. विजयला हे सांगून त्याच्या मनावरच्या ओझ्यात भर घालायची मला इच्छा नव्हती. तेव्हा मी त्याच्यामागोमाग निघालो.
खोल्यांची रचना खालच्या मजल्यासारखीच होती. उजव्या हाताला (जिथे खाली माझी खोली होती) जी खोली होती तिच्यातूनच मघाचा तो माणूस बाहेर आला होता. त्या खोलीच्या दाराशी विजय क्षणभर घोटाळला. माझ्याकडे त्याने एक तिरकस नजर टाकली आणि मग खांदे जरा सरळ करून तो आत गेला. जवळजवळ त्याच क्षणी मीही आत गेलो. ही खोलीही संपूर्ण रिकामी होती.
तिच्यातूनच पलीकडची प्रकाशाने उजळलेली खोलीही दिसत होती, आणि आता आम्ही दोघं दाराआड थांबतो तेव्हा त्या खोलीतून येणारा एक अस्पष्ट आवाज माझ्या कानावर आला. एखाद्या जाडसर कपड्याच्या सळसळण्याचा तो आवाज होता. जेथे कोणाचाही वावर असायला नको होता, अशा त्या जागेतूनच तो आवाज येत होता. मघाच्या त्या एका दृश्याने येथली ही चमत्कारिक प्रसंगांची मालिका संपली नव्हती तर!
विजय आता मात्र खरा अडखळला. त्याने एकदा हा प्रकार पाहिला होता. त्याला पुढची कल्पना होती. पण शेवटी धीर करून तो पुढे सरकला. दारातूनच त्याने पुढच्या खोलीत डोकावून पाहिलं, त्याचं अंग शहारून एकदम ताठ झालं आणि तो

घाईने एक पाऊल मागे सरला. नाही म्हटलं तरी या सर्व सूचक घटनांचा माझ्याही मनावर खूपच परिणाम झाला होता. पलीकडच्या त्या खोलीत काय असावं या विचाराने माझीही छाती धडधडायला लागली होती. पण आता माघार घ्यायची सोय नव्हती.
मी त्या खोलीत नजर टाकली. आधी मला वाटलं की हीसुद्धा रिकामीच आहे. पण मग कोपऱ्यातली हालचाल नजरेत भरली. खिडकीवर एक मोठा पडदा सोडला होता, तो आता एका बाजूला कोपऱ्याशी ओढून ठेवला होता. तो पडदा सारखा हलत होता. आत कोणी तरी असावं असं मधूनच दिसणाऱ्या फुगीर पण अस्पष्ट अशा मानवी आकृतीमुळे वाटत होतं. पडद्याच्या हालचालीखेरीज इतर काही हलत नव्हतं, आणि कापडाच्या त्या एका सळसळीखेरीज दुसरा कसला आवाजही येत नव्हता.
माणसाच्या मनात कोणत्या तरी क्षणी एक आवर्तनाचा बिंदू येतो. त्याचा सर्व दृष्टिकोन त्या एका क्षणात बदलतो. सर्व घटनांचे परस्परसंबंध एका क्षणात बदलतात. मला वाटतं त्याच क्षणी मला या सर्व प्रकारातला खरा भयानकपणा जाणवला. एका मोकळ्या खोलीत कोणी तरी येऊन गेलं होतं आणि आता तशाच दुसऱ्या मोकळ्या खोलीत पडद्यामागे कोणी तरी धडपड करीत होतं. हे सर्वच किती अनैसर्गिक आणि भयानक आहे याची खरी जाणीव मला त्या एका क्षणात झाली. अंधारातून जाणारा एखादा बेसावधपणे चालत असावा आणि मध्येच एखादी वीज लखाखताच अगदी पायापाशी उलगडणारी खोल आणि भयानक दरी दिसावी तसं माझं झालं. मी स्वतः खूप समजत असेन की या सर्व प्रकारांचा मी एक केवळ निरीक्षक आहे...पण काही घटना अशा असतात की त्यांच्यापासून अलिप्त राहताच येत नाही. त्यांच्या परिघात माणूस आला की तो त्या साखळीत गोवला गेलाच. मी तरी सर्वांपासून सुरक्षित आणि अलिप्त राहीन याचा भरंवसा काय होता?
मनात हे विचार चालले होते, पण नजर मात्र त्या सळसळणाऱ्या पडद्यावर एक प्रकारच्या अघोरी कुतुहलाने खिळून राहिली होती. पडदा आता इतका जोराने हलत होता की असं वाटत होतं, कोणत्याही क्षणी तो आता बरच्या गजासह खालीच कोसळणार....
माझ्या.कोपराला एक जोराचा हिसका बसला. विजय माझा हात जोरजोराने हलवत होता. मी त्याच्याकडे पाहिलं; त्याचा चेहरा अक्षरशः भयानक झाला होता. एका थरथरत्या हाताने तो मला काही तरी दाखवत होता. आमचा उभा राहण्याचा पवित्रा असा होता की त्या खोलीचा काही भाग मला अदृश्य होता, पण तो विजयच्या

नजरेच्या टप्पात येत होता. तिकडेच विजय हात करून उमा होता आणि थरथर कापत होता.
मलाही ती हालचाल दिसू लागली. नजरेच्या आवाक्यात काही तरी येत होतं. संपूर्ण फडक्यात गुंडाळलेलं काही तरी जमिनीवरून सरकत होतं. ती हालचाल एखाद्या रांगणाऱ्या मुलासारखी वाटत होती...जरा अधिक समोर आल्या. वर तर खात्रीच पटली. ते एक रांगतं मूलच होतं. गोंधळ होण्याचं कारण त्याच्यावर एका मोठ्या पिशवीचे आवरण होतं. पिशवी असावी ... नाही, उशीचा अभ्राच होता तो...कारण त्यावरची भरतकामाची वेलबुट्टी आता दिसत होती... डोक्यापाशी (किंवा गळ्यापाशी) अभ्रा आवळला होता.... तरीही तो आकार सावकाश पुढे सरकतच होता. ... त्या हलणाऱ्या पडद्याच्या दिशेनं ...
भीषण तर्क मनात थैमान घालीत होते. मृत्यूच्या काळ्या रंगाने चित्रित केलेल्या या प्रतिमा होत्या. या लहानशा, आंधळेपणाने पुढे सरकणाऱ्या आकाराबद्दलही मनात भयानक शंका येतच होत्या. असं वाटत होतं की कोण्या निघृण हाताने ती पिशवी त्या बालकाच्या डोक्यावर टाकून मधला भाग दोरीने आवळला असावा... शरीर मृण्मय झाल्यावरही एक अंधचेतना काम करीतच होती... डोळे बांधलेले होते याला काय महत्त्व? समजा ते उघडे असते तरी त्या मृत नेत्रांना आता काय दिसू शकले असते? .... अशा या कालबाह्य प्रक्षेपांना साधी ज्ञानेंद्रिये हवीतच कशाला? त्यांना हलवणारी शक्ती वेगळी होती, त्यांच्या प्रेरणा वेगळ्या होत्या, त्यांचे हेतू अकल्पनीय होते...
तो सरपटणारा आकार पडद्याखाली शिरला ... मग अशी एक हालचाल झाली की कोणी तरी वाकून त्याला वर उचललं असावं...नशीब की डोळ्यांना प्रत्यक्ष तो प्रकार पाहवा लागला नाही...
पडद्याच्या घड्या निर्जीवपणे खाली लोंबकळत राहिल्या ... मनात एक खात्री पटली की आता, या क्षणी, पडद्यामागची जागा रिकामी आहे...तेथे जे काही होतं ते निदान आता तरी गेलेलं आहे....
विजयच्या अवस्थेचं मला आश्चर्य वाटलं नाही. कारण माझीही अवस्था फारशी वेगळी नव्हती. हातपाय कापत होते, नजरेला भोवंड येत होती, छातीत धडधड होत होती. समोरची प्रकाशाने उजळलेली खोली कोणत्याही क्षणी स्वतःभोवती गरगरा फिरायला लागेलसं वाटत होतं...
एकमेकांचा आधार घेत आम्ही कसे तरी खाली आलो आणि हॉलमधल्या खुर्च्यांवर कोसळलो. घरात सर्वत्र शांतता होती, पण ही शांतता निर्लेप नव्हती. मोकळ्या शंखात जशी सागराची गर्जना घुमत राहावी तसा त्या शांततेत मघाच्या सर्व

अनैसर्गिक प्रसंगांचा अनुनाद घुमत होता. आम्ही एका अनोळखी प्रदेशाच्या काठावर उभे होतो. तेथले कार्यकारणभाव आम्हाला माहीत नव्हते, घटनांची दिशा माहीत नव्हती, पुढे कशाची अपेक्षा करायची याची कल्पनाही नव्हती. मला वाटतं त्या क्षणी आम्ही दोघं सर्वांत जास्त भेदरलेली माणसे होतो.
“समर्थांना हेच सांगायला तू नकार देत होतास?” मी विचारलं.
“अप्पा, कालच्यापेक्षा आजचा प्रकार जास्तच भयानक होता.” विजय कपाळावरचा घाम पुशीत म्हणाला. “काल हे...हे मूल नव्हते. मूलच होते ना ते?” त्याच्या या प्रश्नाला उत्तराची आवश्यकताच नव्हती. “काल मला तो मनुष्य अस्पष्टसा दिसला आणि आतला पडदा हलताना दिसला...”
“आणि मग? रात्री इतर काही?”
“नाही आणि मी झोपलेलाही नव्हतो. सर्व रात्र जागाच होतो.”
“म्हणजे तुला दोन रात्रीचं जागरण आहे तर! मग तू असं कर, विजय. आता झोप येत असली तर खुशाल झोप. मी जागा राहतो- बहुतेक काही होणार नाही- पण तशी वेळ आलीच तर तुला अवश्य जागा करीन-”
विजयने थोडे आढेवेढे घेतले पण शेवटी तो हॉलमधल्याच एका प्रशस्त दिवाणावर आडवा झाला आणि पाहता पाहता झोपलाही.
तेव्हा मग मी त्या घरात एकटाच जागा राहिलो. मधूनमधून वर लक्ष गेलं तर त्यात आश्चर्य नव्हतं. आणि मनात मागचे अनेक प्रसंग येऊन जात होते. समर्थांबरोबर असताना जवळजवळ असाच एक अनुभव फार पूर्वी आला होता. अर्थात माझ्या अल्पमतीलाच ते दोन्ही प्रसंग समान वाटत होते -मुजूमदारची स्वतःभोवती फिरणारी मृत आकृती! पण त्यामागची कारणे शोधायला समथांचीच तीव्र दृष्टी हवी होती...अशा उठटसुलट विचारात रात्रीच्या उरलेल्या काही घटिका घालवल्या. विजयचाच अनुभव मलाही आला.
रात्रीची शांतता पहाटेपर्यंत भंग पावली नाही.
आम्ही तिघे टेबलाभोवती बसलो होतो आणि सकाळची पहिली कॉफी झाली होती. तोपर्यंत समर्थांनी आम्हा दोघांना एक शब्दही बोलू दिला नव्हता. कॉफीचा कप दूर सारता सारता समर्थ म्हणाले,
“हं, अप्पा, आता सांग काल काय झालं ते-”
मधून मी, मधूनच विजय असे करीत कालचा प्रकार वर्णन केला.
“आता तुझा आधीचा अनुभव सांग-आणि विजय,-” समर्थ हसत म्हणाले, “तुझी स्वतःची कोणतीही माहिती तू अजून आम्हाला दिलेली नाहीस, हे पण ध्यानात ठेव.”

"ही इस्टेट माझ्या मावशीची आहे. मी नोकरीनिमित्त परगावी असतो. मावशीला दुसरं जवळचं कोणीच नव्हतं आणि ती मझ्याकडेच राहत होती. सहा महिन्यांपूर्वी ती मरण पावली आणि हा वाडा माझ्या मालकीचा झाला. मावशी जरा त-हेवाईक होती. आजच्या जागेच्या टंचाईच्या दिवसांत वाड्याचे महिन्याकाठी तीन-चारशे रुपये भाड्याचे सहज आले असते. पण वाड्यात भाडेकरी ठेवायचा नाही हा मावशीचा ठाम निर्धार होता. आता मला त्याचं कारण समजतं-पण तिने यासंबंधी मला आजवर एक शब्दही सांगितला नाही. भाडेकरीच काय, कोणा ओळखीच्या माणसाला एखादा दिवससुद्धा तिने जागा वापरायला दिली नाही. मीसुद्धा कधी कामासाठी इथे आलो तर मलाही एखाद्या लॉजमधेच उतरावं लागे. तसं बाहेरून मी हे घर किती तरी वेळा पाहिलेलं आहे-पण बाहेरूनच फक्त!"

"तुझ्याकडे यायच्या आधी मावशी घरात एकट्याच राहत होत्या?"

"हो. मला समजायला लागलं तेव्हापासून त्या एकट्याच आहेत. त्यांच्या यजमानांना मी पाहिलं नाही, त्यांचा फोटोसुद्धा पाहिला नाही-कधी विषय निघालाच तर त्या तो टाळून बोलत. त्यांना त्यावर चर्चा नको होती-"

"आणि तुझी आई? तिला यातली काही माहिती नाही का?"

"मावशीच्या मानाने आमची परिस्थिती बेताचीच होती. पैशाचं दडपण काही औरच असतं. आई शेवटपर्यंत मावशीच्या शब्दांना मान देत आली आहे. तिला कशाचीच कल्पना नसावी असं मला वाटतं. "ती कधी मावशीकडे राहायला गेली नव्हती?"

"या घरात? नाही. आणि घरासंबंधी मनात काही शंका यायला कारणच घडलं नाही. मावशीची इतर खूप इस्टेट आहे. तिच्या रूपाने साक्षात लक्ष्मीच आमच्या घरात चालत आली होती-तिला कोण दुखावणार?"

"पण मावशी कोणत्या कारणासाठी तुझ्याकडे राहायला आली?"

"वय झालं आणि एकटीचं एकटीला होत नाही हे कारण तिने दिलं. -मावशी आमच्याकडे आल्याने आमचा तोटा तर झालाच नाही. कारण तसा दोघींचा स्वभाव जुळण्यासारखा होता."

"आता त्यांचं नाव सांग."

"गोपिकाबाई देशमाने आणि मला एवढंच माहिती आहे."

"ठीक आहे. आता तुझा अनुभव सांग."

"परवाची रात्र ही माझी या घरातली पहिलीच रात्र. आदल्या दिवशी मी इथे आलो. घर उघडलं. आत घाण इतकी होती की साफ केल्याशिवाय राहणं मुष्कील होत. पण त्यावेळीही माझ्या ध्यानात आलं की मावशी फक्त तळमजलाच वापरत होती, कारण खालचा भाग जरासा धुळीने माखला होता. पण वर! वर कितीक वर्षांत

कोणी फिरकलं नव्हतं हे उघड दिसत होतं. माझी साहजिकच कल्पना झाली की वयोमानाने मावशीला जिन्यांची चढ उतार होत नसेल आणि शिवाय एकटा जीव! तिला जागा अशी कितीशी लागणार?"

"हे प्रकार किती दिवस चालू आहेत मला कल्पना नाही. मावशी एकट्या राहात होत्या तेव्हाही चालू असतील. त्यांनी घर सोडलं ते खरोखरच म्हतारपणापायी सोडलं का आणखी काही कारण झालं तेही सांगता येत नाही. पण एकदा त्या माझ्याकडे आल्या त्या कायमच्याच. पुन्हा त्यांनी या घरात पाऊल म्हणून टाकलं नाही."

"तर मग मी फक्त खालचा मजला साफ करून घेतला आणि परवा रात्री मुक कामाला आलो. सबंध घरात मी एकटा आहे ही जाणीव मनात सतत होती मला हा अनुभव नवा होता. मी राहातो तिथे माणसांचा गजबजाट आहे. रात्री अपरात्री केव्हाही जाग आली तरी आसपासच्या लोकांच्या वावराचा काही. ना काही आवाज कानावर येतच असतो. तेव्हा इथे जरा बिचकल्यासारखं झालं तर त्यात फारसं नवल नाही. झोपही त्या प्रमाणात सावध होती.

"आणि म्हणूनच पायरवाचा तो आवाज अस्पष्ट असला तरी मला अगदी ताबडतोब जाणवला. अपरिचित जागेत जाग आल्यावर पहिले काही क्षण मनाचा गोंधळ उडाला-पण लागलीच सर्व ध्यानात आले. आणि वरचा तो हलकासा आवाज येतच होता. अगदी नैसर्गिकपणेच मनात प्रथम कल्पना आली ती एखाद्या चोराची होती. काही वेळ विचार केला-वर जावं का नाही? थोडासा धोकाही होता आणि तसं किंमती सामान काहीच नव्हतं. पण शेवटी स्वतःच्या मालकी हक्कावर अतिक्रमण झाल्याची भावना आणि त्यामुळे आलेला राग हेच प्रभावी ठरलं आणि मी त्या आवाजाच्या दिशेने निघालो. अर्थात वाजवीपेक्षा जास्त आवाज होऊ न देण्याची दक्षता घेत होतोच."

"वरचा आणि खालचा भाग अगदी सारखा आहे हे अप्पांनी पाहिलं
आहेच. सारखेपणा केवळ खोल्यातच नाही; विजेची फिटिंग्ज आणि स्विचेस यांच्यातसुद्धा आहे. जिन्यातला दिवा मी लावला नाही. अगदी हलकेच वर गेलो आणि वरच्या खोलीतला दिवा एकदम लावला."

विजय काही वेळ गप्प बसला.

"पुढचे काही क्षण जरा गोंधळाचे आहेत. एकदम लखलखाट झाल्यानं माझे डोळे दिपल्यासारखे झाले होते. आणि काय दिसेल याची काहीच कल्पना नव्हती. तेव्हा खोलीच्या मध्यभागी उभी असलेली ती आकृती दिसायला जरा उशीरच लागला. ही विसंगती वाटेल, पण हे अगदी सत्य आहे. त्यासारखं काहीही मी आजवर पाहिलेलंच नाही. भिंगातून पाहताना प्रतिमा जशी क्षणात स्पष्ट, क्षगात धूसर अशी होते ना,

तशीच ती आकृती दिसत होती. आणि मनात काही निर्णय घ्यायच्या आतच ती संपूर्ण अदृश्य झाली. अगदी नैसर्गिकपणे व मला वाटलं की हे काही तरी भास होत असले पाहिजेत. पण खाली जायच्या आधी वरच्या सर्व खोल्या तपासून पहाण्याचा माझा विचार होता आणि म्हणून मी शेजारच्या खोलीत गेलो.” विजय पुन्हा एकदा काही क्षण थांबला.

“ती खोली ओलांडून शेजारच्या खोलीत जाईपर्यंत मला तो हलणारा पडदा दिसलाच नाही-किंवा दिसला असेल, पण मी त्याची दखल घेतली नाही. आपण खिडकीपासचा हलणारा पडदा रोज पाहत असतो आणि त्यावर विचार करण्यात एक क्षणही दवडीत नाही. खोलीवर सर्वत्र नजर फिरवून मी पुन्हा जेव्हा त्या पडद्याकडे पाहिलं तेव्हा मला त्या हलण्यातला वेगळेपणा जाणवला. एक म्हणजे वारा नव्हता, शिवाय खिडकी ओढून घेतलेली होती आणि हे पडद्याचे हलणं काही वेगळंच वाटत होतं. आत गुरफटलेल्या एखाद्या माणसाने अंग घुसळावं असं वाटत होतं. एकदा मनात धाडसी विचार आला-पुढे जावं, आणि पडदा खसदिशी बाजूला ओढावा. . .पण मग सावधपणा जागा झाला अणि मी होतो तिथेच थांबलो आणि ती चमत्कारिक फडफड पहात राहिलो. आता मला पुढे गेलो नाही याचं किती समाधान वाटतं! काय दिसलं असतं कोणास ठाऊक!”

“किती वेळ गेला कोणास ठाऊक, पण ती हालचाल हळूहळू मंदावली आणि शेवटी थांबली. अगदी पूर्णपणे थांबली. आधीचा तो पायरव, मग त्या खोलीतली ती धूसर आकृती आणि आता ही रहस्यमय हालचाल. . .खूप वेळ ढग जमत यावेत आणि मग अचानक वीज कडकडत कोसळावी तसंच काहीसं झालं, . .सर्व घटनांचा एकत्रित आघात मनावर झाला. ..भीती, खरी सर्वकष भीती, म्हणजे काय ते मला त्या क्षणी समजलं. . .संतापाने तसाच अतिरेकी भीतीनेही माणूस काही वेळा अविचार करतो. . .मी पुढे झालो आणि पडदा हाताने दूर केला....आत कोणी नव्हतं...काही क्षण मी वेड्यासारखा समोर पाहत राहिलो आणि मग धावत धावत खाली आलो -”

“पडद्यामागे काही नव्हतं...” मोठे विलक्षण आणि उत्पाती शब्द. कारण त्यामुळे घटनांना कोणतीच मर्यादा राहिली नव्हती, शक्यतांचं रान उठलं होतं...विजयला काही प्रत्यक्ष दिसलं असतं तर काही मर्यादा घालता आल्या असत्या....आता कशासच काही सीमा नव्हती. जणू माहीत असलेल्या घटना या एका मार्गानं येथपर्यंत येत होत्या आणि एका कड्याच्या काठापाशी थांबत होत्या. पुढे शहाणपणाचा कडेलोट होता! मनाला भरकटत जायला किती लहानसं निमित्त पुरतं! समर्थाच्या शब्दांनी मी भानावर आलो.

“ठीक आहे. आणि काल जवळ जवळ याच प्रकाराची पुनरावृत्ती झाली. संपूर्ण पुनरावृत्ती नाही-” ते आमच्याकडे पहात म्हणाले, “तसं झालं असतं तर हा प्रश्न अगदीच सोपा झाला असता. भूतकाळातल्या काही घटनांचा तो एक यांत्रिक प्रक्षेप झाला असता. आणि आपल्याला त्याचा बंदोबस्त सहज करता आला असता.”
“पण या ठिकाणी घटनांचा विस्तार आणि तीव्रता वाढत आहे. परवा न दिसलेल्या एका नव्या पात्राने काल त्यात पदार्पण केले आहे. आणि म्हणून मला वाटतं की विजयला यात धोका आहे.”
“मला धोका? माझा यात काय संबंध येतो?” तो गडबडून म्हणाला.
“ही जी दृश्ये दिसतात त्यांचं स्वरूप समजावून घ्यायला हवं. मी अप्पाला हे अनेकवेळा सांगितलं आहे. आपल्याला समोर जे काही दिसतं तसंच तिथे प्रत्यक्षात असलं पाहिजे असं नाही. सर्वमान्य संकेतांनी आपण बाह्यसृष्टीतल्या सर्व पदार्थांना काही नावे दिली आहेत. व या संकेतांवर आपला व्यवहार चालतो. तुला जी माणसाची आकृती दिसली तिथे खरोखर काय होतं? काही तरी असलंच पाहिजे, कारण केवळ निद्रव्य पोकळी द्रव्याचा आभास कधीही उत्पन्न करू शकणार नाही. तेव्हा तिथे काही तरी असलंच पाहिजे.”
“अप्पाने पूर्वी एकदा मला भुतं, पिशाच्च यासंबंधात विचारलं होतं. यांचं मूळ पूर्वीच्या भावनातिरेकात असतं. जणू काही हा आपला कालपट तेथे विस्कळीत झालेला असतो. तिथे काही आकृतीबंध तयार झालेले असतात. असं म्हणा की शक्तीला द्रव्यरूप देणारे हे साचे आहेत्. पण सर्वसाधारणपणे ते इतके तरल असतात की ते अदृश्यच राहतात. फार झालं तर एखादा आवाज, एखादा गंध किंवा एखादा स्पर्श अशा रूपात ते कचितप्रसंगी जाणवतात. पण त्यांना जेव्हा असा घन आणि घोटीव आकार येतो, तेव्हा ते कोणाच्या तरी मानसशक्तीच्या सहाय्याने दृग्गोचर झालेले असतात. नुसते काचपात्र अदृश्य राहील, त्यात रंगीत पाणी ओतले की पात्राचा खरा आकार नजरेसमोर येईल, तसंच काहीसं होतं. पण आता येथे वेगळेपणा कसा आहे तो पहा.”
“सर्रास कोणत्याही माणसामुळे हे आकार दृश्य होणार नाहीत; तर त्या माणसाच्या रक्ताशी यांचे काही नाते असले तरच ही घटना. घडते. आपण नेहमी पहातो की घराण्यातल्या व्यक्तींना आपल्या पूर्वजांची किंवा त्यांच्याशी संबंधित अशा प्रसंगांची अशी भासमय रूपे दिसतात. इतरांना कोणाला ती जाणवत नाहीत. कारण इथे रक्ताच्या नात्याचा प्रश्न आहे.”
“म्हणजे माझी मावशी -?” विजय चाचरत म्हणाला.

“बरोबर! हा धागा त्यांच्यातूनच तुझ्यापर्यंत पोचला आहे. मागचा इतिहास तपासला तर या प्रकारचे मूळ सापडेलही, पण सध्या तो प्रश्न गौण आहे. मला तुझ्या स्वतःसंबंधी बोलायचं आहे. जेव्हा तुला हा प्रकार प्रथम दिसला तेव्हा माणसाची आकृती अस्पष्ट होती, हो ना? तीच आकृती काल सुस्पष्ट आणि रेखीव दिसली. घटनांचा हा उत्क्राम काय दाखवतो? तुझ्याच जीवनशक्तीचा उपयोग या आविष्कारात होत आहे हे उघड आहे.”

“पण माझी शक्ती वापरली जात असेल तर मला ते जाणवणार नाही का?”

“आणि आपल्या सर्वच शक्ती इतक्या वरवरच्या पातळीवर सहज, आकलन होणाऱ्या असतात असं कशावरून गृहीत धरतोस?”

“मला हे समजलं नाही, समर्थ.”

“माणसाचं मन हे अगणित शक्तींचं भांडार आहे. त्यांपैकी काहींच्या तर अस्तित्वाचीही आपल्याला कल्पना नसते, मग त्यांचा जाणीवपूर्वक वापर तर दूरच राहिला! त्यांपैकी एखादी शोषली गेली तर तुला काय समजणार?”

“म्हणजे मी तिथे जायला नको असं म्हणायचंय तुम्हाला?”

“आता प्रत्यक्ष जाण्याचा प्रश्नच राहिला नाही. एकदा हा बंध जोडला गेला की तू जेथे असशील तेथून हे शोषण चालू राहील-”

“मग?”

“या अघोरी यंत्राचा संपूर्ण नाश हा एकमेव उपाय आहे.”

“तुम्हीच सुरुवातीस आला असतात तर...”

“स्वतःला दोष देऊ नकोस. मी प्रत्यक्ष तिथे आलो नाही तरी माझे तुमच्यावर, विशेषतः अप्पांवर लक्ष होतेच-” आणि या रहस्यमय शब्दांचे स्पष्टीकरण समर्थांनी दिले नाही.

“आज तुम्ही येणार आहात?”

“सुरुवातीपासून नाही. आवश्यकता वाटली तर येईनही. पण आज तुम्ही दोघंच तिथे जा. पाहू काय काय होते ते.”

विजयची आणि माझी नजरानजर झाली. पुन्हा एक रात्र त्या रिकाम्या घरात काढायची! दोघांच्याही मनात तोच विचार आला असला पाहिजे.

“आणि नुसतंच खाली बसून राहायचं नाही-” समर्थ ठामपणे म्हणाले, “प्रत्यक्ष वर जाऊन आज रात्री काय काय होतं ते पाहावं लागेल.” आणि मग जरासे हसत म्हणाले- “तशी फार काळजी करायचं कारण नाही. अजून तरी विजयला धोका नाही-नाही तर मी तुम्हाला दोघांनाच फक्त तिथे पाठवलंच नसतं.”

कोणत्या गोष्टींची काळजी करायची आणि कोणत्या गोष्टीकडं दुर्लक्ष करायचं यावर समर्थांची आणि माझी मतं अगदी भिन्न आहेत. पण त्यांचा शब्द मोडणं शक्यच नव्हतं.
रात्रीचा शो संपल्यावर साडेबाराच्या सुमारास आम्ही त्या घरात पाय टाकला. सिनेमात खरं लक्ष लागलं नाही, तरी घरात ताणाखाली दोन तास काढण्यापेक्षा इकडे ते जरा बरे गेले. दुपारी झोप झाली होती तेव्हा तोही प्रश्न नव्हता. आता फक्त वाट पाहायची होती.
आणि वर जाऊन सर्व खोल्यातून दिवे लावायचं पहिलंच काम मोठं अवघड होतं. दोघांची मनःस्थिती अशी होती की कोणीच कोणाला धीर देण्यात अर्थ नव्हता. काल रात्री प्रत्येक खोलीत पाय टाकताना विजय का अडखळत होता हे आता मला समजलं होतं. खोल्या प्रकाशाने उजळून निघाल्या, पण या प्रकाशात सुरक्षितता नव्हती. सारखं वाटत होतं की ही खोली रिकामी दिसते पण पलीकडच्या खोलीत काही तरी आहे. आताच्या वेळी गुपचुप उभे राहिले आहे पण आमची पाठ वळली की त्यांच्या त्या चमत्कारिक हालचाली सुरू होतील...
पण आम्हाला इथेच थांबणं भाग होतं. शेवटी आम्ही जिन्याच्या तोंडाशीच दोन घडीच्या खुर्च्या मांडल्या. बरोबर आणलेला थरमॉस आणि ग्लासेस शेजारी ठेवून तिथे मुक्काम ठोकला. वेळच अशी होती की साध्या विषयावर संभाषण शक्यच नव्हते. मनाची तार पिळली गेली होती. प्रत्येक क्षण अपेक्षेने भरलेला होता. केव्हा आणि काय होईल याची कल्पनाच नव्हती. तरीही जे झालं ते संपूर्ण अनपेक्षित होतं. आतल्या, तिसऱ्या खोलीतून एक प्रदीर्घ पण मध्येच तोडली गेलेली किंचाळी घुमत आली. आवाजाच्या पहिल्या आघाताबरोबर आम्ही दोघे एकदम दचकून ताठ झालो होतो... आवाज मध्येच थांबला तरी आमच्या कानात तो मागाहून कितीतरी वेळ घुमत होता. शातता जशी लांबत चालली तसा विचारांना अवसर मिळाला. हत्येच्या अधोरी फुलाची आणखी एक भयानक पाकळी उमलली होती. तिथलं सगळं वातावरण या भयानक नियासानं व्यापलेलं होतं. आमची मनंही त्याच अंमलाखाली गेल्यासारखी झाली होती. पट्टा तुटलेल्या मोटारसारखं विचारचक्र आतल्या आत विलक्षण वेगानं गरगर फिरत होतं. पण प्रत्यक्ष कृती किंवा हालचाल अशक्य झाली होती. जणू आतल्या उलगडत जाणाऱ्या घटनांच्या प्रभावात आम्हीही सापडलो होतो. आणि निष्क्रीय झालो होतो...
एखादी अवजड वस्तू ओढल्याचा आवाज येत होता. जे कोणी हे करीत होतं त्याचाही श्वास मोठमोठ्या धापांत येत होता. खिडकीचा पडदा सर्रकन

सरकवल्याचा आवाज आला. आणि मग ती शांत पावलं ... आमच्या रोखाने येणारी संथ पावलं,...

खोलीत काय येणार ते आम्हाला माहीत होतं. पण आता त्याला तोंड देण्याची शक्ती आमच्यांत नव्हती. मला वाटते आम्ही दोघं एकमेकांना आधार द्यायला होतो म्हणून आमची मनं शुद्धीवर राहिली. अशा उत्कट भावनाक्षोभाच्या वळी माणसाचं मन शरीराचा कोश फोडून बाहेर येतं. पलायन! सुटका! आमचे दोघांचेही विचार जुळले, मने एकमेकांना भिडली आणि एकाच क्षणी दोघांनी नेट लावला. आमच्यावर पडलेले पाश क्षणभरच आम्हाला अडकवू शकले...

मग आम्ही मोकळे झालो. हातात हात घालून जिन्यावरून धाडधाड खाली आलो आणि घराच्या दाराबाहेर येऊन धापा टाकीत उभे राहिलो. तेथूनही रस्त्यावर यायचा विचार होता, पण अगदी शेवटच्या क्षणी मला समर्थांचे शब्द आठवले. 'माझं तुमच्यावर लक्ष आहे.'

त्याच क्षणी भीतीची अविचारी प्रतिक्रिया थांबली.

“विजय, आपण या घरातच रात्र काढली पाहिजे.”

“घरातच? पण म्हणजे पुन्हा वर ....?”

“नाही, वर जायची आता आवश्यकता नाही. पण बाहेर जाणंही योग्य आपण खालीच थांबू.”

“आज रात्री आपण तिघे त्या घरात असणार आहोत. मग पाहू.” आमची हकीगत ऐकल्यावर समर्थ म्हणाले होते, “तुम्ही दुपारी झोप काढा.” समर्थ बरोबर येणार हे ऐकताच माझ्या शिरावरची जबाबदारी एकदम संपली होती आणि मला हलकेपणा वाटायला लागला होता. याच कारणाने दुपारी झोपही निश्चित लागली होती. विजयवर मात्र गेल्या तीन रात्रीच्या अनुभवांचा चांगलाच परिणाम झालेला दिसत होता; पण मनात शंका येत होती की, हा केवळ जागरणांचा शारीरिक परिणामच आहे का या फिकटपणामागे आणि थकव्यामागे आणखी एखादं कारण आहे?

त्या संध्याकाळी विजय आमच्याकडेच राहिला आणि त्याने जेवणही माझ्याबरोबरच घेतलं. आमचं होईपर्यंत समर्थ बाहेरच्या हॉलमधे थांबले होते. आज तर त्यांनी त्यांचा नेहमीचा फळांचा रसही घेतला नव्हता. रात्री नऊच्या सुमारास आम्ही तिचे निघालो. नेहमीसारखाच घरातला अंगणातला दिवा तेवढा जळत होता. समर्थ बरोबर होते त्यामुळे मला आज अजिबात अस्वस्थता जाणवत नव्हती.. खालच्या खोल्यांतले दिवे लावल्यावर विजय म्हणाला, “समर्थ, वरचे दिवे लावायला हवेत का?” –

“नको. आज त्यांची जरूरी नाही.” समर्थ म्हणाले. खालच्या प्रत्येक खोलीची ते बारकाईने पहाणी करीत होते. मी जी खोली वापरत होतो तिथे ते बराच वेळ थांबले

आणि मग म्हणाले, “ठीक आहे. आपण इथेच थांबू या.”
खुर्च्या वगैरे आणून आम्ही तिघेही आरामात बसलो.
“विजय,” समर्थ म्हणाले, “आज रात्री आपण या सर्व प्रकारावर पडदा टाकणार आहोत. त्यात तुझी मदत मी घेणार आहे, पण ते तुला समजणार नाही. कारण त्याआधी मी तुला मोहनिद्रेत घालणार आहे. आता तुझ्या, आणि अप्पा, तुझ्याही मनात बरेच प्रश्न असतील. मी आता काही काही सांगतो त्यात तुमच्या बहुतेक प्रश्नांची उत्तरे असतील.”
“विजय हा काही हे प्रकार पहाणारा पहिला नाही. त्याच्या आधी मावशींना सुद्धा हेच दिसत असलं पाहिज. पण थोड्याफार फरकाने, त्याचं मग सांगतो. तेव्हा त्यांच्या घराण्याचा अंश विजयमध्ये आहे यामुळेच त्याला ही दृश्ये दिसतात. प्रत्येक व्यक्तीचा खास असा मानसिक किंवा अशारीरीय निर्यास असतो. अनेक वेळां 'पर्सनल मॅग्नेटिझम'चा उल्लेख करण्यात येतो. त्यात तथ्य असो वा नसो, एक गोष्ट नक्की. एकाच घराण्यातील माणसांत अनेक प्रकारचे साधर्म्य असतं. सारखे तोंडवळे, सारखे आवाज, सारखे स्वभाव या तर अगदी वरवरच्या गोष्टी झाल्या. प्रत्येक पेशीत रंगसूत्राची जी अजस्र शृंखला असते त्यातील अनेक दुवे घराण्यात समान रहातात. आणि या सर्वांचेच कार्य आधुनिक विज्ञानाला माहीत नाही. त्यांच्यातल्या काहींत. भूतकालीन इतिहास नोंदलेला असेल, तर काहींत भविष्यकाळाची रचना पाशबद्ध केली असेल. योगाभ्यासाने माणूस अंतर्ज्ञानी होतो. याचा अर्थ त्याची नजर शरीरातल्या या सूक्ष्म नकाशापर्यंत पोंचते. एकपेशी बीजापासून ते प्राणीसृष्टीच्या अंतापर्यंतचा इतिहास येथे नोंदलेला आहे. ज्याला या संकेतांचे रहस्य उमगले तो त्रिकालज्ञानी झाला! असो. आता आपला संबंध भूतकालीन घटनांशी आहे. आणि या दुव्यांपैकी काही भूतकाळातील घटनांनी, विशेषतः त्या जर प्रवर भावनांच्या उद्रेकाच्या असतील तर-उत्तेजित होणारच!
“बांडगळाचा अतिसूक्ष्य जंतू वृक्षाच्या शरीरात शिरतो-पण वृक्षाच्या जीवनरसाचे शोषण करायला तो समर्थ असतो. त्याला जर वेळीच छाटला नाही तर बांडगूळ फोफावत जाईल आणि वृक्ष निःसत्त्व होऊन जाईल. हे संबंध स्थलकालनिरपेक्ष असतात. एकदा यांचा स्पर्श झाला की मग तो कायमचाच. त्यांना मुळातच तोडले पाहिजे.”
“विजयच्या जीवनशक्तीचा उपयोग या अमानवी प्रक्षेपांसाठी होत आहे हे मी प्रथमपासूनच सांगतो आहे. आता तुम्हाला दुसऱ्या रात्री जो देखावा दिसला त्यातली विसंगतीही लक्षात आली असेल. त्या माणसाने त्या स्त्रीची आणि त्या लहान मुलाची हत्या केली हे निर्विवाद आहे. पण त्यानंतर लागलीच त्याला दुःख आणि पश्चात्ताप

होईल, त्याच क्षणी त्या स्त्रीची आणि मुलाची मृत पण सचेतन शरीरे त्याला समोर दिसू लागतील, हे सर्वथा अशक्य आहे. याचाच अर्थ तुम्हाला दिसणारे देखावे वेगवेगळ्या वेळचे आहेत. एखाद्या चित्राला घड्या किंवा सुरकुत्या पडल्या की त्याचे वेगवेगळे भाग अनपेक्षितपणे जवळ येतात तसच इथे झालं आहे. घटनांचा सर्व पटच विस्कटला आहे. त्यांचा क्रमही उलटासुलटा झाला आहे आणि त्यांच्यातले कालाचे अंतर नाहीसे होऊन सर्व एकाच वेळी घडल्याचा आभास निर्माण होत आहे. विजयशी संबंध जोडला गेल्याने हा परिणाम आणखी वाढला आहे. कापडातला एखादाच धागा खेचला की त्याचा परिणाम लांबवर कोठेतरी होतो. तसंच हे आहे."
समर्थ बोलायचे थांबले. आमच्याकडून शंकांची किंवा प्रतिप्रश्नांची त्यांची अपेक्षा असली तर ती व्यर्थ होती. ज्या गोष्टी आमच्या ध्यानातही आल्या नव्हत्या त्यांचेही स्पष्टीकरण त्यांनी परिपूर्णपणे केलं होतं. तरी आम्ही इथं प्रत्यक्ष हजर होतो आणि :समर्थांची माहिती ऐकीव होती!
साडेअकरा वाजता त्यांनी विजयला कॉटवर पडून रहायला सांगितले. खोलीत एकच दिवा जळत होता. त्या प्रकाशात मला समर्थांचा चेहरा किंचित बदललेला दिसला. त्यांची उंच आकृती कॉटशेजारी उभी होती. विजयची नजर एकदा त्यांच्या देहऱ्याकडे गेली ती परत हललीच नाही. स्मर्थांनी एकदाच हात उचलला. तो परत खाली आला तेव्हा विजय झोपी गेला होता. मला एक शंका आली.
"समर्थ, विजयच जर याचं कारण असेल तर मग पहिल्या रात्री तरी त्याला आवाजाने जाग कशी आली?"
"अप्पा, मन ही काही एकसंघ वस्तू नाही. त्याचे थरावर थर असतात आणि कळत किंवा नकळत प्रत्येक थरावर वेगवेगळ्या क्रिया चाललेल्या असतात. आणि एका भागाचे ज्ञान दुसऱ्या भागाला होतेच असेही नाही. आणि मनाचे हे सर्व थर जेव्हा समावस्थेत येतात आणि सर्वत्र एकच विचार येतो तेव्हा खरी एकाग्रता सिद्ध होते. विजयचा उपयोग अर्थात त्याच्या इच्छेविरुद्ध होत होता. आणि मनाच्या काही भागाचा त्या गोष्टीला प्रखर विरोध होता म्हणून त्याला जाग आली, पण आता त्याला जाग येणार नाही." शेवटचे शब्द खालच्या आणि गंभीर आवाजात होते.
खोलीत शांतता पसरली. जवळच्याच कोठल्यातरी खोलीत लहानसे घड्याळ 'टिकटिक करीत होते. आपल्या लहानश्या काटेरी पावलांनी ते कालमार्गावर प्रवास करीत होते. आताच्या माझ्या प्रतियोगी अवस्थेत मला त्या लहानश्या हाचचालीने उठलेले कालतरंगही जाणवत होते. पूर्व-पश्चिम या दिशा जशा मानवबाह्य आहेत तशा कालातल्या भूत-भविष्य दिशा मानवबाह्य नाहीत, त्या स्वनिष्ठ आहेत. तुम्ही कोणत्या दिशेला तोंड करून उभे रहाता यावर ते अवलंबून आहे. मला क्षणभर

असा भास झाला का विश्वाचा हा अवाढव्य पटच आपल्या आसाभोवती फिरला...घड्याळाची टकटक चाललीच होती, पण आता त्याचा प्रवास कोणत्या दिशेने चालला आहे याचा मनात भरंवसा नव्हता....वर्तमानातून भविष्याकडे...का वर्तमानातून भूतकाळाकडे?...

आसपास इतरही सूक्ष्म बदल होत होते, नव्या रचना होत होत्या. एखाद्या चित्रावरचे पातळ पापुद्रे एकामागून एक काढून टाकावेत तश्या त्या खोलीच्या अनेक प्रतिमा विभक्त होऊन विरघळून जात होत्या...मूळ रचना तीच राहिली तरी बाह्यरूप सावकाश पण निश्चित बदलत होते...

या सर्वातून विजय मात्र शांतपणे झोपला होता.

शांतपणे? मी त्याच्याकडे निरखून पाहिले. त्याचा चेहरा किंचितसा अस्पष्ट झाला होता. कारण त्यावरचे अवयव सारखे बदलत होते. एक प्रतिमा सुस्पष्ट होण्या आधीच तिच्या जागी दुसरी साकार होत होती.

“काय होत आहे हे तुला समजलं का?” समर्थींचा हलका आवाज.

मी केवळ नकारार्थी मान हलवली.

“विजयच्या शरीरावरचा त्याचा ताबा सध्या संपूर्णपणे गेला आहे. तो सध्या त्या भूतकालीन प्रेरणांच्या प्रभावाखाली आहे. आणि आता . तो त्या उत्कट क्षणाकडे ओढला जात आहे. त्या प्रभावाखाली त्याच्यावर हे निरनिराळे ठसे उमटत आहेत. आपण तिघेही सध्याच्याक्षणी जगाच्या मुख्य प्रवाहापासून अलिप्त आहोत. ज्यापासून माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा निर्यास होतो तोच हा विजयचा अध्यात्मिक किंवा अस्ट्रल गाभा आहे. त्याच पातळीवरचे आपण हा उलट प्रवास पहात आहोत.”

“आणि हे कोठपर्यंत चालणार?”

“काळातल्या त्या बिंदूपाशी विजय पोहोचेल आणि ...मग पाहशीलच”

“विजयचा चेहरा आता इतका बदलला होता की ओळखून येत नव्हता.. एवढच नाही, त्यात हळूहळू वरच्या खोलीत दिसलेल्या माणसाच्या चेहऱ्याशी साम्य यायला लागले होते. प्रथमच मला जराशी अस्वस्थता जाणवली.

विजयमधे जे काही परिवर्तन होत होते ते पूर्ण झाले. त्याचा चेहरा स्थिर आणि कठीण झाला-पण आता तो विजय नव्हताच! भावनेच्या अतिरेकाने बेभान झालेला तो चेहरा पाहवतच नव्हता....आणि त्यालाही आमच्या अस्तित्वाची जाणीव नसावीशी दिसत होती.

काही क्षण तो पलंगावर तसाच पडून राहिला. विस्फारलेले डोळे वर छतावर खिळले होते. चेहऱ्यावर साकळलेल्या रक्ताची लाली आली होती. हातांच्या मुठी गच्च आवळलेल्या होत्या. मोठ्या प्रयत्नाने त्याने स्वतःला आवरून धरलेलं दिसत

होतं. त्याच्या मुठी एकदोनदा गादीवर आपटल्या. मान स्वतःशीच दोन-तीनदा नकारार्थी हलली. डोळे क्षणभर मिटले.
मग तो ताडूदिशी कॉटवर उठून बसला. इतका अचानकपणे की मी दचकून दोन पावले मागेच सरलो. “अप्पा,” समर्थ म्हणाले, “तुला काळजी करायचं कारण नाही. त्याच्या दृष्टीने आपण येथे नाहीच आहोत. पुढच्या दिवसांत कोणत्या तरी एका रात्री आपण सर्वजण एकत्र जमणार आहोत. पण आता आपण सर्व वेगवेगळ्या जागी, वेगवेगळ्या काळांत आहोत. मी आणि माझ्यामुळे तू त्याला पाहू शकतो, कारण मी त्याच्या मनाचा संपर्क एक क्षणभरही सोडलेला नाही. आता फक्त काय होते ते पहा.”
विजयने (तो विजय नव्हता, तरी मी त्याला याच नावाने संबोधतो) स्वतःशी काहीतरी कठोर निर्णय घेतला आणि तो उभा राहिला. त्याची पावलं सराईतपणे दारानडे यळली आणि त्याच्या मागोमाग आम्हीही निघालो.
बाहेर आल्यावर क्षणभर मला गोंधळल्यासारखं झालं. कारण बाहेर सर्वत्रच बदल दिसत होता. खोल्यांची रचना सोडली तर रंग, सामान, सर्व काही वेगळं (आणि काही प्रमाणात) जुनाट पद्धतीचं वाटत होतं. जुनाट! मग माझ्या लक्षात आलं...आम्ही वेगळ्या काळात आलो होतो.
जिन्यावरून दाणदाण पावले वाजवीत विजय वर निघाला. घरात इतर कोणाची वर्दळ दिसत नव्हती. वर जाता जाता कपाटावरच्या घड्याळाकडे माझं लक्ष गेलं. त्यात साडेदहा वाजले होते. रात्रीचेच असावेत.
विजय इतका झपाट्याने वर गेला की त्याच्या मागोमाग जायला आम्हाला जराशी धांवपळच करावी लागली. वरचा हॉल आणि त्याशेजारची खोली ओलांडून शेवटच्या दाराशी विजय पोचला आणि हाताच्या मुठीने त्याने दार जोरजोराने ठोठावले. तो एक क्षण निश्चल राहू शकत नव्हता. हातांची आणि पायांची सारखी हालचाल चालली होती. दारावर ठोठावण्यासाठी त्यानं पुन्हा हात उचलला होता तेवढ्यात दार आतून उघडलं गेलं.
“तुम्ही?” एका स्त्रीचा आश्चर्याने व जरा भीतीने भरलेला आवाज आला. दारात विजय उभा होता, त्यामुळे ती स्त्री मला दिसूच शकत नव्हती.
“हो! मी!” दार हाताने धाडदिशी उघडून विजय ओरडला आणि खोलीत घुसला. आता मला ती खोली आणि ती स्त्री दिसली. खोली शयनगृह होती. स्त्रीचं वर्णन मात्र इतक्या थोडक्या शब्दांत शक्य नाही. ती दिसायला सुंदर होती पण आता तिच्या चेहऱ्यावर आश्चर्य, राग, भीती यांचं मोठं विलक्षण मिश्रण उमटलं होतं. जरा मागे सरत ती रागाने म्हणाली,

"पुन्हा या खोलीत पाऊल टाकणार नाही म्हणाला होतात ना?"
"पुन्हा नाही! ही शेवटचीच वेळ आहे!" विजय ओरडला आणि त्यानं तिच्यावर झेप घेतली. "माझ्या साऱ्या आयुष्याची माती केलीस ते मी निमूटपणे सहन करीन अशी कल्पना होती का काय तुझी? भोग आपल्या कर्माची फळं!"
तिला शब्द उच्चारायलाही अवधी मिळाला नाही. विजयचे हात तिच्या मानेभोवती आवळले गेले, ते शेवटपर्यंत सुटलेच नाहीत. तिच्या तोंडून एक दीर्घ किंचाळी निघाली, पण ती अर्ध्यातच थांबली...
"आई! आई!" त्या भयानक शांततेत आवाज आला. एक गोजिरवाणं मूल पुढे सरकत होतं. पुढे काय होणार याची मला पुरेपूर कल्पना होती, पण काही केल्या नजर त्या अघोरी दृश्यावरून हलेनाच.
"तू! तिच्या छिनालपणाचा पुरावा! तिच्या विषवृक्षाचं फळ!" विजय इकडे तिकडे पहात ओरडत होता. तिथलीच एक उशी घेऊन त्याने वरचा अभ्रा टरकावून काढला आणि...
मी पुढचं वर्णन करू शकत नाही. समर्थांनी माझ्या खांद्यावर हात टेकवला होता. "अप्पा! स्टेडी! हे पूर्वी एकदा होऊन गेलेलं आहे. आता आपण एक केवळ भासमय नाटक पहात आहोत. स्वतःला आवरा!"
समोरच्या दृश्यांच्या सत्यतेची प्रचीती इतकी प्रखर होती की त्यांना भासमय समजून दुर्लक्षणं केवळ अशक्य होतं. मी तिकडे पाठ वळवली. लहान मुलाचा एक अस्पष्ट, गुदमरल्यासारखा आवाज कानावर येऊन अंग शहारले. आणि मग खोलीत एक विचित्र शांतता पसरली-इतकी की कुतुहलाने मी मान मागे वळवली. खोली रिकामी होती! आताच्या अत्याचारी प्रसंगातील सर्व पात्रे दिसेनाशी झाली होती.
"या उत्कट क्षणाचेच ठसे मागे रहातात, अप्पा." समर्थ म्हणाले, "बाकी सगळं कालाच्या ओघात नाहीसं होऊन जातं. म्हणून मी म्हणत होतो की त्याचा मनावर इतका परिणाम होऊ देऊ नको."
"पण मग आम्ही पाहिलेला बाकीचा प्रकार?"
"तेही होणार आहे. सध्या या तिघांच्या आयुष्यरेषा तीन वेगवेगळ्या दिशांना फाकल्या आहेत. पण परस्परसंबंधाचे पाश त्यांना परत एकदा एकत्र आगणार आहेत. आणि हा नीच माणूस आपल्या कर्माचं पूर्ण प्रायश्चित भोगणार आहे."
प्रत्यक्षात पूर्वी किती दिवस गेले होते कोणास ठाऊक, पण येथे प्रसंग कागदाच्या घड्यासारखे एकमेकावर दाबले गेले होते. आणि आमच्यासमोर आम्हाला एक छाया दिसत होती. खोलीत मागेपुढे सरकगारी आणि क्षणाक्षणाला साकळत जाणारी छाया विजयच, पण त्याच्या त्या बदललेल्या रूपात ... त्याचा तो मुखवट्याचा चेहरा

दुःखाने, पश्चातापाने म्लान झाला होता. आणि त्यावर भीतीचाही पगडा होता. मधून मधून दचकून तो आपल्या खांद्यावरून मागे पहात होता, खोलीभर पहात होता, तोंड हातांनी झाकून घेत होता. भीतीच्या आणि असह्य मानसिक ताणाच्या रेषा चेहऱ्यावर खोलवर कोरल्या गेल्या होत्या.

या खोलीतून त्या खोलीत, तेथून हॉलमध्ये, परत शयनगृहात,. अशा त्याच्या सारख्या येरझारा चालल्या होत्या. क्षणाचीही उसंत नव्हती. अशाच स्थितीत जर त्याने मधले दिवस काढले असतील तर आपल्या दुष्कृत्याची हजारपटींनी भरपाई केलेली असेल!

तो मधल्या खोलीत एकाएकी थांबला आणि कशाकडे तरी डोळे विस्फारून पहात राहिला. समर्थांनी मला खूण केली आणि आम्ही दोघे मधल्या दारापाशी आलो. खोलीच्या मधोमध उभा राहून तो खिडकीच्या पडद्याकडे वेड्यासारखा पहात होता- आणि कोणालाही वेड लागावं असाच तो प्रकार होता.

पडदा हलत होता, त्याला फुगवटा येत होता, एक मानवी आकार येत होता. पडद्यामागे झाकलेली व्यक्ती आपले हात आणि शरीर यांची हालचाल करीत होती. एक प्रकारच्या उसन्या आवेशाने त्याने त्या दिशेने एक पाऊल टाकले, पण त्याची पुढची सर्व हालचालच थिजली.

एका कोपऱ्यातून (तिथे केव्हा आले कोणास ठाऊक!) ते वस्त्राखाली झाकलेले मूल पडद्याच्या रोखाने चालले होते. पडद्यामागे जाताच त्याला कोणीतरी उचलून घेतलं. एकदा मी या क्षणी भयभीत होऊन पलायन केलं होतं-पण आता इथून हलायची सोय नव्हती. समर्थ शांतपणे उभे होते. मी गारठून जागच्या जागी उभा होतो. विजय भेदरलेल्या अवस्थेत पडद्याकडे पहात होता. पडद्यामागची हालचाल काही क्षण थांबली होती. त्या एका क्षणारपुता जगाचा तोल सुईच्या अग्रावर तोलल्यासारखा नाजूक होता ...

आणि मग ही शांतता भंगली. हा तोल ढासळला. जग वेडेपणाच्या आणि असंदर्भाच्या गर्तेत कोसळत गेले. विजयने किंचाळी फोडली.

पडदा हाताने दूर करून एक स्त्री पुढे आली होती. वटारलेले डोळे, विस्कटलेले केस, लालभडक चेहरा, आवळलेले ओठ ...आणि कडेवर मूल... वस्त्राखाली संपूर्ण झाकलेले पण तरीही हालचाल करणारे ...

ती स्त्री विजयच्या रोखाने पुढे पुढे येत होती.

आणि विजय किंचाळत होता ..." नको! नको!" ओरडत होता ...

तिचा निर्विकारपणा एखाद्या पाषाणासारखा होता, भयानक होता. –

विजयजवळ येऊन ती थांबली आणि तिने मुलावरच्या वस्त्राला हात लावला. उशीचा तो अभ्रा काढायचा तिचा मानस असावा ...

ते जर झालं असतं तर मलाही खात्रीनं वेड लागलं असतं.

पण त्याच क्षणी समर्थ पुढे आले आणि एका मोठ्या विलक्षण आवाजात म्हणाले, 'विजय! जागा हो!'

त्या तीन शब्दांनी सर्व वातावरणच बदलून गेले. विजय, ती स्त्री आणि 'प्तिच्या कडेवरचे मूल यांची सर्व हालचाल थांबली. एवढंच नाही, तर त्यांच्यातली शक्तीच काढून घेतल्यासारखी झाली. इतका वेळ विलक्षण सजीव वाटणारे त्यांचे चेहरे निस्तेज, मातीच्या पुतळ्यासारखे झाले ... आणि तेही हळूहळू अस्पष्ट व्हायला लागले ... त्यांची सर्व शरीरेच विरळ, पारदर्शक झाली आणि ती सर्व एकमेकांत मिसळून त्या सर्वांची एक पातळसर छायाकृती झाली आणि तीही सरकत सरकत आमच्या दृष्टीआड गेली

“अप्पा, खाली चल.” समर्थ म्हणाले आणि त्यांनी हात पुढे केला. आताच्या! इतकी मला आधाराची गरज कधीही भासली नव्हती.

आही दोवे सावकाश सावकाश खाली आलो. पण विजयच्या खोलीत माझ्यासाटी आणखी एक आश्चर्य होते.

त्याचा बिछाना रिकामा, किंवा जवळजवळ रिकामा होता.

त्यावर काहीतरी होते पण ते सुस्पष्ट नव्हते.

“अप्पा, घाबरू चकोल-” समर्थ म्हणाले, “विजय जागा झाला आहे-पण आपण अजून त्याच अध्यात्मिक-अॅस्ट्रल-पातळीवर आहोत. त्याला आपण व आपल्याला तो अदृश्य आणि अस्पर्य आहोत. आता डोळे मिटून घे.”.

मी डोळे मिटले. एक क्षणभर मला पायाखालचा सर्व आधार. नाहीसा झाल्यासारखं वाटलं. सर्व संदर्भ नाहीसे झाले. मी कोण, कोठे, का आलो आहे याची पूर्ण विस्मृती झाली.

“अप्पा!”समयांची हाक आली. डोळे उघडले खरे. पण नजर स्थिर होईना. खोली स्वतःभोवती हेलखावे खात होती. भिंतीवर लावलेल्या नव्या चित्रासारखी. डोळ्यांची दोनतीनदा उघडझाप केली आणि मगच माझे चित्त ठिकाणावर आले. सर्व वस्तू आपापल्या जागी पडल्या.

आणि त्यांच्यात कॉटवर उठून बसलेला विजयही होता.

थर्मासमधील कॉफी कोमट झाली होती, पण आताच्या क्षणी आम्हाला 'पाणीही चाललं असतं. आम्ही तिघे हॉलमधे बसलो होतो आणि घड्याळ सव्वाबारा दाखवत होतं. माझी नजर पाहून समर्थ म्हणाले,

"अप्पा, आपण मुख्य कालप्रवाह काही काळ सोडला होता हे ध्यामात ठेव. परत येऊन मिळालो तेव्हा इथली फार तर पाचसात मिनिटेच झालेली असणार. आपल्या स्वप्नातसुद्धा खऱ्या दोनतीन सेकंदांत आपण कित्येक तास घालवल्याचा आपल्याला भास होतो. काळाच्या व्यक्तिनिष्टतेचा हा आणखी एक पुरावा आहे.
"विजयचा संबंध या प्रकरणाशी जरा आडवळणी मार्गाने आला होता. तो मला नाहीसा करावयाचा होता. त्याच्या मनाचा एक भाग त्याच्यापुढे ही सर्व दृश्ये उभी करीत होता. त्यालाच मी संपूर्ण वाव दिला. आणि ज्या क्षणी भावनांची पराकोटी झाली होती, जेथे विजयच्या सर्व अव्यक्त शक्ती एकत्रित झाल्या होत्या, त्या क्षणी मी तो संबंध तोडला."
या प्रसंगाची अखेर भयानक आहे याबद्दल आपल्या कोणाच्याही मनात शंका नाही. पण तेथपर्यंत प्रकरण येण्यात विजयला धोका होता. तेव्हा तो काही भाग त्याच्या मनात मागे राहिला आहेच-आणि एखादेवेळी त्याला तो अर्धवट देखावा स्वप्नात दिसेलही पण आता त्याकडे नेणाऱ्या सर्व घटना त्याच्यापासून दूर झाल्यामुळे त्याला कशाचाच संदर्भ लागणार नाही आणि त्यामुळे फारसा त्रासही होणार नाही."
"या सर्व आविष्कारांमागे विजयचीच सुप्त शक्ती होती हे तू प्रत्यक्ष पाहिलेच आहेस. अप्पा, इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाखाली एखादी अतिसूक्ष्म वस्तू वीस हजार किंवा पन्नास हजारपटींनी मोठी दिसावी, तशा या सूक्ष्मरूपातल्या घटना लाखोपटोंनी मोठ्या होऊन आकार घेत होत्या. ते संबंध आता कायमचे नष्ट झाले आहेत."
माझ्याकडे पहात समर्थ हसले व म्हणाले,
"तुझं समाधान झालेलं दिसत नाही, अप्पा!"
"हे जर प्रत्येक पेशीचे अविभाज्य घटक असतील तर त्यांचा नाश कसा शक्य आहे समर्थ?"
"नाश म्हणजे प्रत्यक्ष शारीरिक नाश नाही. त्यांच्यावर जे ठसे उमटले होते ते नाहीसे झाले आहेत. फिल्मवरचे चित्र पुसले गेले आहे, फिल्म तशीच आहे. पण आता पडद्यावर चित्र उमटणार नाही एवढंच."
"ज्या क्रियेत शक्ती, काल, मानवी स्वभाव आणि भूतकालीन घटना यांचे एकाच वेळी परस्परसंबंध येतात ती यापेक्षा किती साध्या रीतीने स्पष्ट करून सांगणार? विजेची एखादी लहानशी बॅटरी, तिच्यातील ठराविक रचनेमुळे बीज देऊ शकते. लहानसा दिवा तिच्यावर खूप वेळ प्रकाशू शकेल. पण एकदम मोठा दिवा लावला तर काही क्षणातच ती निर्जीव होईल. नाश पावणार नाही पण शक्तीहीन होईल. तेवढाच बदल विजयमध्ये झालेला आहे."

विजयला यांपैकी कितपत समजले हे कळायला मार्ग नव्हता. बहुतेक माझ्याइतपतच समजलं असावं. पण समर्थांच्या निकटवर्ती लोकांत आणखी एकाची भर त्या रात्रीपासून पडली एवढं खरं.

□□□

मृत्यु पाश

ते एका सेकंदात झालं. एकाक्षणी ती समोरच्या कारंज्याच्या जलधारांकडे पहात होती आणि दुसऱ्याच क्षणी बिचकून अंग चोरून मागे सरकली होती. आवाज कोठून आला हे तिला समजलं नव्हतं, पण कोणाच्या तरी खदखदून हसण्याचा स्पष्ट आवाज तिच्या कानावर आला होता. एखादा खूप लठ माणूस पाण्याने भरलेल्या हिंदकळणाऱ्या भांड्यासारखा स्वतःशी हसला होता. घाणेरडा, क्रूर आवाज.

तिने आपल्या आसपास नजर टाकली. एका अंगास एक वयस्कर जोडपं बसलं होतं. ते दोघं एकमेकांच्या गप्पांत रंगले होते. दुसऱ्या बाजूस एक बाई आणि तिची दोन लहान मुलं होती. मुलांवर लक्ष ठेवता ठेवता बाईची पुरेवाट होत होती. या माणसांव्यतिरिक्त बागेचा तो भाग अगदी रिकामा होता. मग तिला हसण्याचा आवाज ऐकू आला तो कोणाच्या? आवाज आला तोही अगदी जवळून, अगदी कानापाशी हसल्यासारखा आला होता. का तिलाच काहीतरी भास झाला होता? असं कधीकधी होतं; कोणीही आसपास नसताना कोणीतरी हाक मारल्यासारखी वाटते; तीही पूर्वी दोनतीन वेळा अशी फसली होती. हो, हा भासच असावा. आवळून धरलेलं शरीर तिने हळूहळू सैल सोडलं. क्षगभर ती किती घाबरली होती! घाबरण्यासारखाच तो घाणेरडा आवाज होता....

क्षणभर डोळ्यासमोरचा देखावा अस्पष्ट झाला होता, तो परत एकदा स्पष्ट झाला. मनातले हिंदकळलेले विचार स्थिरावले आणि काय झालं याचा ती जरा शांत चित्ताने विचार करू शकली. समोरच्या कारंज्याच्या चंदेरी, सरळ वर जाणाऱ्या रेषांकडे ती पहात होती (आता विचार करताना सुद्धा तिने आपली नजर कारंज्यावरून कटाक्षाने दूर ठेवली होती), डोळ्यासमोरून पाण्याच्या धारा वर जात होत्या, पाण्याच्या धारेवर नजर खिळली, मागचा देखावा अस्पष्ट झाला; मनात काहीतरी अदलाबदल झाली. पाणी स्थिर आहे आणि बाकीच जग वेगाने खाली जात आहे असा तिला चमत्कारिक भास झाला. जोरात ...आणखी जोरात...

खट्! काहीतरी झालं. एखादं अजस्र दार अचानक समोर उघडावं, किंवा गुडुप अंधकारात ज्वालेचा प्रचंड लोट दिसावा तसं....क्षणभर ती स्तिमित होऊन समोर पहातच राहिली....

आणि मग कोणीतरी तिच्या अगदी जवळ उभं राहून हसत होतं...

त्या आवाजाच्या केवळ आठवणीनेही तिच्या सर्व शरीरावर सरसरून काटा उभा राहिला. असं हसणारा माणूस...तो असेल तरी कसा? मनासमोर नाही ती चित्रं उभी रहात होती, गरगरत होती...

तिचा श्वास परत एकदा घशात अडकला. डोक्यात पुन्हा एकदा एक आवाज घुमायला लागला होता. हसण्याचा नाही, गर्द राईतून वारा विव्हळत वहावा तसा आवाज. काळं काळं अरण्य, पिसाळलेला वारा, मोठेमोठे झोके घेत करकरणाऱ्या फांद्या-आणि या अंधाऱ्या अरण्यात काहीतरी होतं. झाडांच्या आधार घेत घेत, अंधारातून, जमिनीला टेकून, सरपटत सरकणारं काहीतरी-
तोंडावर हात ठेवून ती एकदम मागे सरली. तिची भयभीत नजर आसपास भिरभिरत फिरली. काही नाही. कोणीही नाही! फक्त एक आई, दोन मुलं. तीही आता तिच्याकडे संशयित नजरेने पहात होती. त्यांना काय मी वेडी वाटते की काय? तिच्या मनात विचार आला. पण हा आवाज! डोक्यातून घुमत जाणारा विव्हळणारा वारा! नुसता आवाज नाही, ती विषारी जाणीव! तिचं मन एखाद्या चिकट पदार्थाने माखल्यासारखं झालं होतं. स्पंजाच्या रंध्रारंध्रातून पाणी आत शिरावं तशा या संवेदना सर्व दिशांनी आत शिरत होत्या. दोन्ही हातांनी तिने तोंड झाकून घेतलं.
खांद्याला हलकासा स्पर्श होताच ती केवढ्यांदा तरी दचकली.
"तुम्हाला बरं वाटत नाही का?" शेजारची स्त्री तिच्याजवळ उभी होती.
तिची दोन मुलं जरा लांब उभी राहून मोठ्या उत्सुकतेनं तिच्याकडे पहात होती.
"नाही-नाही-जरा चक्कर आली-" ती आवळलेल्या दातांतन कशीतरी म्हणाली. पण त्या बाईचा तिच्यावर विश्वास बसला नव्हता हे उघड होतं.
"तुम्ही एकट्याच आला आहात का? बरोबर कोणी नाही का?"
पुन्हा एकदा तो भ्रमिष्टपणाचा संशय! ती आधीच डोक्यातील कलकलाटाने कावली होती, संतापून ती काहीतरी तिखट बोलणार होती. पण ती एकदम थांबली. एकादा लाऊडस्पीकर बंद केला की गोंगाट एकदम थांबतो तसा तिच्या डोक्यातला कोलाहल एकदम थांबला होता. क्षणभर तिचा विश्वासच बसला नाही. पुन्हा तो आघात होईल या धास्तीने तिने शरीर गच्च आवळून धरलं होतं. पण एत मिनिट गेल, दोन मिनिटं गेली. मग तिने सावकाश श्वास सोडला आणि चेहऱ्यावरचे हात खाली घेतले. आपला चेहरा किती पांढराफटक पडला आहे याची तिला कल्पना नव्हती. आता कोठे तिने मान वर करून त्या बाईकडे पाहिलं. बिचारीचा चेहरा काळजीने व्याकूळ झाला होता. मदतीला चटदिशी आली हाच तिचा मोठेपणा, तिच्यावर राग कशासाठी?
"मला काही होत नाही. जरा चक्कर आली होती. आता बरं वाटतयमी जाईन एकटी घरी-आणि थक्स हं!" ती घाइघाईने उभी राहिली. त्या बाईचा चेहराच सांगत होता की तिच्या शब्दावर तिचा विश्वास बसलेला नाही. पण आता त्यावर विचार करायला

वेळ नव्हता. आधी घर गाठायला पाहिजे. आज पायी जायलाच नको, बस बरी. पुन्हा केव्हा तो वज्राघात पडेल याची शाश्वती नव्हती. ती लगबगीने पार्कबाहेर पडली.

साडेसहाचा ठोका पडत असतानाच ती घरात शिरली. नरेंद्र अजून घरी आला नव्हता. याने तिला हायसं वाटलं. नाहीतर तिच्याकडे एक नजर टाकताच त्याने ओळखल आततं की काहीतरी झालं आहे! आणि प्रश्नांची सरबत्ती केली असती. त्याला काय नि कसं सांगायचं हा मोठा प्रश्न होता. कारण या पहिल्या क्षणापासूनच तिला समजलं होत की सांगताना आपला गोंधळ होणार आहे, जो प्रकार झाला त्याच्या विचित्र भयानकपणाची, स्वतः अनुभवलेल्या तीव्रतेची खरी कल्पना ती केवळ शब्दांनी देऊन शकणार नाही. त्या अनुभवाच्या वर्णनासाठी शब्दच नव्हते. शब्द म्हणजे गाळणी होती. त्यांच्यातून महत्त्वाचा असा कितीतरी भाग गळून जाणार होता. उरलेल्या निरर्थक चोथ्याचा अर्थ नरेनला समजलाच नसता आणि बाकीच्यावर त्याचा विश्वास बसला नसता. तिची खरी अडचण हीच होती. कोणाचाच विश्वास बसला नसता! अनुभवा. तला हा वेगळेपणा तिने पहिल्या क्षणालाच ओळखला होता, आणि मनात अशी भीती होती की हा प्रकार एवढ्याने संपलेला नाही.

तोंड धुवून, कपडे बदलून ती बाहेरच्या खोलीत येऊन बसली. अजूनही तिच्या शरीरावर मधूनच भयाचा सरसरता काटा येऊन जात होता. भीती नैसर्गिक होती हे तिला पटत होतं, पण भीतीने मनाचा तोल ढासळू देता उपयोगी नव्हता. विचार आवश्यक होता. शांत, सर्वांगीण, साधकबाधक विचार.

पूर्वी असं कधी झालं होतं का हे तिने आटवून पहायचा खूप प्रयत्न केला. जवळपास कोणी नसतानाही तिच्या नावाने कोणीतरी हाक मारल्याचा तिला एक दोनदा भास झाला होता. एवढी एकच आठवण तिला येत होती. बाकी काहीही नाही. असे विकृत भास नाहीत, भयानक वेडीविद्री स्वप्न नाहीत, काहीही नाही. आकाशातून कडाडत येणाऱ्या विजेसारखा हा आघात अचानक, अनपेक्षितपणे आला होता. पण तिला समजलं की प्रश्नाच्या मूळ गांभ्यापासून ती कचरून दूर दूर रहात होती. तिला जो हसण्याचा आवाज ऐकू आला होता, (ज्याच्या खरेपणाबद्दल तिच्या मनात काडीचीही शंका नव्हती) तो कोणाच्या हसण्याचा होता? किंवा जरा वेळाने तिला जो विव्हळत्या यायचा आवाज ऐकू आला होता, जी एका भयानक अंधाऱ्या वृक्षराईची जाणीव झाली होतीती जागा कोणती होती? अशी स्थान, अशी माणसं खरोखरच कोठे अस्तित्वात होती का, की ज्यांची जाणीव तिला जराशा अकल्पित मार्गाने होत होती? आणि मग त्या झाडांखालून लपतछपत सरपटणारं ते काय होतं? त्यालाही

खरंखुर अस्तित्व होतं का? तिच्यावर हा भलताच प्रसंग का यावा? तिने असा काय गुन्हा केला होता की ती या असह्य जाणीवांच्या काटेरी चक्रात अडकावी?
बाहेरचं दार खडखडलं. ती केवढ्यांदातरी दचकली. मग तिला आठवलं की नरेन यायची वेळ झाली आहे. पण त्याच्या येण्याने अपेक्षित समाधान मात्र झालं नाही. त्याचं तिच्यावर जिवापाड प्रेम होतं, पण तिला आतापासूनच माहीत झालं होतं की, त्याची तिला कसलीही मदत होणार नाही. हे अभिज्ञान, ही खात्री, हा सुद्धा विस्तारलेल्या नव्या संवेदनक्षमतेचाच एक भाग असावा अशी तिला शंका येत होती.म्हणून त्याच्या सत्यतेबदल शंका नव्हती, मनात एक कडवट असहायता मात्र होती.
तिने उठून दार उघडलं. नरेन हसतच आत आला.
“का? आज अगदी कडीकुलपात बसली होतीस?”
“काही नाही - सहज कडी घातली होती-” ती आत जायला वळली, पण नरेनने तिचा दंड पकडून तिचं तोंड आपल्याकडे वळवलं. “नंदा!” तो तिच्याकडे निरखून पहात होता. “ आज तू अपसेट झालेली दिसते आहेस!”
“काही नाही-बागेत गेले होते पण डोक जरा जड झालं म्हणून लौकर परत येऊन बसले होते-” त्याच्या हातातून हात सोडवून घेत नंदा म्हणाली आणि घरात गेली. नरेनने “काही गोळी वगैरे घेतलीस का? ” “डोक्याला मेंथॉल चोळू का? ” अस अनेक वेळा विचारलं. पण त्याच्यासमोर हसरा चेहरा ठेवून वावरण्यापेक्षा या प्रश्नांना काही तरी उत्तरं देणं तिला जास्त सोपं गेलं. ती रात्र येण्याची वाट पहात होती. मन एकीकडे त्या चमत्कारिक प्रकाराच्या पुनरावृत्तीची अपेक्षा करीत बिचकत होतं. नरेनच्या शब्दांकडे लक्ष देण, त्याच्या प्रश्नांना उत्तर देणं हे तिला फार कठीण जात होते. हा ताण तिला फार वेळ सोसवला नसता. रात्र पडली, दिवे मालवले, तेव्हा नंद जरा समाधानानेच कॉटवर आडवी झाली.
नरेनचा हा अलगद तिच्या कपाळावरून फिरला “नंदा! तुझं कपाळ गरम लागतंय! अजून डोकं दुखतंय का?” त्याच्या आवाजातली काळजी आणि जिव्हाळा मनाला चटका लावणारा होता. नरेनला आपण काहीही सांगू शकत नाही याचा विषाद तिला विलक्षण जाणवला, आणि तिच्या डोळ्यांत टदिशी पाणी आलं. “नंदा! अग काय होतंय ते मला सांग ना!” तो पुन्हापुन्हा विचारत होता, आणि त्याच्या शब्दागणिक अधूंचा ओघ वहातच होता. नंदा काहीच बोलली नाही, मुसमुसत त्याच्या कुशीत शिरून. डोळे मिटून पडून राहिली.
त्याची जवळीक होती, पण ती शारीरिक होती. मनाला कोणताही आधार मिळत नव्हता. शब्द अशक्य होते, कारण शब्दांनी गैरसमज मात्र वाढतात. प्रत्येकासाठी

शब्दाना वेगवेगळा अर्थ असतो. नंदा काहीच बोलली नाही. देवापाशी झोपेसाठी प्रार्थना करीत राहिली. नरेनचे प्रश्न काही वेळाने थांबले. ते अनुत्तरित प्रश्न म्हणजे त्याच्यावर अन्याय होता हे तिला समजत होतं, पण प्रश्नांची खरी उत्तरं दिली असती तर त्याच्या यातना हजारपटींनी वाढल्या असत्या. पुन्हा जर तो अनुभव आला नाही तर मग काहीच बोलायची वेळ येणार नाही. आणि मग मी नरेनची हजारपटींनी भरपाई करून देईन, ती स्वतःशी म्हणत होती.

मधेच केव्हातरी तिला झोप लागली.

... ती एका ओसाड मैदानावरून धावत होती. गरम हवेच्या झळा शरीराला चटके देत होत्या. श्वास छातीत अडकला होता तो हुंदक्यांनी बाहेर पडत होता. पायांत पेटके आले होते. एक पाऊल पुढे टाकणं मुष्कील होत होत, तरीही ती धावत होती. शरीराची नस आणि नस भीतीने थरथरत होती. भीती कशाची होती? तिच्या पाठलागावर काहीतरी येत होतं. क्षणाक्षणाला त्या दोघातलं अंतर कमी होत होतं. त्याचा आवाज. आता कानावर यायला लागला होता. घुमल्यासारखा एक आवाज. आणि त्याचा पायरवही कानावर यायला लागला होता. खडकावर आपटणाऱ्या, घसरणाऱ्या कठीण नख्या. आणि आता त्याचा गरम, दुर्गंधीयुक्त श्वासही मानेवर जाण वायला लागला होता. एक पाऊल, आणखी एक पाऊल मागून झेप घेऊन ते तिच्या अंगावर पडलं. ती खाली कोसळली. तीक्ष्ण नख्या शरीराचं मांस ओरबाडत होत्या. ओरडायलाही छातीत श्वास नव्हता. हातपाय झाडून ती त्या मगरमिठीतून सुटायची तडफड करीत होती, गरम श्वास मानेपाशी आला. गळ्याजवळ आला. सगळं बळ एकवट्न तिने जोराची किंकाळी फोडली अणकुचीदार दात गळ्यात रोवले.

“नको! नको!! आई...”

कोणीतरी तिचे हात गच्च आवळून धरले होते. कोणाच तरी अस्पष्ट आवाज कानावर येत होता. “नंदा! नंदा! अग नंदा! जागी हो ना!” कोणीतरी तिच्या ओठांवर हात ठेवला होता नंदाने डोळे उघडले. आधी डोळ्यांना काही दिसेनाच. अंधारी आल्यासारखं झालं होतं. आणि मग नरेनचा चेहरा सावकाश स्थिर झाला. तिची मान अजूनही जोरजोरात हलत होती. केस आणि उशी घामाने ओली झाली होती. तिला शुद्धीवर यायला आणखी पाचसात सेकंद लागले आणि मग ती अगदी हमसून रडू लागली.

ते स्वप्नच असलं पाहिले. पण भीतीची ती भावना इतकी प्रखर होती की नुसती आठवण होताच तिच्या शरीराला कापरं सुटत होतं. खरोखरच खूप अंतर पळून आल्यासारखे पाय ठणकत होते. डोळ्याची आग होत होती. ओरडून ओरडून घसा

कोरडा पडला होता. तिने नरेनला ते सांगितलं. बागेतला प्रसंगही सांगितला. तो जरी "नुसत्या स्वप्नाला इतकी काय घाबरतेस? झोप आता –" असं तिला पुन्हा पुन्हा सांगत होता तरी त्याला स्वतःला वाटणारी काळजी त्याच्या डोळ्यांत दिसत होती. आणि नंदा निपचित पडून राहिले तरी टक्क जागी होती. झोपेचीच तिला भीती वाटत होती. पण संध्याकाळी तिचा तो आवाज ऐकू आला तेंव्हा ती झोपेत नव्हतीखरं म्हणजे प्रत्येक क्षणच धोक्याचा होता.....

...ती एका अंधाऱ्या विवरात अगदी मागे अंग चोरून बसली होती. छातीच्या पिंजऱ्यात काळीज फडफडत होतं. विवराच्या बाहेर काहीतरी होतं आणि ते तिचा शोध घेत होतं. तिखट-उग्र दर्पाबरोबरच राक्षसी रक्तलालसा आतवर पोचत होती. विवराचं दार क्षणभर झाकलं गेलं... एक अजस्त्र काळा आकार विवरावरून पुढे गेला होता. तो परत आला...विवरापाशीच थांबला... एन राक्षसी पंजा दारातून आत आला . . .नख्या खडकावर घासत होत्या... पंजा तिचा शोध घेत घेत आतपर्यंत आला होता...तिच्यापासून काही इंचापर्यंत येऊन तो थाबला होता ...नख्या खालची खडक आणि माती उकरत होत्या. तिने आणखी मागे सरायचा प्रयत्न केला, पण मागे खडक होता ... पंजा सपाट्याने पुढे आला...अंगावर नख्यांचे जळते वळ उमटले ... ती किंचाळली. आणि मग शेवटचा आघात झाला...मासांत रुतलेल्या नख्या तिला विवरातून बाहेर ओढून काढत होत्या... क्षीण हातांनी ती बाजूचे खडक पकडायचा प्रयत्न करीत होती...आणि किंचाळत होती....

तोंडावर गार पाण्याचा शिडकावा झाला. मोठा ठसका लागून तिने डोळे कसेतरी उघडले...नरेन तिला गदागदा हलवत होता. तिने एकदाच त्याच्याकडे पाहिलं आणि तिची शुद्ध हरपली.

पुन्हा ती शुद्धीवर आली तेव्हा दिवस उजाडला होता. पण ती अजून कॉटवरच होती. एवढंच नाही, तर तिच्या आसपास माणसं जमली होती. तिचे आई-वडील होते, थोरला भाऊ होता, आणि आणखी एक परके गृहस्थ होते. त्यांच्या चालण्याबोलण्यावरून ते डॉक्टर असावेसे वाटत होतं. आपण का झोंपून राहिलो आहोत हे क्षणभर तिला समजलंच नाही आणि तो उठून बसायचा प्रयत्न करू लागली. पण नरेन घाईने पुढे झाला आणि तिच्या खांद्यावर हात ठेवून त्याने तिला परत कॉटवर झोपवलं.

"नंदा जरा पडूनच रहा-" तो हलकेच म्हणाला, "तुला जरा बरं नाहीयू-तू पडूनच रहा-"

"पण मला काहीही झालेलं नाही-" ती तक्रार करीत म्हणाली; आणि मग तिला संध्याकाळचा बागेतला, आणि रात्रीचा बेडरूममधला प्रसंग आठवला...आपण

किती वेळ बेशुद्ध होतो? इतकं सर्वांना बोलावण्याइतका प्रकार गंभीर होता का? सर्वांच्या चेहऱ्यावर किती काळजी दिसते! एकेकाच्या चेहऱ्याकडे पहाता पहाता तिच्या मनातून विचार सरकत होतेप्रसंगाची तिच्याच मनात सांगड बसत नव्हती; पण ती जर मोठमोठ्याने रडली असेल, किंचाळली असेल; धावाधावा करायल लागली असेल तर त्या सर्वांची काळजी अगदी सहज समजण्यासारखी होती. त्यांना वाटलं असेल, नंदाला...नंदाला...वेड लागलं! त्या विचारासरशी तिने डोळे खाडकन उघडले आणि ती धापा टाकीत बोलायला लागली,

‘‘नरेन! आई! मला वेड नाही हो लागलं! मी खरोखरच वेडी नाही!”

‘‘शू!”डॉक्टर पुढे होत म्हणाले, “कोण म्हणालं तुम्हाला वेड लागलं म्हणून! काहीतरीच समजूत करून घेऊ नका हं! जरा 'अपसेट झाला आहात ... बाकी काही नाही! आता मी तुम्हांला जरा तपासतो-”

“पण मला तुम्ही काय झालं ते विचारतच नाही! “ती आश्चर्याने म्हणाली आणि त्याच आश्चर्याचं प्रतिबिंब डॉक्टराच्याही चेहऱ्यावर उमटलं. ते जरासे हसले आणि एक खुर्ची जवळ ओढून तिच्यावर बसले.

‘‘सॉरी-” ते म्हणाले, “मी आधीच विचारायला हवं होतंपण मला वाटलं होतं तुम्हाला थकवा आला असेल हरकत नाही सांगा.”

तिने सांगायला सुरुवात केली तेव्हा तिला समजलं की नुसत्या शब्दांनी तिचे अनुभव सांगणं अतिशय कठीण होतं. पार्कमधला आवाज किंवा मग एक अंधारी जागा पाहिल्याचं सांगणं सोपं होतं ... पण ती जेव्हा उन्हातली धावपळ सांगायला लागली, तशी तिची जीभ अडखळली आणि ती थांबली. कारण त्यांना ते स्वप्नच वाटत होतं. त्याची प्रखरता, सत्याची विलक्षण प्रचीती याची ती कल्पनाच देऊ शकत नव्हती. त्यांना कळत नव्हतं की तिचा स्वतःचा रणरणत्या दुपारी पाठलाग झाला होता, तिच्या मानेत राक्षसी दात रुतले होते. ... किंवा विवरात ती स्वतः दडली होती, प्रचंड पंज्याने ओढून बाहेर काढलं ते तिचं शरीर होतं, कातडी सोलून रक्तबंबाळ झालेलं शरीर तिचं होतं. स्वप्न किंवा भास इतका प्रखर असू शकेल यावर तिचा विश्वास बसत नव्हता आणि त्यांना कशाचाच अर्थ कळत नव्हता. ते ऐकत होते ते केवळ तिचं मन मोडायला नको म्हणून; एखाद्या वेड्याची समजूत काढावी अशासारखं वेडी!

“मला माहीत आहे तुम्हांला काय वाटत आहे ते!” ती एकदम किंचाळली; “मला वेड लागलं आहे-हो ना? “आणि मग अशक्ततेने तिला धाप लागली आणि ती रडायला लागली.

“नरेन! डॉक्टर! तसं नाही हो! हे वेगळंच काहीतरी आहे! तुम्ही त्याचा नीट अर्थ समजून घ्या ...” ती हताश होऊन गादीवर कोसळली.

...पाण्याची फेसाळणारी कड जवळ जवळ येत होती आणि तिला हलताच येत नव्हतं. पायच नाही, तर सारं शरीरच कसल्यातरी चिकट द्रावात रुतून बसलं होतं. तिथून सुटण्यासाठी तिने आटापिटा केल्याची एक स्मृती मनात होती, पण आता अवयवांत त्राणच उरलं नव्हतं. पाण्याची कड एखाद्या अधाशी जनावरासारखी सारखी पुढे सरकत होती. लाटेवरचा फेस वासलेल्या जबड्यातल्या दातांसारखा दिसत होता. पाणी तिच्यापर्यंत पोचलं. शरीराला एक मखमली स्पर्श करून मागे सरलं. हा गोंजारणारा मखमली स्पर्श विषारी होता. शरीरातलं सर्व बळ एकवटून तिने एक उसळी मारली. पण व्यर्थ! एखादा इंचच ती हलली असेल...पाणी पुन्हा आलं...त्याला घाई नव्हती .. ते आपला वेळ घेत तिला सावकाश मारणार होतं...त्याच्या तावडीतून ती आता सुटत नव्हती...मऊसर, गारेगार, रेशमी हातांनी ते तिला मारणार होतं...त्याचे चमकणारे पदरामागून पदर तिच्यावरून जातील...नाक, तोंड, डोळे, कान सर्वांवाटे ते शरीरात शिरेल...शरीरातला कानाकोपरा त्या फेसाळणाऱ्या पाण्याने भरून जाईल...

ती किंचाळली...पण पाण्याच्या गर्जनेत तो क्षीण आवाज केव्हाच विरून गेला...पाणी तिच्या शरीरावरून पुढे गेलं होतं...छातीपर्यंत आलं ... गळ्यापर्यत आलं....तोंडापर्यंत आलं..

“नको....नको .. आई!”

एका बाजूने नरेनने आणि दुसऱ्या बाजूने डॉक्टरांनी तिला धरलं होतं. तिचं सर्व अंग ओलं झालं होतं, पण पाण्यानं नाही, घामानं! चेहऱ्यावरून घाम निथळत होता, कपडे चिंब भिजले होते...कानात घुमणारा पाण्याचा आवाज गेला होता आणि नवे व्यायत आवाजातले शब्द कानी येत होते

“नंदा! अग नंदा! असं काय करतेस ग! शुद्धीवर आलीस का?”

तिने डोळे मिटूनच मान हलवली. अशक्तपणा आला होता नी शरीराचा सांधा न सांधा दुखत होता. यांना काय वाटेल? तिच्या मनात तो एकच विचार थैमान घालत होता...पण डोळे उघडून त्यांच्याकडे पहायची सुद्धा तिच्या अंगात शक्ती नव्हती.... त्यांच्यापाशी वाद घालून आपण वेडे नाही याची खात्री पटवणं तर तिला कल्पनेतसुद्धा आणता येत नव्हतं ...

दंडाला एकदम काहीतरी टोचलं. झोपेचं औषध असलं पाहिजे. आणि अगदी जालीम. कारण तिने डोळे उघडायच्या आतच मेंदूवर गुंगी चढायला लागली होती....शरीरातली सर्व चेतना डोक्याकडे खेचली जात होती...हातापायांच्या

टोकापासून शक्ती खेचली गेली. शेवटी सर्व जाणीव मेंदूत फक्त उरली संवेदना गेली, स्वतःची ओळख गेली, तो रसरसता अंगांर मंद झाला, क्षीण झाला, मालवला गेला.

तिने डोळे उघडले तेव्हा ती तिच्या खोलीत नव्हती. पांढरं छत, पांढऱ्या भिंती. हॉस्पिटल! हे खरं आहे की पुन्हा एकदा आपण भरकटत आहोत? या विचाराने काळजाने एक पलटी घेतली, पण तिची हालचाल दिसताच एक हसतमुख नर्स तिच्यापाशी आली होती. ते पहाताच तिची भीती ओसरली.. तरीही खात्री करून घेण्यासाठी ती हलकेच म्हणाली,

“मला हॉस्पिटलमध्ये आणलंय ना?”

“हो. पण तुम्ही फार दिवस इथे रहाणार नाही बरं का! चांगल्या बव्या होऊन अगदी लवकर घरी जाणार आहात ... आणि आता शांत पडून रहायचं काही बोलायचं नाही, हालचाल करायची नाही डोळे. मिटून पडून रहायचं...”

तिने डोळे मिटून गेतले. पण ती मनाला शांत कशी ठेवणार?

नरेनचा आवाज ऐकताच तिचे डोळे आपोआप उघडले. तिला जागी पहाताच त्याच्या चेहऱ्यावर एकदम हास्य आलं. तो किती लगबगीने तिच्या कॉटशेजारी आला! तिच्या केसांबरून हात फिरवीत नरेन म्हणाला, “आता कसं वाटतं नंदा? झोप चांगली लागली होती का? “पण त्याच्या प्रश्नाकडे तिचं लक्षच नव्हतं.

“नरेन, मला कुठे आणलं आहे?”

का बरं? हॉस्पिटलमध्ये-”

“हॉस्पिटलमध्ये कशाला आणलं? हे वेड्यांचं हॉस्पिटल आहे का?”

“नंदा! हे काय भलतंच मनात भरवून घेतलं आहेस? तुला बरं नव्हतं, घरी उपचार झाले नसते...तुला बरं नव्हतं हे तरी खरं ना? सांग!”

“हो.” तिने नाईलाजाने कबूल केले. पण त्यांची समजूत होती तसला आजार तिला झाला नव्हता....तिला वाटत होतं, निदान नरेनला तरी आपली खरी स्थिती समजेल, त्याला तरी सगळे सांगावं. पण मग मनात शब्दांचा गोंधळ झाला, जीभ अडली, शब्दच बाहेर येईनात. डोळ्यातून पाणी मात्र वहायला लागल.

“नंदा, प्लीज! असं काय बरं करतेस? लवकर बरं व्हायचंच ना -तुला?”

“नरेन-नरेन-मला खरोखरच काही होत नाही हो! फक्त हे भयानक अनुभव येतात. पण ते खरे आहेत, भास नाहीत. मी खरोखर वेडी नाही हो.-”

डोळे मिटून घेऊन ती हुंदके देऊन देऊन रडू लागली. नरेन काही न बोलता तिच्या केसांवरून सावकाश हात फिरवीत राहिला....हुंदक्यांनी पिळवटून निघालेली तिची अशक्त काया पाहता पाहता त्याचेही डोळे भरून आले होते.

तिच्याभोवती धूर पसरला होता. दशदिशा धुराने काजळल्या होत्या. काय करावं, कोठे जावं, काहीच सुचत नव्हतं. ती जागच्याजागीच हबकून उभी होती. वारा वहात होता. आपल्याबरोबर जळणाऱ्या पानांचा, फांद्यांचा तीव्र तिखट-कडवट वास घेऊन येत होता. ज्वालांवरून वहात येणारा हा वारा गरम होता. तिच सारं शरीर थरथरत होतं. धुराचे लोट आणखी जवळ आले. हवा जाणवण्याइतकी गरम झाली. धुरापलीकडचं काहीच दिसत नव्हतं. कोणत्या दिशेला सुटका आहे आणि कोणत्या दिशेला घात आहे याची कल्पनाच येत नव्हती.
एका बाजूचे धुराचे पदर वाऱ्याने फडफडत दूर झाले आणि धुरामागची सोनेरी, धडधडती ज्वाला दिसली. तिने विरुद्ध दिशेला तोंड वळवलं आणि धुरातून कसा तरी मार्ग काढायला सुरुवात केली. इतरही अनेक अस्पष्ट आकार तिच्या पुढे, शेजारी आणि मागे धावत होते. ज्याला त्याला आपल्या जिवाची काळजी होती. शिकार-शिकारी, भक्ष्य-भक्षक, सगळेच एका पातळीला आले होते. आणि सर्वांचीच वाट अमीच्या रिंगणाने अडवली होती. चारी बाजूनी आगीचे लोळ उठत होते. धुराचा खकाणा बसत होता. डोळ्यांवाटे पाणी वहात होत...नाक चुरचुरत होतं... हवा छातीला जाळत होती...
जेव्हा कोठेच जायला मार्ग उरला नाही तेव्हा ती थांबली. राक्षसी आकार घेतलेल्या ज्वाला शरीरावर झडप घालायला टपल्या होत्या. एक शरीराला अगदी चाटून गेली....अंगावरचे केस होरपळले....दुसरी आणखी लगट करायला आली... उपयोग नाही हे माहीत असूनसुद्धा तोंडातून आर्त किंचाळी निघालीच...आणि मग चारी दिशांनी सहस्र जळते हात आले... कोणीही वाचवायला नव्हतं. तरी ती किंचाळत होती
“नको; आई ग! नको! नको! वाचवा हो!...”
नरेनच्याच नाही, तर डॉक्टरांच्यासुद्धा डोळ्यांत काळजी दिसत होती. नंदा त्यांच्याकडे आळीपाळीने पहात सोती. शेवटी ती ओढलेल्या आवाजात म्हणाली,
“डॉक्टर, खरं सांगा–मला काय झालं आहे? ”
“नंदाताई, मी तुम्हाला फसवत नाही आणि खोटं समाधानही देत नाही. तुमच्यात काहीतरी बिघाड झाला आहे हे तर तुम्हालाही जाणवतं ना? मी अगदी प्रांजळपणाने सांगतो की मला ह्या सेन्सेशन्सचा नीटसा अर्थबोध होत नाही. सल्लामसतीसाठी मी एका तज्ज्ञांना बोलावलं आहे. ..”
तिचा उतरलेला, गोरामोरा झालेला चेहरा पाहताच ते म्हणाले,
“तुम्हाला बरं व्हायचंय ना? मग रोगाशी झगडलं पाहिजे - आमच्याशी नाही. आम्हाला तुमची मदत मिळाली तर उपचार अधिक यशस्वी होतील...”

ते गेल्यावर नरेन तिच्यापाशी बसून राहिला. नंदाचे डोळे त्याच्या वर खिळले होते, त्यांच्यातली तगमग त्याला पहावेना. तो शेवटी म्हणाला,

“नंदा, तुला काही बोलायच असलं तर बोल बरं का-तेवढंच तुला हलकं वाटेल...”

“काय बोलणार आता? ” ती विलक्षण निराश आवाजात म्हणाली.

“का बरं? तू आता लवकरच चांगली ठणठणीत बरी होशील की!”

“तुमचा खरोखरच त्यावर विश्वास बसतो? का आपलं माझ्या समावानासाठी बोलता? .... नरेन, नरेन! तुम्हाला दुखवायच्या हेतूने नाही हो मी तसं म्हणाले ... पण मला ही सगळी लक्षणं अशुभ बाटतात. स्वप्न असो, भास असो ... दरवेळी मला मृत्यूचाच अनुभव का येतो? पुढच्याच संकटाची ही सूचना आहे असं मला वाटायला लागलंय ... आणि मरणाच्या यातनांतून मी इतके वेळा गेले आहे की मला आता त्याची भीतीच उरली नाही ...”

“नंदा ... नंदा ...!” नरेन तिला गप्प करायचा प्रत्यन करीत होता.

पण ती जवळजवळ स्वतःच्याच तारेत बोलत हीती.

“मी पाण्यात बुडून मेले आहे, आगीत होरपळून मेले आहे, राक्षसी पंजांनी माझं शरीर रक्तबंबाळ केलं आहे . . . आता आणखी काय बाकी उरलं आहे? मरण येईल ते यापेक्षा वेगळं काय असणार? यापेक्षा भयानक असं काय असणार?... नरेन! मला कशासाठी गप्प करता? आताच्या चारदोन शब्दांनी काय फरक पडणार आहे? जे व्हायचं ते होणारच आहे, ते अटळ आहे. ”

खोलीत पावलं वाजली ... डॉक्टर आणखी एका वयस्क गृहस्थांना घेऊन खोलीत आले होते नंदाची नजर या परक्या गृहस्थांच्या चेहऱ्यार खिळली. टक्कल पडून केस मागे गेले होते, त्याने कपाळ आणखीच रूंद वाटत होतं, आणि कपाळभर समांतर अशा खोल आडव्या आठ्या पडल्या होत्या. त्याच्याखाली दाट भुवया होत्या आणि त्याहीखाली तीक्ष्ण, भुरे, पाणीदार डोळे होते. नंदाला एकाएकी या माणसाची भीति वाटायला लागली. आधारासाठी तिचा हात चटदिशी नरेनच्या हातात शिरला. वेडेपणाच्या सर्टिफिकेटाला दोघा डॉक्टरांची संमती लागते असं तिने कोठेतरी वाचलं होतं, शरीर अगदी लहान करून कोठेतरी लपून बसावंसं वाटत होतं, पण त्या भुऱ्या डोळ्यांच्या कात्रीत सापडलेली नजर सुटतच नव्हती. नरेन उठून उभा राहिला. त्याला आपल्या जवळच बसवून घ्यायची तिने खटपट केली, पण तिच्यात तेवढी शक्तीच नव्हती.

“मी म्हणत होतो ना, ते डॉ. शहा हेच. ते आले आहेत नंदाताईना पहायला.” डॉक्टर हसत म्हणाले. (उसन हास्य, नंदाला वाटलं.) डॉ. शहांनी कॉटशेजारची खुर्ची घेतली. आधी ते काहीच बोलले नाहीत, त्यांनी नंदाची संपूर्ण तपासणी केली. मग बराच वेळ

ते डोळे मिटून विचार करीत बसले. आणि मग त्यांनी तिला प्रश्न विचारायला सुरूवात केली. त्यांचा आवाज किंचित घोगरा होता. उच्चार सावकाश आणि स्पष्ट होत होते. तिच्या मनात नसतानाही ती त्यांच्या प्रश्नांची उत्तरं देऊ लागली. आतापर्यंत तिने हे सारं इतके वेळा सांगितलं होतं की ते तिला मुखोद्गतच झालं होतं. पण जरा वेळाने शहांचे प्रश्न बदलले. तिला तरी त्यांच्यात कोणतीच सुसंगती दिसत नव्हती. जणू अवचित मनात येईल त्या विषयावर ते प्रश्न विचारत होते. तिला सारखं वाटत होतं, त्यांना सांगाव, आता पुरे, माझं डोकं दुखतयं, मला बोलवत नाही...
तिच्याभोवती गडद अंधार होता. एवढच नाही, शरीरावर कसला तरी असह्य बोजा होता. त्याखाली शरीर दडपलं गेलं होतं. नसा म्हणजे वेदनांची जाळी होती. हातपाय हालवता येत नव्हते. श्वासोच्छ्वासही कष्टाचा होत होता. बाहेर पडलेली गरम हवा नाकापाशीच घोटाळत होती-जणू तिला जायला वाटच नव्हती. सर्व शक्ती एकवटून तिने एक हात हलवला.... हाताला ओलसर, भुसभुशीत माती लागली... तिच्या चारी बाजूंना माती होती... माती! ओलसर, दमट मातीत ती गाडली गेली होती. ...
हातपायच काय, मानसुद्धा हलवता येत नव्हती. ओरडण्यासाठी तिने एकदा तोंड उघडलं... आवाज बदका निघाला आणि खारट मातीचे काही कण तोंडांत गेले... हा शेवट आहे, तिला वाटलं... वेदनांनी शरीर पिजून गेलं होत-त्याची सहनशक्ती संपली आणि नसाही निर्जीव झाल्या. उच्छ्वासाची तीच तीच गरम हवा तोंडाभोवती सांचत होती; श्वासाने समाधान होईना; धाप लागल्यासारखा पुन्हा पुन्हा श्वास ध्यावा लागत होता... डोळ्यातलं पाणी मातीत मिसळत होतं, गालावर त्याचा लगदा होत होता... आपण आता फार तग थरू शकणार नाही, ही तिची खात्री झाली. विषारी हवेने एव्हानाच गुदमरल्यासारखं होत होत...डोक्यांत भणभण सुरू झाली होती...एक शेवटचा प्रयत्न....
“वाचवा हो! मी मेले! सोडवा! ...”
नरेनने तिला छातीशी धरलं होतं आणि ती रडत होती. डॉ. शहा शेजारीच उमे होते; तिच्याकडे विचारी मुद्रने पहात स्वतःशी मान हलवत होते; नंदाने एकदाच डोळे भरुन नरेनकडे पाहिलं आणि डोळे मिटून घेतले. तिची. शुद्धच हरपली होती.
ती परत भानावर आली तेव्हा तिला दिसलं की ती आता एका वेगळ्याच खोलीत आहे. कॉटभोवती नाना प्रकारची चकचकती उपकरणं होती. डावा हात सलत होता-तिथे सुई खोचली होती आणि तिच्यावाटे शरीरात कसलं. तरी द्रव जात होतं. दुसरं हॉस्पिटल!
शेजारी नरेन होता, पण त्याच्यावर वळलेली तिची नजर रिकामी होती, निर्विकार होती. भावनांचं ओझंसुद्धा आता जड झालं होतं.

“नंदा!” जवळ सरकत तो हलकेच म्हणाला. तिने फक्त मानः हलवली. तिला काहीही बोलायची ताकद नव्हती आणि इच्छाही नव्हती. तिच्या नजरेतली विरक्ती नरेनच्या काळजाला भिडली. तो आवेगाने म्हणाला, “नंदा! अशी हताश नको होऊस ग! आम्ही काय वाटेल ते करू-पण तुला बरी करू! मात्र तू आशा सोडता कामा नयेस!”

ती त्याचे शब्द ऐकत होती; तिला त्यांच्या अर्थही समजत होता; पण त्याच शब्दाच्या मागे, एखाद्या हलत्या पार्श्वभूमीसारखे, गेल्या काही दिवसातले प्रसंग सरकत होते. तिचा मेंदू आणि तिचं शरीर त्या प्रचंड चक्रातून पिळवटून निघालं होतं, निःसत्त्व झालं होतं. आयुष्याची इच्छाच आता ओसरली होती. तिच्याविरुद्ध जी एक संहारक, राक्षसी शक्ती गदारोळ करून उठली होती तिच्याशी मुकाबला करायला तिच्यापाशी कोगतंच साधन नव्हतं; कोणाची मदतच नव्हती. ती एकटी होती! वेदनेच्या या कोषात ती एकटी जखडली होती- निर्वाणीच्या या क्षणी हा असहाय एकटेपणा, ही दुर्बलता एखाद्या जहरी विषासारखी तिच्या मेंदूत भिनत होती.

नरेनच्या प्रेमाचा, डॉ. शहांच्या कौशल्याचा, इतर सर्वांच्या सहानुभूतीचा तिला काडीमात्रही उपयोग नव्हता. अलिप्तपणाच्या तिच्या कवचाच्या आत कोणीही पोचू शकत नव्हतं... तिचा अपराध किंवा गुन्हा काय होता ते तिला शेवटपर्यंत कळणार नव्हतं... केव्हातरी या जगाचा पाश कमकुवत ठरणार होता, मृत्यूच्या क्षणापासून ती स्वतःला वाचवू शकणार नव्हती आणि तिची ही इवल्याश्या ठिणगीसारखी प्राणाची ठिणगी अथांग अंधारात कोठच्या कोठे भिरभिरत जाणार होती... दुदैवी ती आणि दुदैवी नरेन!

विचारांची ही स्पष्टता फार क्षण टिकली नाही. तिच्या भोवतीच खरं (हाही आता प्रश्नच होता!) जग विरघळत होतं, त्या रेषांची पुनर्रचना होत होती आणि या नव्या रचनेला एकच अर्थ होता-मृत्यू!

नियंत्रण नसलेल्या यंत्रासारखी घटनांची गती बेताल झाली होती. अंधाऱ्या जागेत एखादाच कवडसा पडावा तशी नरेनची किंवा डॉ. शहांची आकृती मध्येच डोळ्यासमोर येत होती... पण त्यांच्याशी तिला संपर्कच साधता येत नव्हता. आरशातल्या प्रतिबिंबासारख्या त्या आकृती स्पष्ट, रेखीव पण अस्पर्य आणि असत्य वाटत होत्या...

कधी आपल्या आसपास मोठमोठी यंत्रे भिरभिरताना तिला दिसत. डॉ. शहांचे उपचार चालले असतील किंवा भासांचाच हा एखादा भाग असेल... कुतुहल कमी होत होतं, विरोध क्षीण होत होता, संघर्ष नकोसा होत होता... या जगाला जोडणारा

पाश आता एखाद्या तंतूसारखा नाजूक झाला होता. . . एका लहानशा हिसक्यानेही तो तुटून जाईल आणि मग सर्वच असंदर्भ होईल...

“मी समर्थांना आणणार आहे.” नरेन म्हणत होता. गेल्या काही दिवसांत तो स्वतःच एखाद्या रोग्यासारखा दिसायला लागला होता. नंदाचं शरीर त्याला दिसत होतं, पण तिचं मन कोणत्या भयंकर स्वप्नसंघर्षात गुंतलं असेल याची त्याला कल्पनाही करता येत नव्हती. डा. शहांनी सर्व उपचार केले होते, पण नंदाच्या विकाराचे त्यांना निदानही झाले नव्हते किंवा त्याला ते अवरोधही करू शकले नव्हते. त्यांनी आशा सोडली होती अशातली गोष्ट नव्हती, पण गेल्या काही दिवसांतच रोग्याची प्रकृती इतकी खालावली होती की उपचारांना अवसरच मिळणार नाही अशी त्यांना भीती वाटायला लागली होती. हे समर्थ का कोण होते त्यांचं नाव डॉ. शहांनी कधी ऐकलं नव्हतं; नंदाच्या आजाराचा नरेनवर काही अनिष्ट परिणाम होतो की काय अशी धास्ती त्यांना वाटत होती. तेव्हा या समर्थांना बोलावून त्याला जर काही समाधान मिळत असेल तर त्याला हरकत नव्हती. अर्थात् त्यांच्या या अत्याधुनिक हॉस्पिटलमध्ये हे समर्थ येणार म्हणजे जरा विसंगतीच होती-पण शेवटी आयुष्य म्हणजे विसंगतीचीच एक साखळी होती!

“नरेन, तुझी त्यांच्याबद्दल इतकी खात्री आहे का?”

“मी काय सांगणार? कानावर येतात त्या गोष्टी अविश्वसनीय वाटतातपण मला एक सांगा, नंदाला आता आणखी अपाय तो काय होणार?”

“असं कसं म्हणतोस? आपण प्रयत्न तर करीत आहोतच -”

“डॉक्टर!” क्षणभर नरेनचा संयम ढासळला. “काय होत आहे ते मी उघड्या डोळ्यांनी पाहातोच आहे! तुमच्या ज्ञानाची आणि कौशल्याची मर्यादा झाली आहे सॉरी! मला माफ करा! मी असं बोलायला नको होतं -”

“आय डोंट माईंड!” डॉ. शहा सहानुभूतीच्या आवाजात म्हणाले. “खुशाल बोलाव तुझ्या त्या समर्थांना! नंदाला जर काही फायदा झाला तर सर्वात जास्त आनंद मलाच होईल!”

समर्थांचा पत्ता सहज सापडण्यासारखा होता. पण त्यांच्यासमोर बसल्यावर मग विषयाला सुरुवात कशी करावी हा नरेनला प्रश्न पडला. एकेका क्षणासाठी जीव कसा तगमगत होता. त्याच्या या अस्वस्थतेच्या खुणा समर्थांनी सहज वाचल्या असाव्यात.

“तुम्हांला कसली तरी घाई झाली आहे, हो ना?” ते किंचित हसत म्हणाले.

पुरुषासारखा पुरुष, पण नरेनला नंदाची आठवण येऊन एकदम रडूच कोसाळलं. समर्थांच्यातला बदल झटपट झाला आणि विस्मयकारक होता.

“आपल्याला कोठे जायचंय का?” ते उभे रहात म्हणाले. नरेनची मान हलताच ते म्हणाले, “मग चला तर. वाटेत काय सांगायचं ते सांगा.” आणि गाडीच्या पंधरावीस मिनिटांच्या प्रवासात अडखळणाऱ्या शब्दात नरेनने नंदाची हकीगत सांगितली.
वरच्या खिडकीतून डॉ. शहांचं बाहेर लक्ष होतच. नरेन दिसताच ते घाईने खाली आले. त्यांनाही या समर्थांबद्दल एक कुतुहल वाटत होतच. नरेनने त्यांच्यावर अशी श्रूद्धा दाखवावी या गोष्टीने त्यांच्या मनात थोडीशी तरी कटुता आली होतीच. त्याच्या नकळत नजरेत एक साक्षेपी टीका उमटली होती, खांदे जराशा आव्हानात्मक पवित्र्यात ताठ झाले होते. ते जिना उतरून खालच्या हॉलमधे आले तेव्हा नरेन एका खूप उंच व्यक्तीबरोबर आत येत होता. हेच समर्थ असले पाहिजेत. आणि ते डॉ. शहाकडे पाहून मोकळ्या मनाने हसत होते. इतके दिलखुलास हास्य शहांनी आजवर पाहिलेच नव्हते. ते केवळ हास्य नव्हते, त्यात सहकार्याची विनंती होती, त्यांच्या ज्ञानाला मान होता, मदत करायच्या संमतीची अपेक्षा होती ... मधली पाच पावलं टाकीपर्यंत डॉ. शहा आपले पूर्वग्रह विसरले होते, हात पुढे करीत समर्थांचं स्वागत करायला सिद्ध झाले होते. समर्थ त्यांचा हात हातात घेत म्हणाले.
“डॉक्टर, तुमची हरकत नसेल तर आपण सरळ नंदाच्या खोलीत जाऊ. वेळ फार महत्त्वाचा आहे असं मला वाटतं.”
वर जाताना नरेनची छाती धडधडत होती. नंदाला सोडून गेल्याला अर्धा तास झाला होता. त्या अवधीत काही झालं नसेल ना?
खोलीचं दार अलगद उघडलं. बिछान्यापाशी बसलेल्या नर्सने दाराकडे 'पाहिलं. डॉ. शहा दिसताच ती उठून उभी राहिली. पण नरेनच्या नजरेला कॉटवर निश्चल पडलेली नंदाच तेवढी दिसत होती. सर्व संकेत आणि लज्जा दूर सारून तो म्हणाला, “समर्थ! काहीही करा, पण माझ्या नंदाला वाचवा!....”
समर्थ हलक्या पावलांनी कॉटजवळ गेले आणि एकाग्र नजरेने नंदाकडे पहात उभे राहिले. काहीतरी बोलण्यासाठी डॉ. शहांनी ओठ विलग केले होते, पण ते मनातले शब्दच विसरून गेले. समर्थांची एकाग्रता संसर्गजन्य होती. पुढे येणाऱ्या दिवसांत डॉ. शहांनी खोलीतल्या त्या पाचसात मिनिटांत खरोखर काय झालं यावर विचार करायचा अनेकवार प्रयत्न केला, पण ते आपल्या मनाचं पूर्ण समाधान कधीही करू शकले नाहीत. त्याक्षणी खोली त्यांना भारल्यासारखी वाटत होती; शरीरावरचे केस क्षणभर शहारल्यासारखे झाले होते; एका उंच कड्याच्या काठावर उभं असल्याची भावना झाली होती...तिथून निघण्यासाठी जिवाचा आटापिटा चालला होता...का त्यांनाही भास होत होते?

"ठीक आहे. आता आपण सर्वजण बाहेर जा आणि मला एकट्याला खोलीत राहू द्या. नरेन, एक खात्री बाळग-मी माझ्या प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहे, यश देणं भगवंताच्या हाती आहे. डॉ. शहा, तुमच्या वैद्यकीय मदतीची आवश्यकता भासली तर तत्क्षणी मी आपल्याला बोलावीन. नंदाबद्दल आपण अगदी निर्धास्त असा. कृपया सर्वजण आता बाहेर जा."

तो शब्द मोडणं कोणाला शक्य नव्हतं.

लाल लाल फेसाळणाऱ्या पाण्याबरोबर ती ओढली जात होती. केवळ योगायोगानेच ती काही काळ पृष्ठभागावर तरंगत होती. स्वतःच्या बचावासाठी एवढीशी हालचालसुद्धा तिच्या शक्तिपलीकडची होती. पृथ्वी, आप, वायू, तेज आणि पाणी ही पंचमहाभूतेच तिच्या वैरासाठी उभी राहिली होती. तिच्यासारख्या क्षुद्र जिवाचा काय पाड लागणार?

जिवाच्या या उलघालीत ती सगळं काही विसरली होती. एके काळचं नरेनबरोबरचं सुखी जीवन हे एखाद्या क्षणजीवी स्वप्नासारखं अतिदूर आणि अस्पष्ट वाटत होतं. खरा होता तो मृत्यू!

पाणी आपल्या लक्ष करांनी तिला कवटाळत होतं. तिला खाली ओढत. होतं. हे निळं आकाश आणि ही हिरवी सृष्टी कायमची दृष्टिआड होणार होती. पण आता मनाचा तोल विरुद्ध दिशेस झुकला होता. ती आपण होऊन मृत्यूला सामोरी जात होती...शेवटचा क्षण नजीक आला तशी तिने एक खेदाची नजर आसंमतावरून फिरवली...पाण्याने तिला खाली खेचलं....त्या क्षणी शरीरावर मनाचा ताबा राहिला नाही...शरीराची धडपड ही एक प्रतिक्षिप्त, प्राचीन क्रिया होती....तशीच तोंडातून निघालेली किंचाळीही ...

प्रत्यक्षात तिचे ओठ पुटपुटले—

" आई! नको!"

"नंदा!" त्या कोलाहलातून एक हाक घुमत आली. विरणाऱ्या मनाला. एकत्र बांधणारी, गुंगलेल्या मेंदूला खडबडून जाग आणणारी, रौद्र निसर्गावरही क्षणभर मात करणारी एक स्पष्ट हाक ...

"नंदा!" ती हाक परत आली.

तिने डोळे उघडले. ती दुसरं काही करूच शकत नव्हती. डोळ्यांना ती हॉस्पिटलमधली खोली दिसत होती; पण थकलेल्या मेंदूत ती प्रतिमा स्थिर होतच नव्हती. सारखे हेलखावे खात होती. त्यातच कोणाच्या तरी चेहऱ्याचा अंधुक पांढरा लंबगोल दिसत होता. हे कोण होतं? नरेन? डॉ. शहा? तिने मोठ्या प्रयासाने नजर एकाग्र केली आणि तिच्या डोळ्यासमोर हळूहळू एका चेहऱ्याने आकार घेतला.

चेहरा ओळखीचा वाटत नव्हता आणि एका विचित्र अर्थाने ओळखीचा वाटत होताही. त्या चेहऱ्यात तेज होतं, शक्ती होती, अपार करुणा होती. विशाल भालप्रदेश, दाट काळे केस, पातळसर उभट नाक, निग्रही हनुवटी...आणि डोळे...नितळ, दयार्द्र... त्यांच्यात खोल कोठेतरी सुवर्णकण तरंगत असल्याचा भास होत होता ... जीव गुंतवून ठेवणारे डोळे...हे परके गृहस्थ कोण होते? त्यांनीच तिला हाक मारली होती का? नरेनने आणखी एखादे डॉक्टर आणले होते का? तिची झाली एवढी ओढघस्त पुरे नाही का झाली? आयुष्याच्या सीमेवरची ही रस्सीखेच आता पुरे नाही का झाली? तिला आता सगळ्याचा वीट आला होता...या यातना आता नको होत्या ... सर्वातून सुटका हवी होती .. पहाता पहाता तिचे डोळे पाण्याने भरून आले...मला यातून सोडवा! आता मला हे सहन होत नाही! तिची एकच मूक विनंती होती...
“नंदा, मी समर्थ आहे...” ते गृहस्थ म्हणाले आणि हसले.
मनात क्षणभर आशा जन्माला आली. आशा अमर होती. मृत्यूचा दाहक स्पर्शही तिला भस्मसात करू शकत नव्हता. पण ही आशा आता तिची वैरी झाली होती. तिला आशा नको होती, मृत्यूची चिरशांती हवी होती. तिने आपले डोळे मिटून घेण्याचा प्रयत्न केला पण डोळे मिटतच नव्हते. आणि स्वतःला ' समर्थ' म्हणवून घेणारे गृहस्थ हसत हसत सावकाश नकारार्थी मान हलवत होते.
“नंदा, माझ्याकडे पहा. मी तुझ्या मदतीसाठी आलो आहे.” ते म्हणाले. आवाज हलका होता, पण एकेक शब्द मनात खोलवर जाऊन रुतत होता. मदत? तिला आता कोण मदत करू शकणार? मदतीची आशा तिने केव्हाच सोडली होती. तो विचार म्हणजे शुद्ध यातना होत्या. पण तिचे डोळे मात्र त्यांच्या चेहऱ्यावर खिळून राहिले होते...
किंचित पुढे सरकून समर्थांनी आपला हात तिच्या कपाळावर टेकवला. कपाळाची त्वचा कोरडी लागत होती. कानशिलापाशी नाडी लागत होती, पण ठोके किती मंद होते! जीवनाची भरतीच ओसरली होती!
“नंदा, एवढ्यातच तू काही भयानक अनुभवातून गेलेली आहेस. त्यावर सध्या विचार करू नकोस. पुढे काय व्हायचं असेल ते होऊ दे - त्याचाही विचार आता करू नकोस - मनांत एक ठाम विश्वास बाळग या क्षणापासून तू एकटी नाहीस - मी, समर्थ, तुझ्या मदतीस आहे - आणि तुझ्याबरोबर सतत रहाणार आहे ...”
मी, समर्थ! ते किती आत्मविश्वासाने बोलत होते! पण तसा प्रत्येकजण तिला धीर देत होता. नरेन काय, डॉ. शहा काय आणि आता हे समर्थ काय! तिला समाधान नाही मिळालं तरी त्यांना समाधान मिळत होतं ना? आणि त्यांच्याशी वाद घालायला

तिच्यात तरी शक्ती होतीच कोठे? तिची एकच इच्छा होती आजवर त्यानी तिला एकाकी ठेवलं होतं, तसंच यापुढेही ठेवावं आणि तिला या यातनाचक्रातून आपली सुटका करून द्यावी -

“मी आता झोपू का? मला थकवा आला आहे-” ती हळूच म्हणाली.

“अगदी अवश्य, पण त्या आधी माझ्याकडे नीट पहा. माझा चेहरा चांगला ध्यानात ठेव.” बोलता बोलता ते किंचित जवळ आले होते. आणि त्यांच्या चेहऱ्यात बदल झाला होता. किंचितसाच, पण ध्यानात येण्यासारखा. असं वाटलं की बाकीची सर्व खोली एकदम अंधारात बुडून गेली; त्यांचा चेहराच काय तो उजळलेला राहिला. त्यांच्या चेहऱ्याशिवाय तिच्या नजरेला इतर काही दिसेनासंच झालं. एका असामान्य आंतरिक दीप्तीने तो चेहरा उजळून निघाला होता, त्यावरच्या रेषान् रेषा आपला जळता ठसा तिच्या मनावर खोलवर उमटवत होत्या. तिला शेवटी ते असह्य झालं आणि तिने डोळे मिटून घेतले. पण लखलखत्या प्रकाशाची प्रतिमा नेत्रपटलावर मागाहून बराच वेळ तरंगत रहावी तसाच तो चेहरा तिला कितीतरी वेळ मनःचक्षूंसमोर दिसत होता तिला झोप लागली. मनात वेदनांचा स्फोट झाला. सर्व शरीर कसल्यातरी असह्य बोजाखाली चिरडलं जात होतं. अस्थी, मांस, मज्जा, नसा, सर्वांचा चेंदामेंदा होत होता. काळ आता आत्मनिष्ठ झाला होता आणि आयुष्यातला हा शेवटचा क्षण युगान्तापर्यंत ताणला गेला होता. सर्व इंद्रिये आकांत करून उठली होती ... मानव एकटाच येतो आणि एकटाच जातो हेच चिरंतन सत्य होतं. शेवटी कोणीच कोणाला उपयोगी पडत नाही ... कारण आतल्या या खऱ्या वर्तुळात कोणी पोचूच शकत नाही. शेवटी आलेले कोण ते? ... समर्थ! ते तर आत्मविश्वासाने म्हणाले होते,

“मी तुझ्यापाशी असेन...” शब्द! व्यथा शब्द!... आणखी काही तरी त्यांनी सांगितलं होतं-” माझा चेहरा ध्यानात ठेव ...” यातनेच्या या अंतिम कोलाहलात तिला एक अशक्य गोष्ट करायला त्यांनी सांगितलं होतं...

स्वतःची वेदना विसरून आपण हा विचार करीत आहोत यातच एक नवल आहे हे तिच्या ध्यानातच आलं नाही. पण त्याहूनही अघटित घडत होतं. तिने तो चेहग समोर आणण्याचा प्रयत्न केला. आणि मग तिला समजलं, खरोखर आठवायला तो फारच सोपा आहे! मनांतच खोलवर कोठेतरी तो ठसविला गेला असला पाहिजे. कारण मनाची अवस्था प्रतियोगित होताच तो आपल्या संपूर्ण तेजाने तिच्यासमोर साकार झाला.

क्षणभर आत बाहेर एक विचित्र शांतता पसरल्यासारखी वाटली. मग तिला समजलं की आपण कॉटवरच आहोत, डोळे उघडून समोर पहात आहोत, आणि समर्थाचा

चेहरा आपल्यासमोर आहे. खरा, मनात उभा केलेला नाही.

मरणप्राय वेदनेचा अंशही राहिला नव्हता. आजवर ती आपल्या त्या संभ्रमावस्थेतून बाहेर आली होती तेव्हा दरवेळी ओरडत असायची, हातपाय झाडीत असायची किंवा प्रत्यक्ष धावाधावही करीत असायची. भयाने आणि थकव्याने जीव कासावीस झालेला असायचा…

पण यावेळच हे संक्रमण शांततापूर्ण होतं. स्वतः काही अनुभवल्याची जाणीवच मनात होत नव्हती. थकवा नव्हता, भीतीई। नव्हती. साध्या झोपेतून उठल्यासारखी ती जागी झाली होती तिच्या मनाचा एकदम गोंधळ झाला.

“नंदा,” समर्थ म्हणाले, “माझ्या शब्दांची प्रचिती आली ना? होतो ना मी तुझ्याबरोबर? आणि आता हे बघ, त्यासाठी मी इथेच प्रत्यक्ष हजर असायला हवं असं नाही...मी शरीराने कोठेही असलो तरी तुला जेव्हा जह्यर लागेल तेव्हा मी मदतीस हजर होईन...का आणि कस याचा आता विचार करत बसू नकोस....तुला आधी उत्तमपैकी बरं व्हायचं आहे-आणि माझ्या शब्दांवर विश्वास ठेव-तू यातून पूर्ण बरी होणार आहेस.... लक्षात आल ना? माझी आठवण करायची...”

नंदा त्याचे शब्द अगदी लक्ष देऊन ऐकत होती. त्यांच्याबद्दल तिला एकदम विलक्षण आदर वाटायला लागला होता. त्यांनी आपले शब्द तंतोतंत खरे करून दाखवले होते. निराशेची मनाभोवती आवळलेली पट्टी जराशी सैल झाल्यासारखी वाटत होती. आशेचा लहानसा अंकुर उमलला होता.... जनाला आलेला हलकेपणा इतका स्वैर आणि सुखद होता की मगच तिला आपण इतके दिवस कोणत्या असह्य ओझ्याखाली आयुष्याचा एकेक क्षण घालवत होतो याची खरी कल्पना आली....मनात भरून आलेली कृतज्ञता शरीराचे बांध ओसंडून वहायला लागली ...समर्थ! त्याचे आभार मानायला तिच्यापाशी शब्दच नव्हते.

“त्यांना वाटत होतं त्यांना वाटत होतं - की मला वेड लागलं आहे ” ती स्फुदत स्फुदत म्हणाली, “मी त्यांना परोपरीने सांगायचा प्रयत्न केला.”

समर्थ पुढे वाकले आणि त्यानी आपल्या बोटाने तिच्या डोळ्यांची कड कोरडी केली. दुसरा हात तिच्या कपाळावर ठेवून ते म्हणाले,

“त्यांचा राग धरू नकोस, नंदा. ते सर्व तुझ्या भल्यासाठीच झटत होते. त्यांना कारण उभगल नसल तर तो दोष त्यांचा खासचं नाही, नाही का? आणि आता मागचं सगळं विसरून जायचं. कबूल?”

समर्थाचा स्पर्श चैतन्यमयी होता. जेथे हात टेकला होता त्या बिंदूपासून सर्व शरीरभर लाटालाटानी शक्ती पसरत होती अस्ताव्यस्त झालेली शरीर संस्था पुन्हा सुसूत्र, कार्यक्षम होत होती.

“मी जाऊ आता?” समर्थानी विजारलं. आपण एकटे रहाणार या विचारानेच परत एकदा तिच्या डोळ्यांत वेदनेची व भीतीची .वर्तुळं उभटली. पण ती क्षणक्षरातच नाहीशी झाली. समर्थाचा शब्द पुरेसा होत.
“गेलात तरी चालेल.” ती हलकेच म्हणाली आणि इतक्या दिवसांत तिच्या चेहऱ्यावर प्रथमच अगदी स्वाभाविक अमं हास्य उमटलं.
समर्थांनी बाहेर जायला सांगितल्यावर नरेन आणि डॉ. शहा बाहेर गेले होते आणि शेजारच्याच एका मोकळ्या खोलीत थांबले होते. नरेनला नंदापासून दूर रहाताच येत नव्हतं म्हणून आणि एखादा क्रायसिस आला तर आपण जवळ असावं हा डॉ. शहांचा विचार होता म्हणून. पण एकाच जागी थांबणे दोघांना सारखंच कठीण जात होतं. पंधरावीस मिनिटं गेल्यावर दोघांनी एकमेकांकडे पाहिलं दोघांच्या मनात तोच विचार होता. दोघं उठले, बाहेर आले, नंदाच्या खोलीपाशी आले. काचच्या दारातून आतला भाग दिसत होता.
नंदा कॉटवर निजली होती आणि समर्थ कॉटजवळ उभे होते. दोघंही निश्चल होते, समर्थ कांकणभर जास्तच. का कुणास ठाऊक, पण डॉ. शहांना नंदापेक्षा समर्थांची निश्चलता अस्वस्थ करीत होती. नंदा तर एक पेशंट होती. पण समर्थ....समर्थ...ते कोण होते?
मघासारखीच त्यांना एक चमत्कारिक जाणीव झाली. नरेनच्या खांद्याला हलका स्पर्श करून त्यांनी त्याला परत चलण्याची खूण केली. आत काहीही चाललेलं असो-त्यांना त्याचं साक्षीदार व्हायची आवश्यकता नव्हती. ते दोघं परत आले आणि खुर्च्यांवर बसले.
खोलीचं दार उघडून समर्थ आत आले. डॉ. शहा आणि नरेन दोघंहि सावरून बसले. नंदाचा विचार डॉ. शहा करीत होते. ते म्हणाले,
“समर्थ, नंदाच्या खोलीत नर्सला पाठवू का?”
“पाठवायला हरकत नाही-पण मला नाही वाटत आता तिथे को गी असण्याची आवश्यकता आहे-नंदा झोपली आहे.”
“पण झोपेतच तिला हे अटॅक येतात-” नरेन एकदम उभा राहात म्हणाला, “तिच्याजवळ कोणीतरी हजर पाहिजे. ती एकदम किंचाळते, उठून धावपळसुद्धा करायला लागते-”.
“नरेन-” समर्थ म्हणाले, “तिथे बसण्याने तुला समाधान मिळत असेल स्तर अवश्य जा. पण आता तसं काही होणार नाही.”
“ती बरी झालीय असं तुम्हाला सुचवायचं आहे का?”

डॉ. शहांकडे पहात समर्थ म्हणाले, "बरी झाली आहे असं मी म्हणत नाही. पण स्वतःच्या संरक्षणाची दिशा तिला आता सापडली आहे असं म्हणेन. आजची रात्र आणीबाणीची आहे. आज तिचा टिकाव लागला तर मग तिला धोका नाही अशी मी खात्री देईन."

डॉ. शहा समर्थांकडे अपेक्षेने पहात होते. त्यांनी मान हलवली.

"आता मी अधिक काहीच सांगू शकत नाही. डॉक्टर, मला एखादी रिकामी खोली वापरायला द्या. तुम्हालाही नंदाला पहायला हरकत नाही-पण एक ध्यानात ठेवा-ती काहीही करत असली तरी तिला आवरायचा, जागी करायचा कोणताही प्रयत्न करू नका. हा संघर्ष तिच्या एकटीसाठी आहे-तिनेच त्याला तोंड दिलं पाहिजे."

"समर्थ, तुम्ही हीच खोली वापरा. आम्ही नंदाजवळ बसतो."

"माझं सांगणं ध्यानात ठेवा हं." खोलीचं दार लावता लावता समर्थ म्हणाले. आणि मग खोलीतला दिवा त्यांनी मालवून टाकला.

डॉ. शहा आणि नरेन नंदाच्या कॉटजवळ बसले होते. बाह्यतः तरी ती शांतपणे झोपलेली दिसत होती. पण मनात अंतर्यामी काय उद्रेक होत असतील याची त्यांना काहीच कल्पना येत नव्हती. कोणत्याही क्षणी ती रडत किंचाळत जागी झाली असती- असं कैकवेळा झालं होतं. ते केवळ असहाय पणे तिच्याकडे पहात होते.

झोपेतच तिची चर्या बदलली. कपाळावर आठ्या आल्या. ओठ दुमडले आणि मग दातांखाली आवळले गेले. हातांच्या मुठी घट्ट आवळल्या. ती बरीच अस्वस्थ झाल्यासारखी दिसायला लागली. अभावितपणेच नरेन जगसा पुढे सरकला, पण डॉ. शहांनी त्याला हलका स्पर्श केला. "समर्थांचे शब्द आठव, नरेन. आपण इथेच थांबू, प्रत्यक्ष काही करायची वेळ पडलीच तर मी आहेच."

त्यांचा खडा पहारा सुरू झाला. डॉ. शहांच्या मनात संभ्रम उत्पन्न झाला होता. "ढवळाढवळ करू नका-" समर्थांनी सांगितलं होतं. त्यांचे शब्द कोठपर्यंत मानायचे? समर्थांची मर्यादा कोठे संपते आणि नंदाचे डॉक्टर या नात्याने त्यांचं कर्तव्य कोरे सुरू होतं? त्यांनी खूप विचार केला, पण समाधान कारक आणि निर्णायक उत्तर त्यांना सापडलंच नाही.

झोपेसाठी डोळे मिटताना नंदाचं मन शंकाकुल होतं, भयभीत होतं. ही रात्र आपल्या आयुष्यातली शेवटचीच ठरणार की काय अशी भीती मनाला ग्रासत होती. समर्थांचा शब्दही ही भीती दूर करायला पुरेसा नव्हता. एकदा त्यानी तिला वाचवलं होतं हे खरं होतं-दरवेळी ते शक्य होईल का? आणि आता तर ते तिच्यापाशी हजरही नव्हते. अज्ञात आणि खवळलेल्या सागरात एखाद्याने नाव हाकारावी तसा तिने निद्रेच्या काळ्या प्रदेशात प्रवेश केला.

तिने मनात आणलेली उपमा अगदीच निरर्थक नव्हती. पण यावेळी नेहमीपेक्षा एक वेगळेपणा होता. तिचा प्रवास आंधळा नव्हता. कसं कोणास ठाऊक, पण तिला कालक्रमणेच ज्ञान होत होतं. काळ्याशार प्रदेशातून ताणल्या गेलेल्या एका सरळ, सुवर्णरेषेवरून ती जात होती, अनामिक आणि अदृश्य शक्तीचे तिच्याभोवती तांडवनृत्य चालले होते. जीव गोठवून टाकणारी ही हवा आपल्यासमोर मृत्यूचा गारवा घेऊन आली होती. मनाची राख करणाऱ्या या तुफानात मृत्यूचा दाह होता. मृत्यूचा अनंत अंधःकारात तिच्या अस्मितेची लहानगी ठिणगी विझवायचा त्यांचा प्रयत्न होता. आजवर ती त्या शक्तीचं भक्ष्य बनली होती. एकच अनुभव तिला कासावीस करायला पुरा पडत होता. पण आता ती त्याच्यातून पुढे सरकत होती. वावटळीच्या धक्क्यांसारखे ते तिच्यावर एकामागून एक असे आपटत होते आणि मागे जात होते. त्यांच्या धडकांखाली ती सोनेरी तार झणझणत होती. छेडलेल्या तारेसारखा तिच्यातून एक ध्वनीही निघत होता. निरर्थक नाही. त्याला एक अर्थ होता. एक शब्द.

समर्थ....समर्थ ...समगर्थ...

हे शब्द ती उच्चारत नव्हती किंवा मनातही आणत नव्हती. ही क्रिया त्याच्याही खालच्या पातळीवरची होती, अनैच्छिक होती, स्वयंसिद्ध होती. हे जणू तिच्या शरीराचंच आदिस्पंदन होत. शरीरातली पेशी न् पेशी या एका दिव्य जाणीवेने उद्दीपित झाली होती; नाडीने तो ताल धरला होता. श्वासोच्छवासात तीच लय होती. "मला विसरू नकोस-" समर्थांनी सांगितलं होतं. ही आज्ञा तिच्या कल्पनेपेक्षाही प्रभावी होती. व्यक्त आणि अव्यक्त मनावरच केवळ नव्हे, तर शरीरातल्या प्रत्येक पेशीवरसुद्धा ती कोरली गेली होती. आणि आता ही धोक्याची घटिका येताच शरीरातला प्रत्येक कण तिच्या संरक्षणासाठी सज्ज झाला होता. तिला हे अभिज्ञान झालं, आणि मनावरचा भीतीचा पाश गळून पडला. कारण यापुढे तिला कोणाच्याच मदतीची आवश्यकता नग्हती. विद्युत्भारित वाहकासारखी तिच्या शरीराची पुनर्रचना झाली होती. विश्वाच्या प्रचंड शक्तिस्त्रोताला तिच्या शरीरातून वाट मिळाली होती. किंवा असंही असेल की तिचा पुढचा मार्ग या शक्तीने संरक्षित झाला होता. इतके दिवस तिच्या जिवाची ससेहोलपट करणाऱ्या संवेदना आता निव्वळ कागदी कपट्यासारख्या तिच्यावर आपटत होत्या...का आणि कसं याच्याशी तिला कर्तव्य नव्हतं...ती झोपेतच राहिली...मात्र शरीराला एक सैल स्वस्थपणा आला; झोप नैसर्गिक झाली...

डॉ. शहांनी एक खूप मोठा निश्वास सोडला आणि मागे सरत ते नरेनला म्हणाले, "मला वाटतं क्रायसिस उलटला आहे. तिला आता धोका नाही. समर्थांनी काय केलं

असेल ते असो, ते यशस्वी झाले आहेत."
शेजारच्याच खोलीत समर्थ एकाच स्थानावर निश्चल बसून होते.
नंदा बरी होऊन घरी गेली होती. समर्थ ती रात्रच तेवढी थांबले होते. सकाळी निरोप घेताना त्यांनी नंदाला एक साधं काचेसारखं दिसणारं 'पदक दिलं होतं. दिवसातून तासादीडतासाने त्यात नजर एकाग्र करून आपली आठवण करायला सांगितलं होतं. आणि नरेनकडे वळून ते म्हणाले होते,
"नरेन, नंदा एकदा खडखडीत बरी झाली की मला भेट. मग आपण याच्यावर चर्चा करू." नरेनच्या डोळ्यांतली शंका पाहून ते हसले होते.
"आता तिला काहीही व्हायचं नाही-अजिबात काळजी करू नकोस. आणि समजा काही झाले तरी मी आहे ना! माझ्याकडे ये!"
"समर्थ," डॉ. शहा आपण होऊनच म्हणाले, "नरेनबरोबर मीही तुमच्याकडे येणार आहे."
अगदी अवश्य या. "समर्थ हसले आणि त्यांनी सर्वांचा निरोप घेतला. त्यांना येऊन बारा तससुद्धा झाले नव्हते-पग सर्व प्रश्न चुटकीसरशी सुटले होते.
सुमारे महिन्याभराने (शक्ती पूर्ववत यायला नंदाला एवढे दिवस लागले; पण तसला मागच्यासारखा त्रास पुन्हा कधीही झाला नाही.) समर्थाकडे चौघांची बैठक जमली होती, समर्थ, अप्पा, डॉ. शहा आणि नरेन. कॉफीचा कप खाली ठेवता ठेवता डॉ. शहा म्हणाले, "समर्थ, आता आमची उत्सुकता तुम्ही जास्त ताणू नये हेच चांगलं."
"माझी काहीच हरकत नाही. पण आधी तुम्हाला मी एक विचारतो. नंदाला काय झालं होतं अशी तुमची कल्पना होती?"
"कल्पना कसली? खात्रीच जवळजवळ - "डॉ. शहा म्हणाले, "हा अनुभव मला नेहमीचाच आहे. मेंदूमधे काहीतरी बिघाड होतो- पेशीला धक्का लागत असेल, अंतर्गत रक्तस्राव होत असेल, एखादा विकृत पेशीपुंज मूळ धरत असेल ... कारण काहीही असलं तरी परिणाम एकच होतो. बाहेरचे संदेश आणि त्यावरच्या प्रतिक्रिया यांच्यांत गोंधळ होतो. वर्धित झालेल्या संवेदना फीड बॅकसारख्या परत आघात करतात - सर्व यंत्रणेचाच तोल जातो ..."
समर्थ काही वेळ काहीच बोलले नाहीत. मग जरा विचार करून ते म्हणाले, "बहुतेक केसेसमधे तुम्ही म्हणता तसं होत असणार यात शंका नाही. नंदाची केस मात्र अगदी वेगळी होतो. त्याचं मूळही तिच्या मेंदूतच होतं, पण मी त्याला बदल म्हणेन, बिघाड म्हणणार नाही.
"माणसाच्या मेंदूचा मी विचार करतो तेव्हा माझ्या नजरेसमोर एक खोली येते. ही जराशी विचित्र खोली आहे. खऱ्या अर्थाने तिला भिंती नाहीतच - चारी बाजूला,

एवढंच नाही, तर वर आणि खालीसुद्धा तिला खिडक्या आहेत. या खिडक्याही मोठ्या विचित्र आहेत. प्रत्येकीतून बाहेर पाहिलं तर वेगळाच देखावा दिसतो. पण ही वेळ साहसा येत नाही. कारण सर्वसाधारणपणे यांतल्या पाचच खिडक्या उघड्या असतात - तुमच्या लक्षात आलं असेलच - आपली बाह्य पंचेंद्रियं.'
"ही एक उपमा आहे आणि मर्यादिस अर्थानेच ती खरी आहे. तर समजा, काही कारणाने या बंद खिडक्यांपैकी एखादी उघडली आणि त्या व्यक्तीला याचं ज्ञान नसेल तर काय होईल? घटनांचा किंवा संवेदनांचा अन्वयार्थ लावताना माणूस पूर्वानुभवावर फार विसंबून असतो. एखादी अनाकलनीय घटना घडली किंवा जाणवली आणि तिचं भोजमाप करायला माणसापाशी पूर्वानुभवाची फूटपट्टी नसली तर त्याला ती घटना असंदर्भ, तर्कदुष्ट, भीतिदायक वाटायला लागते. नंदाला काय झालं होतं हे तुमच्या लक्षात आलं असेलच आता.
"अनुभूतीचं एक नवं द्वार तिच्यासाठी खुलं झालं. हे का व्हावं? आपण सांगू शकत नाही. एक तर्क मात्र करू शकतो. नरेनच्या सांगण्यावरून असं दिसतं की पूर्वीही तिला (जवळपास कोणी नसताना) आपल्याला हाक मारल्याचा क्वचित वेळा भास झाला होता. मी एवढंच म्हणेन की हे द्वार पूर्वीपासूनच पूर्णतया बंद नव्हतं. पण हा माझा व्यक्तिगत तर्क आहे. या नव्या विश्वाची खरी जाणीव तिला त्या बागेत झाली. कारंज्याच्या धारांकडे ती टक लावून पहात होती असं ती म्हणते. नकळत तिने आपल्या चित्तवृत्ती एकाग्र केल्या असल्या पाहिजेत – तेव्हाच ते झालं. झालं हे नक्कीच, कारण पुढचा इतिहास स्पष्ट आहे."
"मानवी मेंदू ही बुद्धीला थक्क करूज सोडणारी कलाकृती आहे. ज्यांची शक्यता त्यात सामावलेली आहे अशा सर्व शक्ती मानवाला प्राप्त झाल्या तर त्याचा अक्षरशः देव होईल. आणि शेवटी देव म्हणजे तरी काय? सर्वपूर्ण मानवच. आपण नंदापुरता विचार करू. या आकस्मिक जडणी घडणीने तिला एक नवी सृष्टी खुली झाली. काहीनी याला दूर विचार, मनोसंदेशन, टेलीपथी असं नाव दिलं आहे. पण ते फार तोकडं आहे. विचार रुक्ष असतात, त्याना भावनांचा ओलावा नसतो. नंदाच्या मनात इतरत्र सांधला गेलेला संपर्क -खोल होता, संपूर्ण होता - सहभावनेची ही पराकोटी होती. ज्या जीवमात्राशी तिचा संबंध येत होता त्याच्याशी ती संपूर्ण एकरूप होत होती, त्याचे सर्व अनुभव प्रत्यक्ष जगत होती, त्याच्यातून स्वतः जात होती."
"केवळ मानसिक संपर्कानं ती मरण पावली असती? "डॉ. शहा म्हणाले.
"हा साधा संपर्क नव्हता. ती स्वतः दरवेळी इतर कोणाशी तरी एकरूप होत होती. हा संबंध संपूर्ण होता-आपण तसलं काही कल्पनेतसुद्धा आणू शकत नाही-"
"पण हे दुसरं कोण? इतर कोणती व्यक्ती अशी-"

"व्यक्ती?" समर्थ किंचित आश्चर्याने म्हणाले, "केवळ माणसांपुरतीच ही भावना मयादित आहे कशावरून? कृमी-कीटक, पशुपक्षी जे जे सजीव आहे त्या त्या सर्वांचा या क्षेत्रात समावेश होतो-जवळ-दूर, आता-पूर्वी-पुढे, कोणत्याही मर्यादा या शक्तीवर नाहीत -"

"पण हे शक्य कसं होईल?"

"का नाही? असं एक अलौकिक यंत्र नजरेसमोर आणा. अतिदूर अंतरावरची वस्तूही त्यातून स्पष्ट दिसते, नजिकचीच पण अतिसूक्ष्म वस्तूही त्यात स्पष्ट दिसते; याशिवाय सर्व काळातही हे यंत्र पोचू कते....यावरून थोडीशी कल्पना येईल."

"हे कसं होईल हेच मला कळत नाही-"

''हे कसं होईल? साधा विचार केला तरी दोनतीन शक्यता सहज समोर दिसतात. भूतकाळातले प्रसंग कसे जाणवतील म्हणता? वैद्यकीय शास्त्राला आता कोठे मानवी पेशींच्या रहस्याचा उलगडा व्हायला लागला आहे. खऱ्या अर्थाने पेशी ही अमर आहे. एवढंच नाही, केवळ मानवी जन्मच नाही, तर त्या आधीच्या सर्व जन्मांचा, अगदी जीवसृष्टीच्या उद्भवापासूनचा सर्व इतिहास प्रत्येक पेशीवर कोरला गेला आहे. अजूनही माणूस आयुष्याची सुरुवात एकपेशीच्या सूक्ष्म स्वरूपात करतो. आजवरची उत्क्रांतीतली सर्व स्थित्यंतरं तो पुन्हा एकदा अनुभवतो आणि मग मानवी स्थितीला पोचतो. पेशीतील रंगसूत्रावर हा सर्व इतिहास कोरलेला असतो. आधुनिक शास्त्राच्या अगदी सर्वशक्तिमान सूक्ष्मदर्शकावरही त्याची नोंद येत नसेल-पण मनात उद्दीपित झालेली ही दिव्य नजर त्यावरच्या सर्व रेषा, सर्व खाणाखुणा, सर्व संकेत सहज वाचू शकते. त्यातला कोणता भाग आणि का निवडला जातो हे आपल्याला अज्ञात आहे....आयुष्याच्या आजवरच्या प्रवासात मागच्या अनंत जन्मात नंदावर ज्या ज्या वेळी भयानक मृत्यू ओढवला त्या सर्व 'प्रसंगांची नोंद तिथे आहे...त्यापैकीच काही काही प्रसंग तिच्यासमोर साकार झाले असावेत ... हेही खरं नाही...ती स्वतः पुन्हा त्या प्रसंगातून गेली असावी ...

"किंवा दुसरी शक्यता पहा. शरीरात पेशी सतत जन्माला येत असतात आणि निष्क्रिय होऊन शरीरद्रव्यात शोषल्या जात असतात. एकेक पेशी हीसुद्धा एखाद्या सजीव प्राण्यासारखीच आहे. तिचा नाश होत असताना काय होत असेल? अनेक पेशी रोगजंतूंच्या भक्ष्यस्थानी पडतात, अनेक विषारी रसायनांनी मरतात, अनेक जठराग्नीत नाश पावतात....हे सर्व इतक्या सूक्ष्म प्रमाणावर चाललेलं असतं की त्याची आपल्याला दखलही नसते...पण याच घटना जर अतिप्रचंड प्रमाणावर प्रक्षेपित झाल्या तर? त्याच प्रसंगात माणूस स्वतः गुरफटला तर? ती भीती असह्य ठरेल, जीवघेणी ठरेल....

“हेही अतिरिक्त वाटत असेल तर तिसरी एक साधी-सोपी शक्यता पहा. प्रभावित झालेलं नंदाचं मन जवळच्या किंवा दूरच्या, पण आताच्या क्षणी जिवंत असलेल्या जीवसृष्टीशी तादात्म्य पावू शकतं. त्यांच्यातले. मृत्युसमीप आलेले प्राणी का निवडले गेले हे मीही सांगू शकत नाही... असंही असेल की त्या क्षणीच्या भावमिश्रित विचारांच्या तीव्रतेमुळे त्यांचं ग्रहण सुलभ होत असेल...त्या विलक्षण स्त्रोतात नंदाचा जीव गुरफटत होता, होरपळून निघत होता. कारण काही क्षण ती तेच आयुष्य जगत होती...

“जोपर्यंत तिचा स्वतःवर ताबा होता, थोडक्यात आत्मविस्मृती झाली नव्हती, तोपर्यंत मृत्यूच्या क्षणी हा अनैसर्गिक पाश तुटत होता आणि ती आपल्या देहात परत येत होती. पण दिवसें दिवस हा प्रतिकार क्षीण होत चालला होता. आणि असा एक क्षण आला असता की त्या भयानक कोलाहलापासून दूर होण्याचं, स्वतःला वाचवण्याचं त्राणच तिच्यात राहिलं. नसत...त्या क्षणी तिचा आत्मा तसाच भरकटत नाहीसा झाला असता.... मला असं वाटतं की अगदी योग्य वेळी मला तुम्ही बोलावलंत ...आपल्या. हातून एखादं सत्कार्य होण्याचा सुयोग असला की अशा गोष्टी होतात, पण. हा योगायोग नाही-”

“हे सर्व क्षणभर खरं मानलं तरी तुम्ही प्रत्यक्ष काय केलंत? एका रात्रीत नंदामध्ये एवढी सुधारणा कशी दिसायला लागली?” डॉ. शहा म्हणाले.

“तुमच्या ध्यानात येईल की मानसिक विकृतीच्या अनेक केसेस माझ्याकडे सारख्या येत असतात. मला जर उपचाराचा हा मार्ग सापडला तर...”

समर्थांच्या चेहऱ्यावर एक जरासं खिन्न हास्य उमटलं.

“डॉक्टर, नंदाची केस अपवादात्मक होती. तिच्या मेंदूत बिघाड तर झाला नव्हताच, उलट त्याच्यात एक विलक्षण सुधारणा झाली होती. ज्या संवेदना सर्वसाधारणपणे आपल्याला कधीही जाणवत नाहीत त्या तिच्यापर्यंत पोचत होत्या. मेंदूभोवतीचं आरोधक कवच विरघळून गेलं होतं. असंरक्षिक अवस्थेत ती या कोलाहलात भिरकावली गेली होती. तुमच्या शारीरिक विज्ञानापेक्षाही एका खालच्या, तरल पातळीवरच्या या घडामोडी आहेत. जड वस्तूच्या अभ्यासालाही वर्षानुवर्षे लागतात. मग त्यापेक्षाही मूलगामी, जेथे साधन आणि साध्य हे दोन्ही एकच आहेत, अशा या अभ्यासात केवळ काही सूत्ररूप शब्दांनी कौशल्य मिळणार आहे का? तुमचा अपमान करण्याचा माझा हेतू नाही, डॉक्टर. फक्त एवढंच ध्यानात घ्या की मला जी थोडीशी पात्रता आली आहे त्यामागे कित्येक वर्षांचा अभ्यास आहे.”

“माझ्या ध्यानात आलं. पण निदान तुम्ही काय केलंत याचं वर्णन तरी करू शकाल का? “डॉ. शहांच्या शब्दात किंचितशी निराशा होती.

“त्यासाठीही उपमाच वापराव्या लागतील. अंधारलेल्या खोलीत एखाद्या फटीतून प्रकाश यायला लागला तर त्यावर आपण पडदा टाकतो. तसाच काहीसा हा प्रकार आहे. आणखी जरा खोलात जाऊन सांगायचं तर ज्या ठिकाणी या विचारचित्रांचं प्रक्षेपण होतं तेथेच एक अत्यंत प्रखर अशी स्थिर प्रतिमा स्थापन कगयची. सूर्यप्रकाशात मेणबत्ती जशी निस्तेज होते तसा मग या आक्रमक संवेदनांचा प्रभाव नाहीसा होईल. एकदा ही क्रिया सुरू झाली की मानवाच्या स्वसंरक्षणाच्या सहज प्रवृत्तीमुळे ती प्रतिक्षिप्त क्रिया होते, आवश्यक त्या वेळी कार्यवाहीत आणली जाते. यासाठीच मी म्हणालो होतो की तिचं संरक्षण तिलाच करायचं आहे.

“यापेक्षा स्पष्ट शब्दात सांगताच येणार नाही. संवेदना आणि जाणीव यांचा जो परस्परसंबंध आहे त्यांच्यातला नाजूक तोल योग्य मार्गाने बदलायचा. हे सिद्ध झालं की मनातल्या क्रिया सुरळीतपणे सुरू होतात.”

नंदाच्या आग्रहाखातर नरेन तिलाही काही दिवसांनी समर्थांकडे घेऊन आला. नंदाच्या डोळ्यांतली अनिश्चितता, भीती बावरेपणा, सर्व गेलं होतं. समर्थांकडे ती आदरयुक्त नजरेने पहात होती आणि तिच्या नकळत मनातली समर्थांची प्रतिमा अधिक रेखीव, अधिक सुस्पष्ट होत होती.

“आता बरं वाटतं ना?” यापलीकडे समर्थांनी तिला काहीच विचारलं • नाही. पण प्रश्न औपचारिक होता. इतरही जे काही संभाषण झालं ते औपचारिकच होतं. पण नंदा परत आली तेव्हा स्वतःबरोबर एक अपूर्व समाधान घेऊन आली. पुन्हा समर्थांना भेटायची जरूरी पडणार नाही, याची तिला खात्री होती. मनाच्या कोणत्यातरी कोपऱ्यात त्यांची जाणीव अक्षय्य रहाणार होती. - तिने नरेनला सांगितलं नव्हतं, पण गेल्या महिन्याभरात तिला अगदी पूर्वीसारखाच अनुभव अनेक वेळा आला होता. पण तिच्या मनाला भीतीचा स्पर्शही झाला नव्हता. कारण त्या अनुभवात चित्तवृत्ती कल्लोळ करून उठल्या की मनात कोणत्यातरी कोपऱ्यातून तो एकच शब्द घुमायला लागे...

समर्थ...समर्थ...समर्थ...

आसपास उभी राहू पाहणारी भाससृष्टी विरळ होऊन नष्ट होई, मृत्यूला जखडणारे विषारी पाश गळून पडत; मनात एक ठाम जाणीव येई की या प्रकाराचे आपण केवळ निरीक्षक आहोत; घटक नाही आणि मग ती त्यातून मोकळी होई.

पण हा विषारी वारसाही एवढ्यात क्षीण व्हायला लागला होता. आक्रमणांतलं अंतर वाढत चाललं होतं, त्यांचा प्रभाव क्षीण होत चालला होता; काही दिवसांतच ती त्यांना एखाद्या वाईट स्वप्नांपेक्षा जास्त किंमत देणार नव्हती; त्यानंतर तर तेही जाणार होतं.

मागे रहाणार होती ती फक्त समर्थ, सद्भावनशील, अपार करुणावंत - मनाच्या जवळीकीची जाणीव!

□□□

विश्वव्यूहाचा भेद

समर्थांविषयी लिहिताना काय वगळावे आणि काय निवडावे याचा मला अनेक वेळा मोठा पेच पडतो. काही ना काही विलक्षण संकटात सापडलेले लोक मदतीसाठी त्यांच्याकडे येतात. त्यांच्या प्रत्येकाच्या आयुष्यात तो प्रसंग, अद्वितीयच असतो; पण समर्थांच्या दृष्टीने त्यावरचा उपाय हा अगदी साधा आणि कितीतरी वेळा वापरलेला असा असतो. असे प्रसंग भावनोत्कटतेच्या कसावर कदाचित् वर्णनीय ठरतीलही, पण समर्थांविषयी लिहिताना मी तो दृष्टीकोन कधीच ठेवलेला नाही. त्यांचा खास अभ्यास जेव्हा निसर्गाचे एखादे नवे स्वरूप दाखवतो किंवा त्यांच्यातूनच मानवी सामर्थ्यांची एखादी नवी दिशा दृगोचर होते तेव्हा मला काहीतरी नवीन हाती आल्यासारखे वाटते. पण आता जो प्रसंग मी सांगणार आहे (किंवा जी प्रसंग - मालिका म्हणा!) ती या दोन्ही कसोट्यांवर उतरेल हे खास!

स्त्रियांच्या सौंदर्यांची जाहीर चर्चा करण्याचा रिवाज आपल्या समाजात नाही. पण सौंदर्य, संपत्ती आणि समाजातील एक विशिष्ट स्थान हे तिन्ही जेव्हा एकत्र येतात तेव्हा मात्र ती व्यक्ती चर्चेचा विषय ठरते. रायसोनी धराणे हे अशा अर्थाने प्रसिद्ध होते. कोणत्याना कोणत्या कारणाने वर्तमानपत्रांत ते नाव सतत येत असे. प्रसिद्धी प्राप्त करून घेण्याचे तंत्र काहीजणांनी पुरे आत्मसात करून घेतलेले असते. रायसोनी त्यात वाकबगार होते.

मेनका ही त्यांची एकुलती एक मुलगी. चांगली शिकलेली, अनेक खेळात प्रवीण. या ना त्या निमित्ताने तिचेही फोटो वृत्तपत्रांत अनेक वेळा झळकले होते. तेव्हा तिच्या ' रोमान्स ' ला प्रसिद्धी मिळावी हे साहजिकच होते. त्यातही तिचा तथाकथित प्रियकर हा एका मध्यमवर्गीय, सर्वस्वी अज्ञात अशा घराण्यातला होता. 'ट्रॅप आणि प्रिन्सेस' असे एक रहस्यमय नाट्य लोकांसमोर खेळले जात होते. लक्षाधीशाची एकुलती एक कन्या आणि (जवळ जवळ) बेकार असा तिचा प्रियकर. पोहोण्याच्या तलावावर त्यांची

ओळख झाली होती. श्रीरंग आपटे हा निष्णात पोहोणारा होता आणि मेनकेला कोचिंग देत होता. तेव्हा पाण्यात निर्माण झालेली ही मैत्री पाण्याबाहेर आल्यावरही कायम राहिली, नव्हे वृद्धिंगत होऊ लागली. रायसोनींचा त्याला विरोध होता. श्रीरंग हा बेकार, लुच्चा, आपमतलबी भामटा आहे; मेनकेच्या पैशांवर त्याचा डोळा आहे; तिच्या अननुभवाचा फायदा घेऊन तो तिला फसवतो आहे; काय वाटेल ते झालं तरी त्याचं लग्न होता कामा नये .... इति रायसोनी (हा सर्व मसाला वर्तमानपत्रे आपल्या वाचकांना पुरवीत होती.)

हे वर छापल्यावर लगोलग खाली श्रीरंग - मेनका यांचा फोटो छापल्याशिवाय वर्तमानपत्रांना चैन कशी पडेल? मेनकेच्या स्पोर्टसकारमधून जाताना, तलावाच्या काटावर तिच्याशी गप्पा मारताना, एखाद्या आलिशान हॉटेलमचे जाताना फोटो घ्यायची संधी केव्हाही मिळत होती, कारण श्रीरंग मेनका एकमेकांच्या सतत सहवासात असत. कोणी काही विचारलं तर श्रीरंग काहीच बोलत नसे; मेनका नात्र धीटपणे 'आमचं एकमेकांवर प्रेम आहे आणि आम्ही विवाहबद्ध होणार आहोत' असं सांगायची. वास्तविक एखाद्या व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात (मग ती व्यक्ती कितीही मोठी असो!) स्वारस्य घ्यायचं काहीच कारण नाही ... पण अफवा पसरविणे आणि त्या चवीने चघळणे यांत काहींना धन्य वाटते..

मेनका. एके सकाळी नाहीशी झाली. तिचा एक मोठा फोटो वर्तमान पत्रात आला होता, त्याखाली तपास लावणारास किंवा तपासाच्या कामी मदत करणारास एक भले मोठे बक्षिस रायसोनींनी देऊ केलं होतं. सर्वत्र हा फोटो झळकला होता आणि त्यावर खूपशी चर्चा हि झाली होती. समर्थांनी हे वाचलं होतं की नाही मला कल्पना नव्हती, पण त्यांच्यापुढे पेपर टाकून मी म्हणालो,

“समर्थ, हे पहा आज काय झालं आहे ते!”

“मी आधीच पाहिलं आहे ते -”समर्थ हसत् म्हणाले. “आणि मी या मेनकेच्या शोधात भाग घ्यावा असं तुला सुचवायचं असेल तर ती गोष्ट मनातून आधी काढून टाक!”

“तुम्ही इतर कामात गुंतला आहांत?”

“इतर कामं तर आहेतच, पण ती नसती तरी मी तिकडे लक्ष दिलं नसतं. हे काम आपलं नाही. मला आशा आहे की फोटोखालचा आकडा पाहून तू हे सुचवलेलं नाहीस -”

“तो विचार मनात अगदी नव्हताच असं नाही - पण -”

“पण नाही! आपण आपल्या ठराविक मार्गावरून हलायचं नाही -”

“अगदी प्रत्यक्ष रायसोनी आले तरी?”

“ते यायचेच नाहीत. आणि एखाद्या प्रकरणात काही खास वैशिष्टय असल्याखेरीज मी त्याला हात लावणार नाही. आपला याच्याशी काहीही संबंध नाही.”

‘‘समर्थाचे शब्द खोटे ठरवणाऱ्या घटना लवकरच घडणार होत्या. पण घटनांचा अनपेक्षितपणा हेच या जगातलं मोठं आकर्षण आहे.

रात्री नऊच्या सुमारास आमची घंटी खणखणली. दाराबाहेरच्या तरुणाला ओळखायला मला पाच - सात सेकंद सागले. तो श्रीरंग आपटे होता. मनात मी म्हणालो,

“समर्थ! दूर राहू पहात होतात ना? आता घ्या हे!”

श्रीरंग विलक्षण बेचैन झालेला दिसत होता. तसा त्याला कोणीही बुद्धिमान म्हटलं नसतं. चेहऱ्याची घडण जरा जड होती, तिथे तरल भावनांना फारसा वाव नव्हता. कपाळावर विचारांत आठ्या पडल्या होत्या, हातांच्या मुठी आवळल्या होत्या, नजर गोंधळलेली वाटत होती.

“या ना, बसा.” समर्थ म्हणाले. ते माझ्याकडे अर्थपूर्ण नजरेने पहात होते.

“समर्थ, मी तुमच्याकडे कशासाठी आलो आहे हे तुम्ही ओळखले असेलच.” श्रीरंग म्हणाला. त्याचा आवाज घोगरा, जवळ जवळ खर्जातला होता.

“मेनका रायसोनी?”

“होय. मला सकाळपासून एक क्षणभरही चैन पडत नाही!”

“पण मी काय करू शकगार? रायसोनी स्वतः शक्य ते सर्व प्रयत्न करीतच आहेत की! सर्व पोलीस यंत्रणा त्यांच्या दिमतीला आहेच!”

“हे सगळं नाटक आहे, देखावा आहे, समर्थ!”

“तुला यापेक्षा अधिक स्पष्ट बोलायला हवं, श्रीरंग!”

“समर्थ, मला स्वतःला तर रायसोनींचाच संशय येतोय. मेनकेने माझ्याशी कोणताही संबंध ठेवू नये यासाठी त्यांनी जिवाचं रान केलं होतं. त्यांचा आमच्या विवाहाला तर कडाडून विरोध होता.”

“पण प्रत्यक्ष आपल्या मुलीबाबतीत ते असं करतील? त्यांच्यावर असा संशय घेणं जरा अविचारीपणाचच नाही का?”

“तुम्हाला त्यांची माहिती नाही म्हणून असं वाटतं-” श्रीरंग अतिशय संतापाने बोलत होता, त्याच्या कपाळावरच्या शिरा फुगून तट्ट झाल्या होत्या.

“श्रीरंग, बाहेर कोठे हे आरोप केलेस तर ते तुझ्या अंगलट येतील बरं का! ते एक असो, तुझा असा समज व्हायला काय कारण झालं?”

“रायसोनींनी स्वतः मला आणि माझ्यासमोर मेनकेला अनेकवेळा धमक्या दिल्या होत्या. कोणाशी गाठ आहे तुम्हाला माहिती नाही, ते म्हणायचे.”

“असं कर-सगळं प्रथमपासूनच का सांगत नाहीस? “

“त्यासाठीच तर तुमची भेट घेतली, समर्थ.” श्रीरंग म्हणाला.

श्रीरंगची व मेनकाची ओळख तलावावर झाली. आपले काम चोखपणे करणारा श्रीरंग मेनकाशी लाचारीने वागला नाही. त्याच्या हाताखाली शिकून गेलेल्या अनेकजणांपैकीच मेनका हीही एक होती. निदान सुरुवातीस तरी. पण मेनका प्रथमपासूनच त्याच्याकडे आकर्षित झाली होती. श्रीरंगचे शरीर बांधेसूद आणि घोटीव होते. शरीरिक जवळीक टाळू म्हटल्यानेही टाळता येण्यासारखी नव्हती.

प्रेमात शारीरिक आकर्षणाचा बराचसा मोठ भाग असतोनिदान पहिले अडसर या आकर्षणाने दूर होतात, मनाची खरी ओळख पटायला अवधी मिळतो.

“तिच्या मनाचा कल मला उमगला तेव्हा मीही चकितच झालो.” श्रीरंग म्हणाला, “मी तिला परिस्थितीची पूर्ण कल्पना दिली. यावर कदाचित् तुमचा विश्वास बसणार नाही, पण ही अगदी खरी गोष्ट आहे. आमच्या दोघांच्या परिस्थितीत शब्दशः जमीनअस्मानाइतकं अंतर होतं. पण ती काहीएक ऐकायलाच तयार नव्हती. तिला तुम्ही प्रत्यक्ष पाहिलं आहे की नाही कोणास ठाऊक तिचा फोटो तरी पाहिलाच असेल. मग तिच्या सौंदर्याचं वर्णन करायलाच नको! अशी स्त्री मोहीत झाल्याकर तिच्याकडे पाठ वळवणारा माणूस संत महात्माच हवा मी तर साधा माणूस आहे- मला तो मोह दूर करता आला नाही.”

मेनकानेच ही बातमी प्रथम वडिलांच्या कानावर घातली. श्रीरंगला बंगल्यावर बोलावणं आलं. जरा दबकतच तो तिथं गेला.

“मेनकाच्या बोलण्यात तिचं घर मोठं आहे असं आलं होतं, पण ते इतकं अवाढव्य असेल याची मला कल्पना नव्हती. समोर मोठी हिरवळ, दोन्ही बाजूंना बाग, मधे टोलेजंग इमारत. मेनकाशी लग्न करायचा विचार तरी आपण मनात कसा आणला याच माझं मलाच नवल वाटत होतं. इथल्या नोकरांची प्राप्तीही माझ्यापेक्षा जास्त असेल, माझ्या मनात विचार आला. मनात विलक्षण विषाद आला. मला वाटतं मेनका जर नेमकी त्याक्षणीच बाहेर आली नसती तर मी त्याच पावली माघारी फिरलो असतो. यात भेकडपणा नाही किंवा पैशांपुढे मी लाचार होतो असाही याचा अर्थ नाही. मेनकेवर एक प्रकारचा अन्याय होईल एवढंच माझ्या मनात होतं.”

एका बाजूच्या खोलीत रायसोनी त्याची वाट पहात होते. त्यांनी मेनकेला खोलीत क्षणभरही थांबू दिलं नाही.

“मी त्यांना आजवर पाहिलंच नव्हतं. त्यांचं व्यक्तिमत्त्व विलक्षणच रुबाबदार आहे. भव्य शरीरयष्टी आहे. चेहरा नितळ आहे, गोरापान आहे. जुन्या वळणाच्या झुपकेदार मिशा त्यांना शोभतात. त्यांच्या सर्व हालचालींत ऐश्वर्याचा एक दिमाख आहे—पण तो अस्थानी वाटत नाही. जुन्या काळचे राजेरजवाडे असेच असतील असं त्यांना पाहताक्षणीच मनात आलं!”

श्रीरंगचे स्वागत करताना त्यांच्या चेहऱ्यावर नाखुषीची किंवा रागाची अस्पष्टशीसुद्धा खूण नव्हती. मागाहून त्याला समजल होतं की त्याची भेट हाच त्यांना अपमान वाटला होता. पण ते अगदी शांतपणे वागत होते. पहिल्या वाक्यतच त्यांनी मूळ विषयालाच हात घातला.

“मिनी गेल्या दोनतीन दिवसात तुमच्या संबंधात काहीतरी बोलत होती. तशी ती वयाने लहान आहे. तेव्हा तिच्या बडबडीकडे मी फारसं लक्ष दिलेलं नाही. पण प्रत्यक्षच तुमच्याशी बोलून तुमचा काही गैरसमज झाला असला तर तो दूर करावा कसं वाटलं, म्हणून तुम्हाला बोलावलं!

“मला तुमच्या शब्दांचा अर्थ नीटसा समजला नाही.” श्रीरंगलाही राग आला होता, पण त्याने तो काबूत ठेवला होता.

“मिनी प्रेमाबिमाचं काहीतरी बोलत होती, “ते त्याच्याकडे सरळ न पाहता म्हणाले, “आता आजकालच्या पोरापोरींना सर्वत्रच प्रेम दिसत असतं- त्याला मी फारसं महत्त्व देत नाही. आणि तुम्हीही व्यवहार जाणत असालच. मिनीच्या बोलण्याने तुमचा भलताच गैरसमज झाला असला तर तो वेळीच दूर व्हावा एवढ्यासाठीच ही गाठ!

“आपण अजूनही आडवळपणानेच बोलत आहात. आणखी जरा स्पष्ट शब्दांत सांगू शकणार नाही का?”

“ठीक आहे तर-स्पष्ट शब्दांत सांगतो. लग्नाबिमाचं मिनी काही बोलली असली तर त्यात काही तथ्य नाही. सर्वांनाच ते गैरसोयीचं होणार आहे. केवळ आम्हालाच नाही तर तुम्हालाही!”

“खरा प्रश्न माझा आणि मेनकाचाच आहे, नाही का?”

“तिला यातलं काय कळतंय हो? तुमच्यापुरतं बोला-”

“मला वाटतं मेनकालाही आपण बोलावून घ्या. तिचं काय म्हणण आहे ते तरी आपल्याला कळेल!”

रायसोनींना ही कल्पना अजिबात आवडली नाही. “मुली जात्याच फार सेन्सेटिव्ह असतात. तिच्यासमोर ही चर्चा कशाला?” ते म्हणाले. “तुमचा जरी काही समज झाला असेल तर त्याबद्दल मी तुम्हाला दोष देत नाही. समजा हा विवाह झाला नाही तर तुम्हाला जो काही मानसिक त्रास होईल त्याची भरपाई करायलाही मी तयार आहे ...”

ते शब्द आठवताच आताही श्रीरंगचा चेहरा संतापाने लाल झाला.

“रांगड्या भाषेत बोलायचं म्हणजे ते मला सरळ सरळ लाच देत होते. त्यांनी माझा स्वभाव ओळखला नव्हता. आमचा संबंध विषम आहे हे मलाही कळत होतं. त्यांनी हेच वेगळ्या शब्दांत मांडलं असतं तर मी कदाचित मेनकेच्या आयुष्यातून निघूनही गेलो असतो. पण त्यांनी पैशांची भाषा काढली आणि माझा तोल गेला. आमचे आवाज चढले असले पाहिजेत. काही वेळातच खोलीचे दार दाणदिशी उघडून मेनका आत आली. रायसोनींनी तिच्यासमोरही मला अनेक अपशब्द वापरले. ते स्वतःचीच बाजू लंगडी करून घेत होते. मी काहीच बोललो नाही. त्यांची दमछाक

झाल्यावर ते गप्प बसले तेव्हा मी मेनकेला म्हणालो, ' तुझ्या वडिलांचं मत काय आहे ते तू ऐकलंसच . . . आता तुझंही कळू दे म्हणजे मी जातो ...' ती एक पळभरही न थांबता म्हणाली, “श्रीरंग, बाबांना काय हवं ते बोलू दे! माझं मत कदापि बदलायचं नाही-आहे अशी या क्षणालाही मी तुमच्याबरोबर यायला तयार आहे!” तिच्या प्रांजलपणाबद्दल शंकाच नव्हती...”

“मला वाटत याच क्षणी रायसोनींच्यात काहीतरी अचानक आणि विलक्षण बदल झाला. त्यांच्या चेहऱ्यावरचा संताप नाहीसा झाला. एखाद्या प्रेमळ पित्यासारखं त्यांनी मेनकाला जवळ घेतलं आणि ते हसत हसत म्हणाले,

“बरं, बरं, समजलं! मी काही तुला आताच घराबाहेर काढायला निघालो नाही बरं का! जा बरं आता आम्हा दोघांना जरा बोलू दे ....” मेनका जरा कुरकुरली, पण खोलीतून गेली. आणि मग रायसोनी माझ्याकडे वळले.

“तिला तुम्ही पुरी बनवली आहेत, श्रीरंग; पण लक्षात ठेवा, हा विवाह मी होऊ देणार नाही. आपली मुलाखत संपली!”

श्रीरंग गप्प बसला.

“एवढ्यावरून तुला त्यांचा संशय येतो? “समर्थ म्हणाले.

“एवढ्यावरून नाही. त्यानंतर त्यांच्यातर्फे दोघांनी माझी भेट घेतली. गाव सोडून जाण्याबद्दल मला दोन लाख रुपयांपर्यंत रक्कम देऊ करण्यात आली. मी त्यांच्याशी काही बोललोच नाही. आणि मग रायसोनी स्वतःच मला मेटले. त्यांनी तर प्रच्छन्न शब्दांत धमकीच दिली-मी माझा नाद सोडला नाही तर परिणाम वाईट होतील! त्यांची मुलगी तितकीच निर्धारी होती हे ते विसरत होते आणि त्यांच्या प्रत्येक प्रयत्नानं माझा अहंकार जास्तच डिवचला जात. होता हे दुसरं. “काय व्हायचं असेल ते होऊ द्या-'

मी त्यांना सांगितलं आणि ते तणतणत निघून गेले”

“मेनकाची आणि तुझी गाठ त्यानंतर पडत होती?”

“जवळ जवळ रोजच. तिला ते अटकाव करू शकत नव्हते. मेनका नाहीशी झाली त्याच्या आदल्या दिवशी म्हणजे कालच संध्याकाळी आम्ही. भेटलो होतो.” .

“तिच्या बोलण्याचालण्यात काही बदल जाणवला?”

“वडिलांच्या विरोधामुळे ती जरा कष्टी झाली होती, पण तेवढंच.”

“बोललात कशावर? “

“प्रेमातल्या माणसांना विषयाची जरूरी असतेच कोठे! कोणताही विषय त्यांना पुरतो. एवढं बरिक खरं त्या वादळी मुलाखतीनंतर आम्ही विवाहावर फारसे बोलत

नव्हतो. एक म्हणजे ती गोष्ट आम्ही गृहितच धरून चालत होतो. आणि तापलेली डोकी जरा थंड होण्याची वाट पहात होतो."

"वर्तमानपत्र वाचल्यावर तू रायसोनींची गाठ घेतलीस?"

"घेण्याचा प्रयत्न केला. फोनवर ते येऊ शकत नव्हते. बंगल्यावर गेलो तर त्यांना माझी भेट घेण्याची इच्छा नाही असा निरोप आला."

"पोलिसांनी तुझी गाठ घेतली?"

"सकाळीच ते आले होते. पण मी त्यांना काहीच सांगू शकलो नाही."

"रायसोनींचाच हात यामागे आहे असं तुला वाटतंय म्हणतोस तर मग मेनका धोक्यात कशी असेल? ती तर त्यांचीच मुलगी आहे नं?"

"समर्थ, मला तो माणूस काही सरळ वाटत नाही. मेनका कोठे असेल या विचाराने जीव हैराण झाला आहे. म्हणून तुमच्याकडे आलो आहे."

"पाहीन मला काय करता येतं ते त्यांनीच तिला एखाद्या गुप्त ठिकाणी पाठवली असण्याचा संभव नाही का?".

"मला तर काही सुचतच नाही."

"दोन तीन दिवस जाऊ देत. काय काय घडतं ते पाहूं या... मग परत एकदा भेट. मी आता यापेक्षा जास्त काय सांगणार?"

श्रीरंग गेला तो काही फारशा समाधानाने नाही. तो गेल्यावर समर्थ माझ्याकडे वळले. "कसे योगायोग असतात, नाही?" ते हसत म्हणाले.

दुसऱ्या दिवशीची वर्तमानपत्रं उघडली आणि योगायोगाचा खरा हिंसका अनुभवला. श्रीरंगला काल रात्री अटक झाली होती. पोलीस त्याच्या जागेवर त्याची वाट पहातच बसले होते. तो आमच्याकडून गेला आणि त्याला ताब्यात घेतलं. जामीन वगैरे आज देता येईल, श्रीरंग काही दिवसांसाठी मोकळा होईल, पण त्याला आता समर्थांकडे उघडपणे येणं कठीण होतं, माझ्या मनात विचार आला. समर्थही हातात वर्तमानपत्र घेऊन बसले होते, पण त्यांचे डोळे मिटलेले होते, त्यांचा चेहरा गंभीर झाला होता- कालच्या हास्याची आता खूगही नव्हती.

"ताबडतोब अटक करायला त्यांच्यापाशी भरपूर पुरावा असला पाहिजे." समर्थ विचार करीत म्हणाले, "केशवरावांची गाठ आता आवश्यक झाली आहे. आप्पा, त्यांना फोन कर पाहू-"

फोनवर केशवराव मिळाले नाहीत. समर्थांकडून फोन आला होता, एवढा निरोप पुरेसा होता. त्यांना वेळ होताच ते समर्थांकडे येतील.

"अप्पा, रायसोनींच्या प्रकरणात लक्ष घालणार नाही असं कालच तुला मोठ्या दिमाखाने सांगितलं होतं, नाही?" समर्थ म्हणाले, "आता दुसरा मार्गच नाही. चलतोस

माझ्याबरोबर?"
रायसोनींचा बंगला खरोखरच एखाद्या राजवाड्यासारखा होता. श्रीरंगसारखा मध्यमवर्गीय तरुण अशा ऐश्वर्याने गोंधळून जाणारच. मेनका रायसोनीच्या खळबळजनक प्रकरणाने बरेच लोक तिकडे आकर्षित झाले होते. कंपाऊंडचे बंद केलेले उंच फाटक आणि आतला झाडांतून अर्धवट दिसणारा बंगला यांच्याकडे पहात हे सर्व निरुद्योगी लोक उभे होते. गेटच्या आत एक पोलीसही उभा होता. तिथेच पहारेकऱ्याची एक लहानशी लाकडी बूथ होती.
समर्थांनी आपले कार्ड काढले, नावाखाली 'मेनकेच्या संबंधात ' एवढी दोन अक्षरे लिहिली आणि कार्ड गेटच्या गजातून आत दिले. पहारेकऱ्याने बूथमधून फोन केला असावा. मिनिटाभरातच बाहेर येऊन त्याने मोठे गेट आमच्यासाठी उघडले व आम्ही आत येताच फिरून बंद केले. बंगल्याची वाट समोरच दिसत होती, तीवरून समर्थ निघाले.
बागेची मांडणी एखाद्या लँडस्केप आर्टिस्टने केली असावी असा माझा कयास होता. विरोधी रंग, हिशेब करून मांडलेली असिमेट्री... एक ना अनेक खुणा उघड दिसत होत्या. बंगला आधी वाटला होता त्याहूनही मोठा होता. बांधकाम वरून नाजुक दिसणारे पण प्रत्यक्षात अत्यंत भक्कम होते. अनेक ठिकाणी अनपेक्षित मोकळ्या जागा होत्या. रंगरचनाही फसवी होती. ज्याला स्प्लिट-लेव्हल डिझाइन म्हणतात अशी रचना होती. चार वेळा सर्व बंगल्यावरून नजर फिरवली तरी मनात अशी एक कल्पना येत होती, काहीतरी आपल्या नजरेतून निसटले आहे...मोठा चमत्कारिक बंगला!
मोठ्या दारातून आत गेलं की प्रत्यक्ष दिवाणखाना होता. अनेक जणांची येथे वर्दळ चालली होती. त्यात पोलीसही होते. दिवाणखान्याच्या एका कोपऱ्यात टेबलखुर्ची मांडून त्यांचा एक अधिकारी बसला होता. त्याच्या टेबलावर एक तात्पुरता टेलिफोनही होता. रायसोनींच्या मेनकेच्या शोधासाठी त्यांनी इथे एक लहानसं ऑफिसच थाटलं होतं!
टेबलामागच्या अधिका-याची नजर आमच्यावर होती. लांबूनच मला दिसलं की समर्थांचं कार्ड त्याच्या टेबलावर ठेवलं होतं. एकूण येणारा-जाणारांचा सर्व बंदोबस्त पोलिसांनीच ताब्यात घेतला होता तर! त्यानी कोणालातरी खूण केली आणि एकजण पुढे येऊन आम्हाला टेबलापाशी घेऊन गेला. अधिकारी कार्डावर पेन्सील आपटत समर्थांकडे पहात होता. त्यांना बसा म्हणण्याचे औचित्यसुद्धा त्याने दाखवले नाही. काही न बोलता समर्थ शांतपणे उभे राहून त्याच्याकडे पहात होते. पाच एक सेकंदांतच त्याची नजर घसरली आणि खाली पहात त्याने घसा साफ केला.

“तुम्ही समर्थ?” तो शेवटी म्हणाला.
“होय.”
“मेनकाबाईसंबंधी आपल्याला काही माहिती द्यायची आहे?”
“नाही.”
“पण कार्डावर तर तुम्ही लिहिलं होतं-”
“मला रायसोनींना भेटायचं आहे.”
“त्याचं असं आहे, आता सर्व तपास आम्ही हातात घेतला आहे-”
“महाशय-” समर्थ हसत म्हणाले, “ही भेट कोणत्याही गुप्त स्वरूपाची नाही. आपला कोणीही इसम माझ्याबरोबर अवश्य राहू शकतो. मला रायसोनींशी काहीही खाजगी बोलायचं नाही.”
“ते आता बोलण्याच्या मनःस्थितीत्र नाहीत-”
“आपल्या टेबलावर टेलिफोन आहे. फोनवरून तुम्ही त्यांना माझं नाव सांगू शकता. मग पाहू या.”
जरा नाखुषीनेच त्याने रिसीव्हर उचलला. स्वतः रायसोनीच फोनवर आले असावेत. “आपल्याला भेटायला कोणी समर्थ म्हणून आले आहेत - “तो म्हणाला मात्र, फोनवरून कोणीतरी जोरजोराने बोलल्याचा आवाज येऊ लागला. “हो-” असे म्हणत त्याने फोन खाली ठेवला आणि वर न पहाता तो म्हणाला, “तुम्ही वर जाऊ शकता, ते तुमची वाट पहात आहेत.” आम्ही टेबलापासून वळत असताना मला दिसलं की समर्थाचे कार्ड तो खिशात घालत होता.
त्या अजब घरातला आमचा प्रवास पुढे सुरू झाला. सर्वत्र ऐश्वर्याचा खुणा होत्या, पण त्याबरोबरच एक साक्षेपी सौंदर्यदृष्टीही होती. एकेक दालन एका एका 'स्टाइल' मधे सजवले होते. इतकी निर्दोष रचना की दालन ओलांडताच वेगळ्या कालखंडात प्रवेश केल्याचा भास व्हावा. एका प्रशस्त जिन्याने आम्ही वर आलो. बोळातली शेवटची खोली बंद होती. तिकडे बोट करून आमचा वाटाड्या परत खाली गेला. समर्थांनी त्या खोलीच्या दिशेने एक पाऊल टाकले आणि ते एकदम थबकले. त्यांचा चेहरा निर्विकार झाला. काही क्षण ते विलक्षण एकाग्रतेने विचार करीत उभे राहिले आणि मग त्यांच्या नेहमीच्या सवयीने खांदे उडवून ते झपाझप खोलीकडे निघाले. दारापाशी पोचताच त्यांनी दारावर बोटांनी टकटक केले.
“या-या-दार उघडे आहे.” आतून एक अस्पष्ट आवाज आला. दार ढकलून समर्थ व त्यांच्या मागोमाग मी असे आत गेलो.
रायसोनींच्याबद्दल मी आतापर्यंत बरेच ऐकले होते. साहजिकच ही व्यक्ती आहे तरी कशी हे पहायला मीही उत्सुक होतो. पण आतल्या व्यक्तीपेक्षा खोलीनेच लक्ष वेधून

घेतले. अत्यंत मंद हिरव्या रंगाचा प्रकाश सर्वत्र पसरला होता. खोली होती त्यापेक्षाही मोठी वाटत होती. हिरव्या चामड्यात मढवलेले सोफा-सेट आणि आरामखुर्ध्या सर्वत्र मांडलेल्या होत्या. खोलीत एक चमत्कारिक वासही होता. अनेक ठिकाणी फुलांचे गुच्छ मांडलेले होते. त्यांपैकी खरे कोणते आणि खोटे कोणते हे समजणे कठीण होते. त्यातल्या काही फुलांचा हा वास असेल किंवा एखादी अगरबत्ती लावली असेल किंवा एखादा सेंटही असेल. एका बाजूने गार वाऱ्याचा झोत अंगावरून जात होता. वारा, वास आणि रंग यांचा एकत्रित परिणाम होऊन असं वाटत होतं की आपण एका बंदिस्त खोलीत नसून मोकळ्यावर, झाडांच्या हिरव्या सावलीत -आहोत...

रायसोनी लांबच्या खिडकीपाशी उभे होते. दारावर आवाज झाला तेव्हा ते बाहेर पहात असावेत. ते आता अर्धवट वळून आमच्याकडे पहात होते. खिडकीच्या हिरव्या पडद्यावर त्यांची प्रोफाईल तेवढी दिसत होती. डोक्यावर केस अजिबात दिसत नव्हते. सरळ कपाळ आणि गरुडाच्या चोचीसाखे अणकुचीदार नाक; त्याखाली अगदी लहान जिवणी आणि मग मोठी हनुवटी; त्या खाली भरदार मान आणि मग खाली प्रचंड देह. एक क्षणभर ते त्याच पावित्र्यात उभे राहिले आणि मग सावकाश वळून आमच्या दिशेने पुढे आले. जवळ पोचताच त्यांनी हात पुढे केला.

“समर्थ? या ना, बसा.” ते म्हणाले. आवाज खूप खोल खर्जातला होता, पण कानांना मोठा सुखदायक वाटत होता. आम्ही दोन खुा घेतल्या.

“मेनकेसंबंधी मी वर्तमानपत्रात वाचलं, रायसोनी.” समर्थ म्हणाले, “

त्याबाबतीत मला जर काही करता आलं तर मला आनंद होईल.”

“माझी अपेक्षा नव्हती तुम्ही याल, समर्थ.”

“का बरं? “समर्थ किंचित हसत असावेत.

“तुमच्यासंबंधी मी जे काही ऐकलं आहे-”

“मी पैशांसाठी ही कामे हातात घेत नाही असं म्हणता? त्यात थोडंफार सत्य असलं तरी तो काही माझा नियम नाही.”

“मला तुम्ही जरा अडचणीत टाकता आहात समर्थ. तुम्हाला नाही म्हणायचं जिवावर येतं, पण खरोखरच या केसमधे तुमच्या असमान्य गुणांची आवश्यकता लागेलसं मला वाटत नाही. मेनकेचा प्रश्न जवळजवळ सुटल्या-सारखा आहे.”

“सुटला? ती परत आली?”

“नाही, अजून नाही-पण लवकरच येईल अशी मला आशा आहे. तुम्ही आज वाचलं नाही का? यातला खरा गुन्हेगार पोलिसांच्या हाती लागला आहे. बाकीचे धागेदोरे लवकरच त्यांच्या हाती लागतील.”

“तुम्ही श्रीरंगबद्दल बोलता आहात का?”
“होय, त्याच बदमाशाबद्दल!” रायसोनींच्या आवाजातला सगळा थंडपणा, निर्विकारपणा एकाएकी गेला. आवाज संतागने कठोर झाला. “पाजी माणूस! मेनकेला त्यानं जवळजवळ फसवलं होतं. त्याच्या गोऱ्यागोमट्या रूपावर ती भाळली होती-बरं झालं काही भलतंच व्हायच्याआधी सर्व प्रकार माझ्या कानावर आला. मी तिला दोन शब्द सांगताच तिचे डोळे उघडले. आपला डाव फसला हे या भामट्याच्या ध्यानात येताच त्याने तिला पळवून नेण्याचा हा कट रचला आहे.”
“श्रीरंगबद्दल तुमचं मत भलतंच वाईट दिसतंय!”
“अहो मी अशी पाजी माणसं पहाताक्षणीच ओळखतो!”
“मेनकेच्या हाताची इच्छा करणं हेच त्याचं पाप होतं तर?”
“मला त्या माणसाबद्दल चर्चा करायची नाही.”
“कदाचित् त्याची गरिबी हेही त्याचं पाप असेल!”
“कोठे तो आणि कोठे मेनका!” रायसोनी विलक्षण तुच्छतेच्या आवाजात म्हणाले, “या कारकुंड्याची धुणीभांडी करणं हे तिच्या ललाटी लिहिलेलं नाही! ती फार फार वेगळ्या आयुष्यासाठी जन्मली आहे!”
“तुमच्या मतावर मला बंधन घालता येत नाही.” समर्थ म्हणाले, “अर्थात वेगळ्या मताचा मलाही अधिकार आहे. आणि रायसोनी, माझ्या मते श्रीरंग या बाबतीत पूर्ण निरपराधी आहे.”
‘‘आता प्रत्यक्ष चौकशीत काय ते बाहेर येईलच!”
“पण मी माझ्या मार्गांनी मेनकेचा शोध चालू ठेवला तर त्याला तुमची काही हरकत नाही ना? “समर्थांनी हलकेच विचारलं.
आणि आता प्रथमच रायसोनींची मान वर आली. त्यांची ती विलक्षण नजर प्रथमच समर्थांच्यावर प्रत्यक्ष खिळली. मला अशी शंका आली की त्यांच्या चेहऱ्यावरच्या गंभीरपणामागे एक अस्पष्ट हास्य आहे.
“तुम्ही शोध अवश्य करा, समर्थ!” ते सावकाश म्हणाले.
“पण त्यात तुमची मदत होणार नाही-”
“माझ्या मते प्रश्न मिटलेला आहे. श्रीरंग अपराधी आहे. त्याचा सर्व कट तोच आपल्या मुखाने सांगेल. आणखी काही शोधाची आवश्यकता आहे असं मला वाटत नाही. '
मनाशी काहीतरी ठरवून समर्थ जागचे उभे राहिले.
“जशी तुमची इच्छा रायसोनी. ठीक आहे तर, मी जातो.”

एक क्षणभर मला वाटलं ते काहीतरी बोलणार आहेत, पण लागलीच त्यांची अरुंद जिवणी घट्ट बंद झाली. ते काहीच बोलले नाहीत, खुर्चीवरून उठलेही नाहीत.

त्या हिरव्या खोलीतून आम्ही बाहेर पडलो.

केशवरावांची आणि आमची चुकामुक झाली होती. त्यांनी आमच्यासाठी चिठी लिहून ठेवली होती, दुपारी तीनला ते परत येणार होते. दुपारची जेवणं झाल्यावर त्यांची वाट पाहात आम्ही हॉलमधे बसलो होतो.

“रायसोनीबद्दल तुझं काय मत झालं अप्पा? ”

“मुलीच्या नाहीसे होण्याने ते फारसे अस्वस्थ झालेले दिसत नाहीत.”

“बरोबर. आणखी काही?”

“श्रीरंगवर त्यांचा फार राग दिसतो.”

“होय. इतका की मेनका परत येण्यापेक्षाही श्रीरंगवर गुन्हा शाबीत होण्यासाठी ते जास्त उत्सुक वाटले.”

“पण त्यांना एवढी खात्री कशी वाटते आहे?”

“मला वाटतं केशवरावांकडून आपल्याला याचं उत्तर मिळेल.”

बरोबर तीनच्या ठोक्याला केशवराव हजर झाले. समर्थांचे काय काम आहे याची त्यांना काहीच कल्पना नव्हती. ते रेग्युलर क्राइम बॅचमधे नव्हते, त्यामुळे त्यांना रायसोनी प्रकरणाचीही अगदी वरवरचीच माहिती होती. समर्थांनी आता त्यांना सर्व हकीगत खुलासेवार सांगितली.

“केशवराव, या प्रकरणात मला काही विसंगत गोष्टी दिसत आहेत, पण त्यांचे मागाहून. रायसोनी आज म्हणत होते की शीरंग आपल्या तोंडानेच सर्व गुन्ह्याची कबुली देणार आहे. हे विधान त्यांनी कशाच्या जोरावर केले? त्यांना एवढा विश्वास का वाटत होता?”

आपल्याकडून समर्थांची काय अपेक्षा आहे हे केशवरावांना अजून उमगलं नव्हतं.

“तुमच्याकडे दोनतीन महत्त्वाची कामं आहेत, केशवराव.” समर्थ म्हणाले, “श्रीरंगला कोणत्या पुराव्याच्या आधारावर अटक केली हे आपल्याला समजलं पाहिजे. त्याच्यावर जर पोलिसांची पाळत असली आणि ती असणारच - तर तो रिपोर्ट मिळतो का ते पहा. आणखी काही विशेष घडामोडी झाल्या असल्या तर त्याही कळवा.” केशवरावांचे संबंध आता इतके घरोब्याचे झाले होते की समर्थांच्या शब्दांत औपचारिकपणा मुळीही नव्हता.

“तुम्हाला फोन केला तर चालेल का प्रत्यक्षच भेट घेऊ?”

“जमलं तर प्रत्यक्षच भेटा. हे सर्व शक्यतोवर आपल्यातच राहिलं तर बरं. नाइलाज झाला तरच फोन करा.” समर्थ म्हणाले.

केशवरावांनी फारसा वेळ दवडला नाही. संध्याकाळी सातच्या सुमारास त्यांचा फोन आला. एक्स्टेन्शनवर ऐकण्याची सोय होती, पण मी यावेळी ती वापरली नाही. त्यांनी दिलेली बहुतेक माहिती समर्थांना अपेक्षित असावी असं त्यांच्या उद्गारावरून वाटत होतं. शेवटी मात्र ते एकदम गंभीर झालेले दिसले. त्यांनी केशवरावांना कसली तरी किल्ली हस्तगत करायला सांगितलं. उद्या सकाळची भेट ठरत होती. फोन खाली ठेवून समर्थ माझ्याकडे वळले.

“अप्पा, हे ऐकलंस का? श्रीरंगच्या खोलीत मेनकाचे सुमारे सात हजार रुपये किंमतीचे दागिने आणि सुमारे चार हजार रुपये रोख असं सापडलं आहे. त्याचा जामीन अर्ज नाकारण्यात आला आहे. तो पोलीस कस्टडीतच आहे. दुपारपर्यंत तो सर्व नाकबूल करीत होता. आपल्याला यातलं काहीही माहीत नाही म्हणत होता. पण संध्याकाळी सात-साडेसातच्या सुमारास त्याने सर्व काही सांगण्याची तयारी दाखवली. पोलिसांना दिलेल्या जबाबात त्याने मेनकाला फसवण्याचा, फूस लावून पळवून नेण्याचा आपला विचार होता हे कबूल केलं आहे. तिचे दागिने व पैसे यांचा अपहार करण्याचाही आपला विचार होता असं तो म्हणतो. तिला फसवण्यासाठी आपण प्रेमाचं नाटक केले होते असं तो कबूल करतो. उद्या सकाळी अकरा वाजता कोर्टात मॅजिस्ट्रेटसमोर तो कबुलीजबाव देणार आहे. केशवराव म्हणतात की पोलिसांनी त्याला कोणतीही दमदाटी केली नाही, धाकदपटशा दाखवला नाही; त्याने हे आपखुषीनं कबूल केलं आहे. केशवरावांच्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही.”

“कशाचा अर्थच लागत नाही, नाही का?”

“असं काही तरी होणार याची मला कल्पना होतीच, अप्पा. श्रीरंग असा बनाव रचील असं तुला वाटतं?”

“नाही त्याचा जो काय थोडाबहुत परिचय झाला आहे त्यावरून तो मला तरी एक अतिशय सज्जन, सुस्वभावी तरुण वाटला.”

“माझंही मत तसंच आहे. याचा अर्थ त्याचा मेनकेच्या नाहीसं होण्याशी काहीही संबंध नाही. पण तरीही तो सर्व अपराध कबूल करतो. हे कसं काय होऊ शकतं?”

“अप्पा, श्रीरंगला सुरूवातीलाच रायसोनींचा संशय आला होता. त्यांची एकंदर वागणूक मलाही संशयास्पद वाटते. श्रीरंगला ते या सर्व प्रकरणात मुद्दाम गोवत असावेत असं वाटतं.”

“पण समर्थ, मेनका आहे तरी कोठे?”

“श्रीरंगने कबुलीजबाब दिला की तिचा शोध लागेल. ती कोठे आहे हे तो सांगेल आणि तिथेच ती सापडेल.”

“पण त्याचा जर काही संबंध नाही म्हणता तर—”
“अप्पा, “समर्थ एकदम कठीण झालेल्या आवाजात म्हणाले, “श्रीरंग, हे स्वखुषीने करीत नाही आहे. दुसरं कोणीतरी त्याला हे करायला भाग 'पाडीत आहे. दुसरं कोणीतरी म्हणजे रायसोनीच! मेनका कोठे आहे हे त्यांनाच माहीत आहे. श्रीरंगच्या तोंडून ते वदवून घेऊन ते त्याला पुरा बदनाम करतील आणि मग मेनका परत एकदा आपल्यांत येईल.”
“तुम्ही आता काय करणार आहात?”
“आधी श्रीरंगची काळजी व्यायला हवी. केशवरावांना मी त्याच्या खोलीची किल्ली घेऊन तिथे उद्या सकाळी बोलावलं आहे. आधी त्याला मोकळा करू आणि मग मेनकाचं पाहू.”
समर्थांच्या आवाजाला आलेली धार कोणासाठी तरी घोर दुर्भाग्य सुचवीत होती एवढी माझी खात्री झाली.
श्रीरंगची एका खोलीची जागा एका जुन्या वाड्यात तिसऱ्या माळयावर होती. हवेशीरपणा एवढा एकच सद्गुण त्या जागेत होता. बाकी अनंत गैरसोयी होत्या, पण आत पाय टाकताच आतलं थोडंथोडकंच पण अतिशय नीटनेटकेपणाने ठेवलेलं सामान पाहून मन प्रसन्न होत होतं. एका बाजूला एक नवारीची खाट होती. एकुलत्या एक खिडकीजवळ एक टेबल होतं आणि त्या टेबलावर मेनकाचा एक हसरा फोटो होता. फोटोपुढे एक फुलदाणी होती, फुलदाणीत त्याने ताजी फुलं ठेवली असावीत, पण ती आता पार सुकून गेली होती. तो फोटो आणि ती सुकलेली फुले, श्रीरंगच्या निर्व्याज प्रेमाचा तो संकेत मला पुरेसा होता. मनातल्या सर्व शंका पार फिटल्या.
समर्थ आणि केशवराव खोलीतलं सामान उलटसुलटं करीत होते.
“अप्पा, “समर्थ म्हणाले. “आपल्याला श्रीरंगचा एखादा मोठा फोटो हवा आहे. तूही पहा कोठे सापडतो का!”
माझ्या मनात आलं, मेनकेच्या टेबलावर त्याचा फोटो खास असेल!मी ती शंका बोलून दाखवताच समर्थ क्षणभर होते तसेच थांबले आणि मग एकदम म्हणाले, “हो! खरंच की! ते नव्हतं माझ्या ध्यानात आलं!” . मला त्यांचे शब्द समजलेच नाहीत. त्यांनी शोध पुढे सुरू केला.
शेवटी फोटो मलाच सापडला. टेबलाच्या खणात अगदी मागे सारून ठेवलेल्या एका मोठ्या पाकिटात तो होता. वास्तविक (माझ्या आवडीप्रमाणे) फोटो अगदी हुबेहुब होता. मग वाटलं, कदाचित त्यासाठीच शीरंगने तो मागे सारून ठेवला असेल! माणसाचा स्वभाव इथून तिथून सारखाच!

फोटो निरखून पाहिल्यावर समर्थांचे समाधान झालेसे दिसले. फोटो टेबलालावर ठेवून त्यांनी खोलीची तपासणी सुरू केली. थोड्या वेळाने ते म्हणाले,
“अप्पा, केशवरावांबरोबर तू कोर्टात जा. तिथे काय होतं ते पहा.”
“आणि तुम्ही, समर्थ? “
“मी इथेच थांबणार आहे. जा-तिथे अकराला हजर हो.”
केशवराव कोरदंड, इन्स्पेक्टर, एस. आय. बी. हे बरोबर होते, म्हणूनच मला चेंबरमधे प्रवेश मिळाला. अकरा वाजता सर्वजण हजर होते हे एक नवलच. श्रीरंगला आणण्यात आले तेव्हा त्याच्याकडे मी निरखून पाहिले. त्याच्या चेहऱ्यातला बदल पाहून मला धक्का बसला. डोळे तापट लाल झाले होते. हातांच्या मुठी गच्च आवळल्या होत्या. पावलंसुद्धा अवघडल्यासारखी, रखडत पडत होती. श्रीरंग कसल्यातरी विलक्षण मानसिक ताणाखाली होता हे अगदी उघड दिसत होतं. - त्याला दाखवलेल्या जागी तो उभा राहिला होता खरा, पण तो निश्चल नव्हता. मधेच त्याची मान माझ्या दिशेने वळली, पण लागलीच एखाद्या दोरीने खेचल्यासारखी परत समोर वळली. मॅजिस्टेट त्याला नांव, पत्ता, व्यव-. साय इत्यादी विचारत होते. प्रत्येक प्रश्नाला श्रीरंगचे उत्तर जरा वेळाने येत होतं. शब्द अडखळलेल्या दातांतून मोठ्या प्रयासाने निघत होते. पण ते स्वच्छ, मोठ्या आवाजात होते. कोणाचाही गैरसमज होण्याची शक्यतासुद्धा नव्हती.
“मला समजल आहे की तू सर्व गुन्ह्यांचा कबुलीजबाब द्यायला तयार आहेस. ही गोष्ट खरी आहे का?”
“हो.” श्रीरंग जरा वेळ थांबून म्हणाला.
“हे तू स्वखुषीने करीत आहेस ना?”
“हो” पुन्हा जरा वेळ श्रीरंग म्हणाला.
“पोलिसांना तू दिलेल्या जबाबावरून त्यांनी मजकूर तयार केला आहे. तो ते तुला आता वाचून दाखवतील. ते सर्व तुला मान्य असेल तर तू. त्या जबाबावर माझ्यासमोर सही. कर. समजलं?”
“हो.” अगदी हलक्या आवाजात.
अधिकाऱ्यांच्या हातात जवाबाचा मसुदा तयारच होता. त्यांनी लागलीच त्यातला मजकूर वाचायला सुरुवात केली. त्या कागदावर श्रीरंगने सही केली तर तो सरळ खडी फोडायला गेला असता. अधिकारी कागद वाचीत असताना श्रीरंग एखाद्या पुतळ्यासारखा निश्चल उभा होता. कागद वाचून झाला.
“हे सर्व तुला मान्य आहे? “मॅजिस्ट्रेटनी विचारले.
“होय.”

“मान्य असल्यास तुझी सही कर.” त्यांनी एक पेन पुढे ढकलले. श्रीरंगने पेन हातात घेतले. मला अगदी जोराची इच्छा झाली की त्याला ओरडून सांगावं, ‘ श्रीरंग! सही करू नकोस! आयुष्यातून उठशील!’ केशवरावांचा जाडजूड हात माझ्या खांद्यावर पडला. माझ्या मनातला तो विचार नाहीसा झाला.

श्रीरंग हातातल्या पेनकडे पहात होता. जणू त्याने असली वस्तू जन्मात पाहिली नव्हती. त्याचा हात एकदा कागदाकडे गेला, मागे आला, मग जोराने कागदाकडे गेला...श्रीरंगचा चेहरा भयानक दिसत होता...

एका क्षणात त्याच्यात विलक्षण बदल झाला. हातातलं पेन त्याने टेबलावर फेकून दिले. तो दोन पावले भागे सरला आणि ओरडला,

“नाही! नाही! ही सगळी बनवाबनवी आहे! यातलं एक अक्षरही खरं नाही! मेनकाच्या नाहीसे होण्याशी माझा काडीचाही संबध नाही! मला त्यातलं काही एक माहिती नाही! पण तिच्या केसालाही धक्का लावायचा विचार माझ्या मनातसुद्धा आला नाही!”

विजेचा शॉक बसावा तसे त्याचे अवयव एकदम ताठ झाले. डोळे एकदम विस्फारले आणि तसाच उभाच्या उभा तो खाली कोसळला. एकदोनदा हातपाय झाडून मग तो निश्चेष्ट पडून राहिला.

प्रसंगाचा हा शेवट सर्वानाच अनपेक्षित होता. काही क्षण सर्वच भांबावून गेले आणि मग धावपळ सुरू झाली. सर्वात जास्त संताप मजिस्ट्रेटसाहेबांना आलेला दिसला. ते जरी एकही शब्द बोलले नाहीत तरी पुन्हा त्यांच्यासमोर कोणाला आणायची अधिकाऱ्यांची हिंमत होणार नव्हती.

“अप्पा, आपण जाऊ या.” केशवराव हलकेच म्हणाले.

त्या गोंधळात आम्ही चेंबरबाहेर सटकलो आणि श्रीरंगच्या खोलीचा रस्ता धरला. केशवरावांना काहीतरी खास समाधान झालेसे दिसले. केशवरावांच्या यशाचे वैषम्य मानणारे काही अधिकारी होतेच. त्यांच्या फटफजितीचा हा प्रसंग केशवरावांना मनापासून आवडला असावा.

श्रीरंगच्या खोलीचे दार नुसते लोटलेलेच होते. आम्ही आत पाय टाकताच उग्र घुराचा भपकारा तोंडावर आला. खिडकी लावून घेतली होती आणि धूर खोलीत कोंडला होता. समर्थांची पाठमोरी आकृती धूसर दिसत होती.. आमच्या येण्याचा त्यांना पत्ताही लागला नव्हता. एका विवक्षित पवित्र्यात. बसून ते समोर एकटक पहात होते. त्यांच्यासमोर श्रीरंगचा फोटो होता.

केशवरावांनी खिडकी उघडली. खोलीत कोंडलेला धूर बाहेर गेला, आतली हवा निवळली. मी मोकळेपणाने श्वास घेऊ लागलो. समर्थांची तंद्री हळूहळू उतरली आणि मग त्यांनी आमच्याकडे पाहिले.

“केव्हा आलात? “ते म्हणाले,
“हे येतच आहोत-”कॉटवर जपून बसत केशवराव म्हणाले.
“ठीक आहे. सांगा.”
केशवरावांनी सर्व सांगितलं, पण समर्थांना त्याचं काही नवल वाटलेलं दिसलं. नाही. आपल्या कल्पना खऱ्या ठरल्यासारखी ते स्वतःशीच मान हलवत होते. शेवटी ते म्हणाले,
“श्रीरंग कोणाच्या तरी प्रभावाखाली आला होता, आणि ही व्यक्ती जबरदस्त आहे, अप्पा. मला माझी सारी शक्ती पणाला लावावी लागली तेव्हाच कोठे मी श्रीरंगच्या मनाला जखडणारे पाश तोडू शकलो. त्याला ही रस्सीखेच असह्य झाली असली पाहिजे - तो बेशुद्ध झाला.”
“पण त्याला काही इजा नाही ना होणार?
“छे! आजिबात नाही!”
“तो शुद्धीवर आल्यावर परत ते त्याला जखडतील?”
“आता त्याचा काही उपयोग नाही. त्याने सही केली असती म्हणजे तो कायमचा गुरफटला असता. आता सर्वच बेत फिसटकला आहे.”
“पण सही केली असती तरी मेनका कोठे आहे हे त्याला कोठे माहीत होतं? ते तर त्याला सांगावं लागलं असतं ना?”
“त्याच्या तोंडून शब्द वदवले गेले असते ... त्याला त्यांचा अर्थही समजला नसता ... आणि मेनका परत आली असती ... रायसोनींचा यात हात आहे अशी माझी खात्री होत चालली आहे. ते बेफिकीर आहेत, कारण मेनका कोठे आहे हे त्यांना माहीत आहे. तिला धोका नाही हेही त्यांना माहीत आहे. कारण त्यांनीच तिला कोठेतरी लपवली आहे. आणि आता ती कोठे आहे हे आपल्याला शोधून काढायचं आहे.”
“तुम्हाला काहीतरी अंदाज असणारच. समर्थ.” केशवराव म्हणाले.
“अंदाज असला तर मी तुम्हाला तो सांगणार नाही.” समर्थ म्हणाले, “थांबा! असं रागबू नका. यापुढच्या माझा हालचाली कदाचित बेकायदेशीर ठरण्याची शक्यता आहे. तेव्हा त्यासंबंधात तुम्हाला जेवढी कमी माहिती असेल तेवढं बरं.”
“समर्थ! तुम्हाला माझी हीच का पारख झाली?”
“केशवराव, तुमचे हात मोकळे असले म्हणजे तुम्ही आमच्या मदतीस येऊ शकाल. तशी वेळ येऊ नये अशीच आपण आशा करूया पण मी ही खबरदारी काही खास हेतू ठेवूनच घेत आहे.”
केशवरावांचे समाधान झाले नाही पण त्यांचाही निरुपाय झाला.
समर्थांची रात्री बाहेर जाण्याची तयारी चाललेली दिसत होती.

"समर्थ," मी म्हणालो, "केशवरावांची गोष्ट वेगळी आणि माझी वेगळी बरं का! मला तुम्ही यातून वगळू शकत नाही."
"अप्पा, तुला बरोबर न्यायला मन खरोखरच कचरतं. पुढे काय धोके आहेत याची मलाही कल्पना नाही."
"मग तर मी अवश्यच तुमच्याबरोबर यायला हवं!"
"ठीक आहे, आजवर आला आहेसच, तसा आणखीही एकदा!"
"तुमचा विचार काय आहे ते तुम्ही सांगू शकत नाही का, समर्थ? "
"आपल्याला रायसोनींच्या बंगल्यात शोध घ्यायला हवा." ते गंभीरपणे म्हणाले, "काही विचित्र शक्तींचा वापर होत असला तर ती गोष्ट माझ्यापासून लपून राहात नाही. रायसोनींच्या खोलीकडे जाताना मला ही संवेदना तीव्रपणे झाली होती. त्या बंगल्यात सर्व दिसतं तसं नाही, अप्पा. आणि अशी जर काही गुपितं असली तर ती गुप्त ठेवण्याचीही व्यवस्था असणार-आपण जाणार आहोत ते तर नक्कीच-पण सगळी तयारी करून जाऊ या."
समर्थांची तयारी म्हणजे वेगळाच प्रकार होता. त्यांना पुढच्या काही अडचणींची कल्पना होती. मला तर तीही नव्हती. तेव्हा त्यांच्यासाठी योजायचे उपाय तर आणखीच दूर राहिले.
तेव्हा मग रात्र. आणि आमचे रात्रीत प्रयाण. पुनरावृत्तीने कधीही जुनी न होणारी उत्कंठा. आम्ही चालत होतो आणि समर्थ बोलत होते.
"अप्पा, मकरंद सोहोनी आठवतो ना? तो असाच गडप झाला होता आणि त्याची आई आपल्याकडे आली होती. माझ्या मर्यादित शक्ती वापरून मी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला होता-पण सुरुवातीस मला अपयश आलं होतं. तुला सांगितलेलं आठवतं? जिवंत अथवा मृत, मकरंद कोणत्याही अवस्थेत असता तरी ते मला जाणवलं असतं- शेवटी काय झालं हे तुला आठवत असेलच . मेनका रायसोनीचा शोधही मी त्याच मार्गाने घेण्याचा प्रयत्न केला..." समर्थ गप्प बसले.
मी काहीच बोललो नाही.
"माझ्या नजरेसमोर मेनका आली.... पण ही मेनका नैसर्गिक वाटत नव्हती...अशा अर्थाने की आरशातून दिसलेला माणूस नैसर्गिक वाटत नाही. आपल्यापर्यंत पोचणाऱ्या संवेदना त्याच्यापासूनच निर्माण झालेल्या असतात पण त्यांच्या मार्गात काच आल्याने त्यांतल्या काही गडप होतात. आरशातला माणूस हा खोटा नाही पण संपूर्ण खराही नाही. मेनका मला तशी दिसली. तिची सर्वांगाने जाणीव होत नव्हती. तिच्यातले काही काही गुगविशेष माझ्यापर्यंत पोचत नव्हते. हा व्यक्तिगत भाग झाला. याखेरीज आणखीही आहे. ती ज्या पार्श्वभूमीवर मला दिसली त्यातही

माझ्या मनाला काहीतरी खटकत होतं....मेनका आहे, सुखरूप आहे. पण कोणत्या तरी विलक्षण जागी लपवलेली आहे एवढं समजलं ...आता पुन्हा एकदा शोध घेईन...जास्त तपशीलवार निरीक्षण करीन...एक गोष्ट नक्की की कोणत्यातरी संघटित पाशवी शक्ती यामागे आहेत ...”

समर्थ जरा वेळ स्वतःशीच विचार करीत चालत राहिले.

“किती विविध रुपांनी त्या अवतरतात, नाही? त्यांना जणू नाशच नाही! केवळ मानवी बुद्धी यामागे असेलसे वाटत नाही. त्यांना सतत कोणाची ना कोणाची तरी बाह्य मदत हमखास उपलब्ध असते.”

संघर्षाकडे समर्थ संकुचित नजरेने कधीच पहात नाहीत. शुद्ध आणि शापित अशा परस्परविरोधी शक्तींचा जो अनादी संघर्ष चालला आहे त्या व्यापक पटावर ते घटनेचे मोजमाप करतात. वरवर दिसणारे क्रौर्य किंवा हिंस्त्रपणा त्यांना फसवू शकत नाही. अगदी गर्भात दडलेली नीच प्रेरणा ते नेहमी हेरत असतात. बोलता बोलता समर्थ थांबले आणि त्यांच्या स्वतःच्या विचारांत गढून गेले.

रायसोनींचा बंगला आम्हाला दिसायला लागला तेव्हा रात्रीचे बारा वाजत आले होते. सर्वत्र सामसूम होती. आता बहुतेक पोलीस पहारा नसावा. रायसोनींचा खाजगी पहारेकरी असणारच, त्यांच्याबरोबर एक किंवा दोन शिकारी कुत्रेही असणार. पण त्यांच्या हालचालींची कल्पना बाहेरून येत नव्हती.

समर्थ मोठ्या गेटकडे वळलेच नाहीत. भिंतीच्या कडेने चालताचालता ते म्हणाले, “अप्पा, काल मी याच बाजूला एक लहान फाटक पाहिलं होतं...”

सुमारे पन्नास पावलांवर ते फाटक सापडलं. त्यांच्या बिजागऱ्या गंजल्या असण्याचा संभव होता. ही शक्यता समर्थही विसरले नव्हते. त्यासाठी त्यांनी तेलाची बाटली बरोबर आणलीच होती. चारी बिजागांत आणि सरकत्या कोयंड्याच्या सांध्यांत त्यांनी तेलाचे दोन-दोन थेंब सोडले. तेल आत मुरायला एखाद्या मिनिटाचा वेळ देऊन मग त्यांनी गजांतून दोन्ही हात आत घातले. एका हातात एक लांबलचक 'स्केलेटन' किल्ली होती; दुसरा हात आधार द्यायला होता. कुलूप गजावर आपटल्याचा एक बारीकसा 'खट!' आवाज झाला, पण तेवढाच. काही क्षणांतच 'कट्!' आवाज होऊन कुलूप उघडले, कोयंडा सरकला आणि काही आवाज न होता फाटकही उघडले. समर्थ आत गेले, मी आत येताच त्यांनी फाटक लावून बोल्ट थोडासा सरकवून ठेवला.

झाडांमुळे आत बराच अंधार होता. त्याची डोळ्यांवा सवय होऊ देण्यासाठी आम्ही काही वेळ तिथेच थांबलो. आणि मग समर्थ अगदी सावकाश पुढे निघाले. झाडी संपत आली, बंगला दिसायला लागला. समर्थ एकाएकी थांबले. समोरच्या एका

लहानशा दाराकडे ते बोट करून दाखवत होते. मलाही तिथल्या पायरीवरची हालचाल दिसली. पायरीवर कुत्रा होता आणि त्यालाही कसलीतरी चाहूल लागून त्याने मान वर केली होती. मानेवरूनच जनावर प्रचंड आहे हे दिसत होतं.
''अप्पा, मागे सर-झाडामागे जा-" समर्थ म्हणाले. मी मागे सरकताच त्यांनी एक चमत्कारिक आवाज काढला, अर्धवट शीळ, अर्धवट ललकारी. ते माझ्याजवळ उभे असूनही मला आवाजाची दिशा समजत नव्हती.
कुत्रा जागना हालला, उभा राहिला, इकडे तिकडे पहात सरळ आमच्या रोखाने आला. त्याची हालचाल सावध असली तरी अस्वस्थपणावी नव्हती.. अगदी समर्थापाशी पोचेपर्यंत त्याला ते जाणवलेच नसावेत. मग तो एकदम ताठ उभा राहिला; त्याच्या घशात गुग्गुर व्हायला सुरुवातही झाली. पण तो आवाज मधेच थांबला. शेपटी हालवत तो समर्थापाशी आला. त्यांचा हात एकदा हाललेला मला दिसला ... त्यांनी कुत्र्याला काहीतरी खायला दिलं. असावं...वारण तिथल्यातिथेच तो पेंगून पडला.
अजूनही समर्थ झाडांच्या कडेवरच उभे होते. जरा वेळाने उजव्या बाजूने बुटांचा आवाज यायला लागला. त्यामागोमग बंगल्याच्या बाजूने पहारेकरीही दिसायला लागला. तो अतिशय सावरणाने गस्त घालत होता. दर दहा पावलांवर थांबून चारी बाजूला नीट पाहून तो पुढे जात होता. अगदी आमच्या समोरच तो थांबला सगळीकडे पाहून मग तो पुढे गेला. तो पाचसात पावले चालला असेल नसेल तोच सभांचा आवाच आला.
"थांब! " एकच शब्द, पण विलक्षण प्रभावी! पाहरेकरी जागच्याजागी थांबला. त्याने मागे वळूनसुद्धा पाहिलं नाही. आम्ही त्याच्यासमोर आलो तरी त्याची नजर अगदी समोर खिळली होती, ती जराही हालली नाही.
"तू एकटाच आहेस का आणखी तुझ्या मदतीला आणखी कोणी आहे?"
"मी एकटाच आहे." त्याचं उत्तर ताबडतोब आलं.
''बंगल्याच्या एखाद्या दाराची किल्ली तुझ्याजवळ आहे?"
''हो.''
"ती मला दे." समर्थांनी हात पुढे केला. पहारेकऱ्याने खिशास हात घातला, किल्ली बाहेर काढून ती समर्थांच्या समोर धरली.
''नीट ऐक." समर्थ एक एक शब्दावर जोर देत म्हणाले, "तू रात्रभर जागा होतास. गस्त घालत होतास. नेहमीपेक्षा वेगळं असं काहीही घडलं नाही. तुला कोणीही दिसलं नाही. तुला कसलाही आवाज ऐकू आला नाही. कुत्र्यालाही कसलासुद्धा संशय आला नाही. समजलं? लक्षात राहील? "

“हो.”

“जा तुझ्या गस्तीवर.” त्यांचे शब्द उच्चारून होतात न होतात तोच तो हलला, इकडे तिकडे पहात पुढे चालायला लागला. जणू काही घडलच नव्हतं.

“ज्या दाराशी हा कुत्रा बसला होता त्याच दाराची ही किल्ली असणार” समर्थ म्हणाले आणि तिकडे निघाले. त्यांचा अंदाज खरा ठरला आणि दार अलगद उघडलं.

“बंगल्याचा प्लॅन तुझ्या लक्षात आहे का?” समर्थ हलकेच म्हणाले. “अं हं.”

“मग माझ्या मागोमाग अगदी सावकाश चल.” ते म्हणाले आणि निघाले.

त्यांची वाट एकदाही चुकली नाही. ज्या खोलीत रायसोनींची भेट झाली होती त्या खोलीकडे ते निवाले होते. खोली आणि बोळ ओलांडताना ते आधी पुढचा कानोसा घेत होते आणि मग झपाझप चालत होते. रायसोनींच्या खोलीकडे जाणाऱ्या बोळापाशी येताच ते थांबले. पहिल्या भेटीच्या वेळीही ते इथेच थबकले होते हे आता मला आठवलं.

एका अंगाला गॅलरी होती; दुसऱ्या अंगाला भिंत होती. भिंतीवर म्यूरल डिझाइन्स होती. भडक रंग आणि दुर्बोध रचना त्या चित्रकृतीकडे समर्थ पहात होते. त्यातल्या त्यात एका चित्राकडे जास्त निरखून पहात होते. ते आणि त्यांच्या मागोमाग मीही चित्राजवळ पोचलो. मला काही समजलं नव्हतं. तरी मीही चित्राकडे पहात होतो. चित्राचा तर बोधच होत नव्हता. जी चित्रं खूप दूरवरून पाहिली तरच समजतात त्यापैकी हे असावं. मला काहीच सांगता येत नाही. पण समर्थ चित्राकडे न पाहता ती भिंत हातांनी तपासत होते. त्यांच्या सर्व क्रियाच माझ्या समजापलिकडच्या होत्या. तेव्हा मी फक्त पहात होतो. त्याचबरोबर बोळाच्या दोन्ही बाजूला लक्षही ठेवत होतो.

“आहा!” अपेक्षित काहीतरी सापडल्याच्या समाधानाचा उद्गार त्यांच्या तोंडून निघाला. भिंतीतली एखादी गुप्त कळ त्यांना सापडली असावी, कारण भिंतीचा एक भाग सावकाश हलायला लागला होता. ते दारच होतं, पण किती बेमालूमपणे बसवलं होतं! भिंतीमागची खोली आता दिसू लागली. समर्थ व त्यांच्या मागोमाग मी आत पाय टाकला. समर्थांनी दार परत जवळजवळ बंद केलं. आगदी लहानशी फट ठेवली.

खोलीत बंद खिडक्यांतून अंधुकसा प्रकाश येत होता, पण खोली रिकामी आहे हे दाखवायला तो पुरेसा होता. समर्थ विचारमग्न अवस्थेत उभे राहिले. “अप्पा, मेनका इथंच कोठेतरी आहे याबद्दल मला शंका नाही! पण ही खोली तर रिकामी दिसते! आणखी एखादं चोर दार आहे की काय? पहा बरं भिंती तपासून-”

पण खोलीला दार दिसत नव्हतं. फक्त एका भिंतीत जमिनीपासून सुमारे दोन फुटांवर एक कपाट दिसत होतं. भिंत पहात पहात मी त्या कपाटापाशी आलो, कपाटाचं दार उघडलं आणि आत पाहिलं.
अशी काही दृश्यं असतात की ती आपल्या अनुभवांच्या पार पलीकडची असतात. मेंदूला त्याचा अर्थच समजत नाही. कपाटाच्या आत असंच काहीतरी होतं. मी नकळत दोन पावलं मागे सरत ओरडलो,
"समर्थ! हे पहा काय आहे!"
कपाटाच्या आत मोकळी जागा होती. त्या जागेत एक प्रकारचा मंद हिरवट प्रकाश पसरला होता. कपाटाच्या तळापासून एका जिन्याला सुरुवात झाली होती. पहिली पायरी स्पष्ट दिसत होती. पण पुढे सगळंच धूसर, अंधुक दिसत होतं. असं वाटत होतं की त्या एका पायरीपासून अनेक जिने निघाले आहेत, वेगवेगळ्या दिशांना वळले आहेत, वर गेले आहेत.
वर काय होतं ते दिसत नव्हतं. एका पायरीपुढचा सर्व भाग अंधुक होत होत हिरवट प्रकाशात अदृश्य झाला होता.
"अच्छा! असा प्रकार आहे काय? "समर्थ त्या अजब दृश्याकडे पहाता पहाता हलकेच म्हणाले. त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे नवल, एक अर्धवट अविश्वास दिसत होता. भीतीचा तर लवलेश नव्हता.
"समर्थ! हा प्रकार आहे तरी काय?"
"अप्पा, मागे सरक-त्या पायरीला स्पर्शही करू नकोस! "समर्थ म्हणाले. त्यांनी त्या कपाटाचे दार लावून टाकले. तो चमत्कारिक जिना आमच्या नजरेआड झाला. पण समर्थांच्या चेहऱ्यावरचे नवल मात्र अजून कायम होते. "अप्पा, आपण आधी बाहेर पडू या....मग यावर विचार! कोठे काय दिसेल कल्पनाच करता येत नाही, नाही का?" ते म्हणाले.
त्यांचे शरीर एकदम ताठ झाले. माझा हात धरून मला ओढत ओढत त्यांनी भिंतीजवळ नेले. त्यांना आधी लागलेली चाहल मला आता ऐकू आली. बाहेरच्या बोळातून कोणीतरी सावकाश चालत येत होते. पावले दारापाशी आली, थांबली. "अरे! "एक आश्चर्योद्गार निघाला. रायसोनी!
दार सरकावले गेले. आणि त्याच क्षणी समर्थ हलले. त्यांची हालचाल चित्त्यासारखी सफाईदार आणि झटपट झाली. रायसोनींवर झडप घालून समर्थांनी त्यांना खोलीत खेचले, दुसऱ्या हाताने मला बाहेर ओढले, दार आमच्या मागे सरकावून घेतले आणि खालचा रस्ता धरला.
"पळ! अप्पा पळ!" ते माझ्या कानात म्हणाले.

आम्ही खालच्या लहान दारातून बाहेर पडतो न पडतो तोच सर्वत्र दिवे लागले, एक घंटा खणखणायला लागली. तसा मी चपळ आहे, पण समर्थांनीः मला केव्हाच मागे टाकले. मी झाडापाशी पोचलो तेव्हा बंगल्यात आरडाओरडा सुरू झाला होता. “अप्पा” समर्थ मला थाबवून म्हणाले, “नीट ऐक. फाटक माहीत आहे ना? सरळ फाटकातून बाहेर पड आणि घरची वाट घर. माझी वाट पाहू नकोस. ऐकलंस ना! चल पळ तर मग!”
त्यांचा शब्द मानणं भाग होतं. मी फाटक उघडलं, बाहेर आलो आणि रस्त्याने पळत सुटलो. काही वेळाने मला उमगलं की हे चूक आहे; समर्थ आवारात आहेत तोवर माझ्या मागे कोणी येत नाही. मी धावफळ थांबवली, -सावकाश चालायला लागलो. पण छातीत अजूनही केवढी धडघड होत होती!
रात्री तीनच्या सुमारास घरी पोचलो. एकदा असं वाटलं होतं की समर्थ माझ्याही आधी घरी पोचले असतील. पण त्यांचा पत्ता नव्हता. बाहेरचा दिवा जळत ठेवला, गॅसवर कॉफी चढवली आणि त्यांची वाट पहात हॉलमधे बसलो.
माझ्यामागून अर्ध्या तासाने समर्थ आले. मला जागा पाहून त्यांना आश्चर्य वाटले नाही. कॉफी पुढे येताच मात्र ते हसले. “मस्त, अप्पा! मी अगदी हेच सुचवणार होतो!”
“तुम्ही कसे बाहेर पडलात विचारण्यात अर्थच नाही, नाही का?”
“ते काही तितकसं कठीण नव्हतं. अंधार होता आणि झाडांची मदतही होती.” त्या आठवणीने समर्थांना जरासे हसू आले.” माणसाची आपल्या 'बायेंद्रियावर केवढी मदार असते! त्यांच्यातर्फे आलेली माहिती तो अगदी आंधळेपणाने स्वीकारतो ... त्या माणसांना दोष देण्यात काहीच अर्थ नाही ... झाडांची पानं सळसळली की ते तिकडे धावत होते ... एका बाजूने कुजबुजण्याचा आवाज आला की ते तिकडे धावत होते. शिवाय एकमेकांचा पाठलाग करून एकमेकांना धरत होते ते वेगळंच. तिथून बाहेर पडायला मला खरोखरच काही त्रास पडला नाही.”
कॉफी संपवून त्यांनी कप खाली ठेवला. ते हसत म्हणाले,
“झोपेचा विचारही मनात नाही, हो ना १ ठीक आहे. प्रसंग ताजे आहेत तोवर त्याच्यावरची चर्चाही उपयुक्त होईल. माझे विचारही तितके अधिक स्पष्ट होतील. आता मुळापासून सुरुवात करू. रायसोनींनी श्रीरंगला यांत गुंतवण्याचा कट प्रथमपासूनच आखला होता. म्हणून मेनकाबद्दल ते एवढे बेफिकीर होते. श्रीरंगकडून कबुलीजबाब वदवण्याचा प्रयत्न हाही त्यातलाच एक भाग होता. तो त्यांचा प्रयत्न फसला. श्रीरंगला आता बहुतेक जामी नावर मोकळा करतील. सध्या केशवरावांना त्याची व्यवस्था पहायला सांगितलं आहे.”

“आधी मेनकेचा महत्त्वाचा प्रश्न सोडवायला हवा. रायसोनींच्या खोलीपाशीच मला जी संवेदना झाली ती बरोबर होती हे तू पाहिलेसच. बंगल्यातली रात्रीची गस्त एरव्ही अनावश्यक वाटली असती - पण आता त्याचंही स्पष्टीकरण होतं – कारण मेनका रायसोनींच्या बंगल्यातच लपवलेली आहे. मला नाही वाटत ती याला स्वेच्छेने तयार झाली असेल. श्रीरंग बदनाम झाला असता तर मग तिला अलगद लोकांसमोर आणता आलं असतं. तो डाव फसला आहे. ते श्रीरंगवर आणखी एखादी आपत्ती आणण्याआधीच आपण मेनकेला त्यांच्या हातून सोडवलं पाहिजे. म्हणजे उद्या-किंवा आज रात्रीच.

‘‘आणि याचं रहस्य त्या चमत्करिक जिन्यात दडलेलं आहे. अप्पा, मी आजवर असं काहीही पाहिलेलं नाही.”

“तुम्हाला त्याचा अर्थ समजला का, समर्थ? “

“समजायलाच हवा-एवढंच नाही, तर तो व्यूह भेदून त्यातून मेनकेची सुटकाही करायला हवी. हे एक आव्हान आहे. ते स्वीकारलंच पाहिजे.” त्यांच्या शब्दाशब्दात निर्धार व्यक्त होत होता.

“आधी काय दिसलं हे नीट समजून घ्यायला हवं. समोरचा जिना काही विलक्षण रीतीने बदललेला आपल्याला दिसला. अप्पा, तू जर नीट पाहिलं असतंस तर तुला दिसलं असतं की त्या एका तळपायरीपासून सुरू होऊन असंख्य जिने वर गेले होते. याचा अर्थ त्या सर्वांना फक्त खालची पायरी हीच समान होती. यापुढे सर्व विभक्त होत गेले होते. पांढऱ्या रंगातूनच जसे सप्तरंग निर्माण होतात तसे एका सत्यातून हे अनेक अविष्कार निर्माण झाले आहेत. वर जाणाऱ्या असंख्य जिन्यांपैकी जो आपल्याला मेनकेकडे नेईल तोच आपण नेमका निवडला पाहिजे. त्यासाठी या विघटनामागचा त्यांचा हेतू समजला पाहिजे.”

“पण हे अनेक जिने...हा प्रकार आहे तरी काय? “मी विचारलं.

“पांढऱ्या प्रकाशातून सप्तरंग निघतात; सप्तरंग एकाच वेळी पाहिले तरी पांढऱ्या रंगाचा भास होतो. तीच उपमा येथेही योग्य ठरेल. व्यवहारात आपण अनुभवतो ते सर्व प्रसंग, मनावर नोंदल्या गेलेल्या सर्व घटना, एकूण जाणवणारी सर्व बाह्यसृष्टी, ही एकात्म नाही. अनेक वेगवेगळ्या घटकांचे ते एकत्रित प्रक्षेपण आहे. आपल्या स्थूल दृष्टीला हे वेगवेगळे घटक जाणवत नाहीत, पण काही उपायांनी हे पृथकरण यशस्वीपणे करता येतं त्यातलाच हा एक प्रकार असावा. पण हा प्रश्न महत्त्वाचा नाही. त्यांचा हेतू काय आहे हे समजलं की पुढचा काही अंदाज बांधता येईल.”

“सर्व सृष्टीवर एका पवित्र संरक्षकशक्तीचे आच्छादन आहे असं मी मागे केव्हातरी तुला सांगितलं होतं. नीच आणि दुष्ट शक्तींच्या दृष्टीने ही व्यवस्था अत्यंत अनिष्ट आहे

हे उघड आहे. काया, वाचा, मनाने ते सदैव हा संरक्षक पडदा नष्ट करण्याच्या योजनात मग्न असतात. सृष्टीचे सुंदर रूप बदलून सर्वत्र अनाचाराचे थैमान माजावे हीच त्यांची एकमेव इच्छा असते. । त्यांचा हा हेतू लक्षात घेऊन त्यांनी काय केलं आहे हे ते तपासलं पाहिजे... म्हणजे मग त्याचा अर्थबोध होईल."

समर्थांच्या शब्दांचा अर्थ मला समजला. त्यांना विचारासाठी वेळ आणि एकांत हवा होता. मी त्यांना हॉलमधेच सोडून माझी खोली गाठली. कॉटवर पडलो खरा, पण उत्तेजित मनाला झोपेचा स्पर्शसुद्धा होत नव्हता. अगदी वेगळं असं काही तरी अनुभवास आलं होतं.

बराच उशीरापर्यंत मी झोपलो होतो. रात्रीत समर्थांचा विचार किती काळ चालू होता मला कल्पना नव्हती. मला जाग आली तेव्हा समर्थ हजर नव्हते. सरते शेवटी संध्याकाळी सहा वाजता ते परत आले. चेहऱ्यावर जरासा शीण होता, पण नजरेत मात्र समाधान होते. शोधाचा आणखी एक टप्पा त्यांनी ओलांडला असावा.

"जेवण? " माझ्या प्रश्नावर ते हसत म्हणाले. "आज जेवणाला सुट्टी! उपवासानेच बुद्धीला खरी धार येते, आणि आज रात्री तर त्याची फारच आवश्यकता आहे."

"दिवसभर होतात तरी कोठे?"

"आधी केशवरावांची गाठ घेतली. त्यांना श्रीरंगवर लक्ष ठेवायला सांगितले. यी लक्ष ठेवायला सांगितले म्हणजे काय याची केशवरावांना पूरेपूर कल्पना आहे. तेव्हा श्रीरंगची सध्या काळजी करण्याचं कारण नाही. आणि मग वास्तवशास्त्रातल्या एका नाणावलेल्या प्राध्यापकांची गाठ घेतली."

"वास्तशास्त्रातले प्राध्यापक?"

"होय. स्थल, काल, द्रव्य यांचे परस्परसंबंध समाजावून घेतल्याशिवाय हा गुंता मला उलगडणार नाही. ही पृथःकरणाची कल्पना त्यांना हास्यापद वाटत होती, पण एक गणिती कोडे या दृष्टीने त्यांची चर्चा करायला हरकत नव्हती, किंबहुना ते सर्व वेळ त्यांच्या नकळत ही चर्चाच करीत होते."

"पण तुमच्या हाती काही लागलं का एवढ्या प्रयासानंतर? "

"त्यांची गणिती सूत्रं इतकी क्लिष्ट आहेत की ती माझ्या समजापलीकडची आहेत. वस्तुनिष्ठ बाह्य सृष्टीचे स्पष्टीकरण ते कसे करतात, कालप्रवाह आणि वर्तमान-भूत भविष्य या संबंधात त्यांच्या कल्पना काय आहेत हे तर मला जाणून घ्यायचं होतं. त्या दृष्टीने ही भेट उपयुक्त झाली. अप्पा, त्यांच्यातही यावर एकमत नाही, कारण सर्व तर्काचाच भाग आहे. आपल्याकडची प्राचीन कल्पना. अंशी आहे की भूत, वर्तमान, भविष्य हा सर्व निश्चित आहे, जणू एखाद्या प्रचंड गलरीच्या भिंतीवर रंगवलेलं एक अखंड चित्रच आहे. माणसाची जाणीव किंवा अस्मिता एका ठराविक

दिशेने प्रवास करीत असते आणि तिला एकएक प्रसंग भेटतात आणि मागे जातात. तो भविष्यकाल असतो तो वर्तमान होतो आणि मग भूतकाळात जमा होतो. या दृष्टीने कालयंत्रणा स्थिरं आहे, कालप्रवाह नाही-गती आहे ती मानवी आत्म्याला आहे. हे तितकंसं पटत नाही कारण मग जर सर्व घटना आधीच ठरल्या असतील तर मग पुरुषाच्या महत्त्वाकांक्षेला, प्रयत्नांना वावच कोठे राहतो? नाही, ही यंत्रणा इतकी जड नाही."

"घटनात विसंगती, पर्याय किंवा भेद दाखवणारी दोन सूत्रे त्यांनी मला सांगितली. एक आहे हायजेनबर्गचे अनिश्चितता तत्त्व, आणि · दुसरी कल्पना अशी आहे की आपल्याला जाणवणारी बाह्यसृष्टी ही एकसंघ,' एकात्म अशी नसून अनेक घटकांची किंवा पटलांची मिळून बनलेली आहे.' त्यांनी मला एका उपमा दिली. उपमा हुबेहुब नाही...पण मनातलं चित्रण स्पष्ट व्हायला तिची मदत होते, तर मग ही बाह्यसृष्टी म्हणजे एकावर . एक समांतर रचलेल्या फिल्मच्या पट्ट्यांसारखी आहे. यातली एक पट्टी काढून पाहिली तर त्यातले लोक सपाट, द्विमित असे दिसतील. पण एकावर एक रचलेल्या अनेक पट्ट्यांचा एका चौकटीतून आरपार पाहिलं की त्यातील सर्व चित्रांना एक सजीवपणा, घनपणा, खरेपणा येतो. कारण पट्ट्यांवरची चित्र ही एकमेकाच्या हुबेहुब नकला नाहीत, तर प्रत्येक पट्टीत त्यांच्यात अगदी सूक्ष्म असा बदल होत जातो. सर्व पट्ट्यांची मिळून झालेली एक चौकट म्हणजे सृष्टीतील एक घटना होय. घटना ही 'इव्हेंट' या अर्थी व्यायची त्यात स्थळ आणि काळ दोन्ही येतात.

"या सर्व पट्ट्यांचा मिळून जो प्रवाह होतो तो मुख्या घटना प्रवाह आहे. पण एकावर एक रचलेल्या पट्ट्यांतील चौकटीतल्या एकेक पात्राचे निरीक्षण केले तर त्याच्यात थोडाथोडा बदल झालेला दिस्तो. एका पट्टीपासून दुसरी जितकी जास्त दूर तितका बदल अधिक होतो. समांतर विश्वांची कल्पना यासारखीच आहे. प्रत्येकाला जे एक इच्छा स्वातंत्र्य आहे त्याचेही स्पष्टीकरण यात होते, कारण घटनेत भाग घेणारी प्रत्येक व्यक्ती त्या चौकटीतील कोणतीही क्रिया निवडू शकते पण... हा एक मोठा पण आहे. मूळ प्रवाहापासून पट्टी जितकी अधिक दूर, तितका तो प्रसंग घडण्याची शक्यता कमी. कोणताही निर्णय घेताना माणूस मनाशी वेगवेगळ्या पर्यायांचे परिणाम काय होतील याचा जो हिशेब करतो तो या वेगवेगळ्या पट्ट्यांतून दृगोच्चर होतो. कमीअधिक शक्यतांच्या मालिका एकावर एक रचून सर्वमान्य सत्य साकार होत असते."

समर्थ काही वेळ थांबले आणि मग जरा हसून म्हणाले.

"तुझं डोकं कलकलायला लागलं असेल, नाही अप्पा? पण प्रत्यक्ष सृष्टीरचनेच कोडं उलगडल्याशिवाय आपल्याला यश येणारच नाही. तेव्हा ही वेगवेगळी, समांतर,

पण थोडाथोडा फरक असलेली सृष्टीचक्रे आपण कल्पनेत आणली. त्यांनी हे विघटन कसं केलं असेल हे मागाहून पाहू. आता त्यांचा हेतू. पाहायला हवा. सर्वथैव सदाचारी जग जसे अशक्य कोटीतले आहे तसेच सर्वथैव अनाचारी जगही अशक्य आहे. पण या दोन्ही शक्यता आपल्या रोजच्या जगात सामावलेल्या आहेत. कशा ते आपण मघाशीच पाहिलं आहे. वरच्या अनंत पट्ट्यांपैकी काहींची दिशा अनाचाराकडे झुकलेली असेल, तर काहींची दिशा सदाचाराकडे झुकलेली असेल. असे जग अशक्य कोटीतले असले तरी त्याच्या संदर्भापुरती त्याला सत्यता आहे. त्यातली पात्रे विकृत पण खरी असतील. मेनकेला पळवून नेऊन लपवगारे कोण आहेत याचा विचार केला की ते कोणती मालिका निवडतील हे उघड होते. ते स्वतःला सोयीस्कर ठरणारी, ज्यात चेटूक - भानामती यांचा सर्रास वापर होत आहे, जेथे धार्मिक प्रवृत्ती पार पार गाडल्या गेल्या आहेत असाच घटनाप्रवाह निवडणार. तेथे त्यांनी मेनकेला दडवून ठेवलेली असगार, तेथेच ते सर्वात जास्त सुखरूप आहेत. आणि अप्पा, तेथेच आपल्याला जायचं आहे आणि मेनकेला परत मुख्य कालप्रवाहांत आणायचं आहे. मेनका हे केवळ पटावरचं एक प्याद आहे. या नीचांचा प्रमुख कोण आहे मला माहीत नाही - पण तिच्या हालचालीमागे तोच आहे. आणि आता आपणही तोच डाव खेळणार आहोत. आजवरी कधी केलं नाही असं धाडस आपण करणार आहोत. पण जायला हे हवंच. आपण जाणार ही शक्यता पण एका पट्टीत असेल."

आम्ही निघालो होतो. रात्रीची अकराची वेळ- सोबतीला वारा आणि चांदण्या. आम्ही कोठे पोचणार होतो? मला काहीच कल्पना नव्हती. समर्थांनी जे सांगितलं होतं त्यातला एक शतांश भागही मला समजला नव्हता. त्यांना परिस्थिती समजली होती, ते निघाले होते आणि त्यांच्याबरोबर मी होतो. माझ्यापुरते एवढे स्पष्टीकरण मला पुरेसे होते.

समर्थ बंगल्याच्या फाटकाकडे चालले होते. आजचा त्याचा पवित्रा विलक्षण आक्रमक होता. कोणतीही अडचण मधे येऊ न देण्याचा त्यांनी जणू निर्धारच केला असवा. फाटकापाशी पोचताच त्यांनी हातातल्या काठीची चांदीची मूठ गजावर जोराने आपटली. काही वेळ थांबून पुन्हा एकदा आपटली. आतल्या आवारात सर्वत्न तो आवाच पसरला असला पाहिजे.

चांदण्यांच्या प्रकाशात एक धूसर आकृती आयच्याकडे येत होती. बहुतेक तो रात्रीचा पहारेकरीच असावा. तो फाटकापाशी येऊन पोचताच समर्थ हलक्या पण तीक्ष्ण आवाजात म्हणाले,

"फाटक उघड."

दोनच शब्द, पण त्यांच्या आधाताखाली तो क्षणभर दिङ्मूढ झाला आणि मग त्याने घाईघाईने फाटक उघडले. त्याच्याकडे वळूनही न पाहता समर्थ आत शिरले आणि सरळ बंगल्याकडे निघाले. मी एकदाच मागे वळून पाहिले. - तो जागच्या जागी खिळूत उभा होता....

समर्थ त्या लहानशा दारापाशी पोचले, त्यांच्या हातांत काहीतरी लखलखले

आणि दार उघडले. अंधारातच त्यांनी बोळ आणि खोल्या ओलांडायला सुरुवात केली, ज्या बोळात ती चमत्कारिक खोली होती तेथे आम्ही. पाय टाकताच सर्वत्र घंटा खणखणायला लागल्या. फाटकाजवळच्या पहारेकऱ्याला भानावर येऊन इषारा द्यायला इतका वेळ लागला होता!

दिवे लागून सर्वत्र लखलखाट झाला, पण समर्थ क्षणभरही न थांबता सरळ त्या खोलीच्या रोखाने निघाले. रायसोनींच्या खोलीचे दार धाडकन उघडले आणि दारातून एक तगडा माणूस आमच्या दिशेने धावत आला.

“तुम्ही कोण? इथे काय काम आहे?” तो ओरडत होता. समर्थ काहीच बोलले नाहीत. तो ओरडणारा माणूस योग्य अंतरावर येताच त्यांच्या हातातली काठी गर्रकन फिरली. वरची मूठ हवेतून एक प्रकाश वर्तुळ रेखाटत सपाट्याने खाली आली. प्रहार डोक्यावर झाला. क्षणभर तो डोळे वासून तसाच उभा राहिला आणि मग वेडावाकडा खाली कोसळला. त्याच्या मागोमाग आणखीही एक - दोघे त्या खोलीतून घाईघाईने बाहेर येत होते.

“अप्पा! चल! पहात काय उभा राहिलास? “समर्थ ओरडले.

त्या खोलीचे दार नुसते लोटलेले होते. आम्ही आत जाताच समर्थांनी त्याला आतून बोल्ट लावला-अगदी वेळेवरच, कारण लगोलग दारावर एक जोराची धडक बसली. समर्थ त्या कपाटापाशी पोचलेही होते. तिथे मात्र त्यांनी धकाधक्की केली नाही. कपाट आज उघडं नव्हतं. हे पहाताच समर्थ त्याच्या' कडा आणि दारामधली फट तपासून पहात होते. खोलीच्या दारावर जोरजोराच्या धडका बसतच होत्या. एवढ्या माराखाली ते दार किती टिकाव धरील हा प्रश्नच होता, कारण प्रत्येक दणक्याबरोबर ते आत वाकत होतं. पण इतर क्रशाकडे लक्ष न देता समर्थ दाराची एकाग्रपणे तपासणी करीत होते. शेवटी त्यांना योग्य ती जागा सापडली आणि त्यांनी त्यांचे ते लखलखते हत्यार फटीतून सावकाश आत सरकावले. हाताने एक विशिष्ट झटका देताच आतला खटका सुटला आणि दार अलगद उघडलं. त्याचक्षणी ' कच्च् ' आवाज करीत खोलीचे दार धाडदिशी उघडलं.

“असाल तसे थांबा....नाहीतर....” कोणीतरी दारातून ओरडले.

"चूप!" समर्थ कडाडले. पुढच्या माणसाच्या हातात निळसर काळे पिस्तूल होते. पिस्तुलाचे ओझे असह्य झाल्यासारखा त्याचा हात खाली आला. त्याच्या चेहऱ्यावर संताप आणि वेदना होती. कोणीतरी त्याला मागून ढकलले; आणखी कोणीतरी खोलीत येत होते.
"अप्पा! झटपट आत चढ!" समर्थ म्हणाले.
"थांबवा! त्यांना थांबवा! नाहीतर..."
मी आतल्या पहिल्या पायरीवर पाय ठेवला. मागचा तो आवाज अर्धवट थांबला आणि नाहीसा झाला.
पहिली पायरी...
आमच्या आसपासची खोली, बंगला, सगळं काही नाहीसं झालं होतं. आम्ही दोघं एक पडक्या जिन्याच्या पहिल्या पायरीवर उभे होतो. मोडका जिना अर्धवट वर गेला होता आणि थांबला होता. आमच्या मागे सर्वत्र दगड मातीचा ढिगारा होता. आसपास भयानक शांतता होती. एवढासा आवाजही कानावर येत नव्हता. सारी सृष्टीच जणू निर्जीव झाली होती.
पडक्या जिन्यावर आम्ही उभे होतो. आसपास उजाड माळरान पसरले होते. त्यावरून वहात येणारा वारा आमचे केस आणि कपडे फडफडवीत होता. लालसर रक्तवर्णी रंगात . पश्चिम उजळून निघाली हीती. ती निर्जीव शांतता मनात कोलाहल माजवीत होती. चारी दिशांना नजर टाकीत समर्थ म्हणाले,
"ही एक शक्यता आहे, अप्पा. त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाहीमात्र स्वतःबरोबर त्यांनी सर्व पृथ्वीच नष्ट केली आहे. तुझ्या ध्यानात आले का? आपल्या रोजच्या जीवनात हीही एक शक्यता सामावलेली आहे. पण ती प्रत्यक्षात येणं फार फार असंभवनीय आहे... कारण त्यांच्या हातून एका मागोमाग एक अशा असंख्य चुका होत गेल्या तरच त्याचा परिणाम असा होऊ शकेल .." त्यांची आसमंतावरून फिरणारी नजर आकाशाच्या एका बिंदूवर स्थिर झाली. मीही त्या दिशेला पाहिलं. अगदी लांबवर एक काळा ठिपका दिसत होता. पक्षी होता का आणखी काही होतं ते नीट दिसत नव्हतं.
"एक गोष्ट नक्की-" समर्थ म्हणाले, "आपली प्रवासाची दिशा भविष्यकाळाकडे आहे... भूतकाळात असा उत्पात झाला असता तर आपण स्वतःच त्यात सापडलो असतो..." आणि मग जवजवळ स्वतःशीच... "एक एक पायरी किती वर्षांची आहे कोणास ठाऊक!"
त्यांच्या शब्दांपेक्षा आसपासच्या देखाव्यावरच माझं लक्ष होतं. असा समज होत होता की हा भग्न वाडा आणि ओसाड पृथ्वी वर्षानुवर्षे अशीच पडलेली आहे, कदाचित

आम्हीच इथले पहिले प्रवासी असू!
दूरवरचा तो काळा ठिपका जवळ जवळ येत होता. हलणारे पंख आता स्पष्ट दिसत होते. म्हणजे तो पक्षी होता तर! पण केवढा मोठा पक्षी! मोठ्या गिधाडाहूनही मोठा. रंगाने काळाकुट्ट. अचानकपणे एका रक्तपिपासू, खुनशी, भुकने वखवखलेल्या 'मनाचा' स्पर्श मला जाणवला. बर्फाच्या स्पर्शासारखा बधीर करणारा. -
कि .. या! कि...या! कि...या!
या जगातला तो पहिला आवाज. त्या रोखाने मी वर पाहिले. खूप उंचीवर काळे गिधाड गिरक्या घालीत होते. त्याने आम्हाला हेरले होते. पुन्हा एकदा मनाला तो विषारी स्पर्श झाला...
किती दिवसांत असं ताजं लुसलुशीत मास मिळालं नाही!
“अप्पा!” समर्थ खेकसले. “वर पाहू नकोस! या जगाचा तो एकुलता पक वारस आहे...परिस्थितीच्या दाबाखाली विलक्षण प्रगत झालेला. . भेनका इथे असणं शक्यच नाही.”
कि....या! किया! कि...या!
ती हाक विलक्षण आकर्षक होती. समर्थाचा इशारा क्षणभर विसरून मी वर पाहिले. पक्षी याच क्षणाची वाट पहात होता. एखाद्या काळ्या तीरासारखा तो सपाट्याने खाली आला. माझी सर्व इच्छाशक्ती गोठल्यासारखी झाली होती. त्याची धारदार चोच आणि लाल डोळे एवढंच मला दिसत होतं....जवळजवळ...आणखी जवळ ...
“अप्पा!” समर्थ ओरडले आणि त्यांनी मला वर ढकलले.
तोल राखण्यासाठी मी पाऊल पुढे टाकले-पुढच्या पायरीवर.
दुसरी पायरी:
मला क्षणभर वाटलं मी अजून पडतोच आहे. समर्थाचा हात मी हातात घट्ट धरून ठेवला. मघाच्या धक्क्याने मिटलेले डोळे सावकाश उघडले. पडका जिना आणि ओसाड माळरान नाहीसं झालं होतं. अंधारी रात्र सर्वत्र पसरली होती. अंगावरून गार वारा झोंबत वहात होता. वर चांदण्या होत्या-पण त्या हेलकावे खात होत्या. मला चक्कर आल्यासारखं वाटलं.
“अप्पा! खाली पहा!” समर्थांचे शब्द वाऱ्याने हिसकावले जात होते. मी खाली पाहिलं आणि डोळे घट्ट मिटून घेतले.
खाली...किती खाली...एक विस्तीर्ण नगर पसरले होते. चमचमणारे पृष्ठभाग आणि गोंधळविणाऱ्या रेषाकृती. हे नगर आमच्या काळातले नक्कीच नव्हते. आम्ही भविष्यकाळात चाललो असलो तर खूपच लांबचा पल्ला गाठला असला पाहिजे.

जमिनीपासून सुमारे तीनशे फूट उंचीवरच्या एका मनोऱ्यावर आम्ही दोघे उभे होतो. जेमतेम दहा फुटांची चौरस जागा. चारी बाजूना चकचकत्या धातूचा कठडा होता. सर्व मनोरा वाऱ्यावर एखाद्या सूर्यफुलासारखा हेलकावे खात होता. त्याबरोबर सर्व देखावाच झेपावत होता.
“समर्थ! आपण कोणीकडे चाललो आहोत?” माझ्या आवाजात शंका होती.
“अप्पा, धीर धर हा शोध आपल्याला शेवटपर्यंत पुरा केला पाहिजे. स्वतःला अनुरूप अशी परिस्थिती ते निवडत आहेत. जेथे ते जास्त यशस्वी झाले असतील तेथे त्यांची सत्ता सर्वत्र असेल आणि तेथेच मेनका असेल. गुप्त किंवा उघड रूपात सर्व मानसिक शक्तींचा वापर चाललेला दिसेल. अप्पा. शेवटी चेटूक, भानामती, कर्णपिशाच्च, करणी, भारणी, मोहिनी ही सर्व मानसिक शक्तीचीच विविध रूपे आहेत. टेलीपथी, टेलीकायनेसिस, टेलीपोर्टेशन, प्रीकॉगनिशन, पायरोटेक्निक्स...ही शास्त्रीय नावे झाली. त्यांची सत्ता अधिष्ठित झाल्यावर ते या सर्वांचा उघड वापर करतील यात मला शंका नाही. या नव्या रचनेची आपण आता तपासणी करू ....मग-”
पण समर्थांचे शब्द अर्धवटच राहिले.
सप! आवाज झाला आणि आमच्याखेरीज तिथं आणखी एक व्यक्ती अचानकपणे अवतरली. कोठून, कशी हे समजलंच नाही. हा नवा माणूस प्रचंड होता. खरोखर इतका अवाढव्य माणूस मी आजवर पाहिलाच नव्हता...का होता? त्या माणसाचा चेहरा अर्धप्रकाशात उग्र दिसत होता. पण तरीही तो चेहरा मनातल्या काही आठवणी चाळवीत होता...
केशवराव कोरदंड? ... इथे?
“ठीक आहे. आता काही हालचाल करू नका. “तो माणूस रागीट आवाजात म्हणाला, “इथे काय करता आहात? आणि इथे आलात तरी कसे?”
त्याच्या हातातलं चकचकतं हत्यार आमच्यावर रोखलेलं होतं.
“माझ्या एका प्रश्नाचं उत्तर देता का? “समर्थांचा आवाज लाघवी होता.
“चटपट विचारा आणि चलाखी नको “मी आता त्याच्याकडे नीट पाहिले. शरीरावर कसला तरी जाडजूड आणि विचित्र गणवेश त्याने चढवला होता, त्याने शरीर आणखीच प्रचंड दिसत होते. त्याच्या आणि केशवरावांच्या चेहऱ्यात साम्य होतं- अगदी फसण्याइतकं. पण हा चेहरा केशवरावांपेक्षा जरा ओबडधोबड. रानटी, असंस्कृत असा वाटत होता.
“आपलं नाव केशवराव कोरदंड आहे का? “समर्थ म्हणाले.

“काय प्रश्न! हा हा हा! “अगदी खदखदून हसत तो गृहस्थ म्हणाला, “सारं राज्य सुरक्षा अधिकाऱ्याला ओळखतं! हाच का तुमचा प्रश्न?”
“तुम्ही आहात तेव्हा समर्थ असलेच पाहिजेत...ते कोठे आहेत?”
“चूप!” तो माणूस खवळून म्हणाला. “ते नाव मोठ्याने घेता! शरम वाटत नाही? तुम्ही खरोखरीच कोणीतरी जंगली असामी दिसता!”
“नाव घेत नाही-पण ते कोठे आहेत ते तरी सांगा?”
“या प्रश्नाचं उत्तर द्यायला काही हरकत नाही कारण ते मला माहीत नाही. समर्थ कोठे असतात हे कोणालाच माहीत नाही. मांत्रिक मंडळाकडून त्यांना सतत धोका पोचण्याची भीती आहे-त्यांचा बंदोबस्त करण्याचे कामही शेवटी समर्थानाच करावे लागते. ”
“तुम्ही इथे ज्या प्रकारे आलात त्यावरून मानसिक शक्ती सर्वसामान्यानाही प्राप्त झालेली दिसते.” समर्थ नवलाने म्हणाले.
“तशी गोष्ट नाही.” नकली केशवराव म्हणाले, “समर्थांनीच ही साधने सर्वांना उपलब्ध करून दिली आहेत. मांत्रिकमंडळ ज्या गोष्टी मानसिक शक्तीच्या सहाय्याने करते त्या गोष्टी आम्ही यंत्राच्या सहाय्याने करतो. मंडळाचे हेर गुपचूप वावरू पहातात, पण यंत्राने त्यांच्या हालचाली आम्हाला समजतात-जशी तुमची समजली तशी! आणि ही सगळी गुपितं तुम्हाला सांगायला हरकत नाही कारण तुम्ही कोणाशीच काहीही बोलणार नाही आहात ...”
त्याचे लखलखते हत्यार वर आले. समांनी माझा हात घट्ट घरला.
“केशवराव! “ते एकदम मोठ्याने म्हणाले. इतका विलक्षण आवाज, की तो सराईत सैनिकही गडबडला; त्या क्षणमात्रात समथानी माझ्यासह वर झेप घेतली. त्याच्या हातातले शस्त्र लखलखले; एक प्रखर प्रकाशझोत मघाशी आम्ही जेथे उभे होतो त्या जागेतून गेला. त्याने हत्यार वर उचलण्याआधीच समर्थांनी (आणि त्यांच्याबरोबर मीही) पुढची पायरी घेतली होती. अति उंच मनोऱ्याच्या कठड्यावरून आम्ही अक्षरशः मोकळ्या आकाशात पाय टाकला ...
तिसरी पायरी :
तो चमत्कारिक झुलता मनोरा, ते अपरिचित नगर आणि आमची राख करायला निघालेले केशवराव....सर्वच नाहीसं झालं होतं. आम्ही एका प्रचंड घुमटाखाली होतो. घुमटाच्या आकाराची कल्पनासुद्धा करता येत नव्हती इतका तो अवाढव्य होता. त्याच्या मध्यभागी एक खूप, मोठा उंचवटा होता. तकतकीत आवरणाखालचा तो उंचवटा सारखी हालचाल करीत होता. काय होतं ते देवासच (या पट्टीत देव

असला तर!) माहीत. पुन्हा एकदा आम्ही एका जगातून दुसऱ्या जगात आलो होतो. स्थळात-काळात कोठे होतो देव जाणे!

हा घुमट इतका प्रचंड होता की वरचा भाग धूसर झाला होता. आमच्या जवळून उगम पावून एक कमान झेपावत वर गेली होती आणि अदृश्य झाली होती. अभंग रचनेच्या एकेका रेषेत शक्ती गोठवल्याचा भास होत होता. काही ठराविक अंतरावर उंचच्या उंच, चिंचोळ्या खिडक्या होत्या. त्यांच्यातून पलीकडचे निळे आकाश आणि नगराचे चकचकते मनोरे दिसत होते. खालची जमीन मात्र विसंगत वाटत होती. तिथे फरशी वगैरे काही नव्हतं. नुसती काळी माती होती. आणि त्या मातीवर अजस्त्र चाकांचे ठसे उमटले होते..

दूरवर काहीतरी हालचाल दिसत होती. त्या दिशेने आम्ही सावकाश निघालो. बरेच अंतर काटल्यावर आम्हाला दिसलं की हालचाल करणारी प्रचंड यंत्रे होती. अर्धवट ट्रॅक्टरसारखी दिसणारी. त्यांच्या हालचाली आम्हाला सर्वस्वी दुर्बोध होत्या. माणसाचा येथे कोठे मागमूसही नव्हता.

"आणखी एका शक्यतेचं चित्र, अप्पा-" समर्थ हलकेच म्हणाले. त्यांचे शब्द जेमतेम माझ्यापर्यंतच पोचले असतील पण त्यांचा परिणाम मात्र अनपेक्षित झाला. सर्व यंत्रांची हालचाल एकदम थांबली आणि मग त्यांच्या तले एक वळून आमच्या रोखाने सावकाश हलायला लागले. ते जवळ येतः चालले तसा त्याचा अवाढव्य आकार अधिकाधिक स्पष्ट व्हायला लागला. आमच्यापासून दहा फुटांवर ते अगडबंब यंत्र थांबले. आमचे अस्तित्व त्याला जाणवले होते, यात तिळमात्रही शंका नव्हती. अशी एक विलक्षण कल्पना होत होती की ते यंत्र आमचं निरीक्षण करीत आहे. यंत्रातून एक आवज आला-

"तुम्ही इथे आलात कसे? हा माग मानवांसाठी बंद आहे." एखाद्या माणसाने अस्वस्थपणाने जागच्या जागी चुळबुळ करावी तशी त्या यंत्राची लहानशी हालचाल झाली. "वास्तविक तुम्ही अगदी बाहेरच्या वर्तुळातच अडवले जायला हवे होतात. येथपर्यंत पोचलातच कसे? मांत्रिक मंडळाला याची खबर द्यायला हवी."

"म्हणजे येथेही मांत्रिक मंडळ आहेच तर! "समर्थ म्हणाले.

"येथेही या शब्दाचा काय अर्थ? "यंत्राची अचूक गणिती बुद्धी काम करीत होती. "येथे याला काही पर्याय आहे का?"

"आम्ही येथपर्यत पोचलो यावरून काय अर्थ निघतो?" समर्थ म्हणाले.

"मानवांना ओळखण्याची तुमची पद्धत आम्हाला लागू पडत नाही. तात्पर्य आम्ही तुमच्या मालिकेतले नाही. म्हणजे पर्याय आला की नाही?"

यंत्र स्वतःशीच काहीवेळ विचार करीत होते. “तुमच्या मनांचे निर्यास मला जाणवत नाहीत हे खरं आहे.” “यंत्रांना अतिंद्रीय जाणीवासुद्धा प्राप्त झाल्या आहेत?”
“त्या आमच्यात सुप्त स्वरूपात प्रथमपासूनच होत्या. तुमचे कार्बनचे इलेक्ट्रॉन आणि आमचे प्लॅटीनमचे इलेक्ट्रॉन यांतला हा फरक आहे मांत्रिक मंडळाने आम्हाला पूर्णावस्थेस नेलं आहे.”
“म्हणजे मांत्रिक मंडळ पूर्ण सत्तेवर आहे तर?”
“होय.”
“समर्थ या नावाची व्यक्ती होऊन गेली का? का व्हायची आहे? “
“काही एका अपघाताने समर्थ त्यांच्या हातात सापडले. त्या अवस्थेतही त्यांना समर्थांचा नाश करता आला नाही. पण समर्थही काही हालचाल करू शकत नाहीत. डाव कुजल्यासारखा झाला आहे. पण समर्थाच्या मानसशक्तीचा मांत्रिक मंडळ उपयोग करून घेऊ शकते. आमच्यावर ठसा उमटवण्यासाठी ते त्याचा उपयोग करतात. माझ्यावर एवढ्यातच ही प्रक्रिया झालेली आहे.”
“तुमच्या सर्व क्रिया तर्कशास्त्रानुरूप होणार, नाही का?”
“होय. सार्वजनिक हिताची जाणीव आमच्यात नेहमी जागती असते.”
“मसा नाही वाटत तुमच्याकडून मानवजातीला काही धोका पोहोचेल.”
पण यंत्र स्वतःशीच विचार करीत स्तब्ध उभे होते.
“पर्यायी घटनामालिकांच्या अस्तित्वावर मी विचार करीत आहे.” यंत्र म्हणाले, “आता मला समजतं की ते नैसर्गिकच नव्हे तर आवश्यकच आहे. घटनांना त्याशिवाय सत्यता येणारच नाही. घटनांना अनंत पर्याय असणार. प्रत्येकाची संभाव्यता कमी जास्त असणार. आता मला हेही समजतं की आमच्या या घटनाक्रमाची संभाव्यता फार कमी आहे. जवळ जवळ अशक्य कोटीतलीच अशी ही रचना आहे. तुम्ही मुख्य प्रवाहातले आहात. घटनाव्यूहाचा भेद करून चालला आहात. मांत्रिक मंडळाने हीही शक्यता विचारात घेतली होती, आणि व्यूहभेद करणारांचा नाश करण्याचा आदेश मला देण्यात आला आहे. तर्कदुष्ट असला तरीही मला तो मानला पाहिजे.”
यंत्राचा पवित्रा एकदम आक्रमक झाला. तो आमच्या विरुद्ध गेला असला तरी माझ्या मनात त्याच्याबद्दल एक आपुलकी निर्माण झाली होती.
“थांब. “समर्थ म्हणाले. “मला नष्ट करण्यापूर्वी माझे काही शब्द ऐकून घ्यायला तुझी काही हरकत नाही ना?”
यंत्र त्याच पवित्र्यात काही क्षण थांबले..

“आमच्या जगातली यंत्रांची प्रगती पाहून मला असं वाटतं की तुझी कल्पना बरोबर नाही. यंत्रांतली प्रगती काही दिवसांतच हे वळण घेणार आहे. मुख्य प्रवाहापासून तुला वाटतं इतके तुम्ही दूर नाही. माझ्या काळात मांत्रिक मंडळाचा जय झाला नाही तर तुमचे जग सत्यतेत येण्याचा बराच संभव आहे. आणि आतां माझ्याकडे पहा.”
समर्थांनी चेहऱ्यावरून एक हात फिरवला आणि ते ताठ उभे राहिले. एवढीशीच हालचाल, पण केवढा परिणाम!
यंत्र एकदम दोन फूट मागे सरले.
“समर्थ!” त्या यांत्रिक आवाजातही एक महान आश्चर्य होते....
“होय, व्यूहभेद करणारा मी समर्थच आहे.”
यंत्राची अस्वस्थता प्रत्येक हालचालीत दिसत होती.
“मी काय करू? आदेश तुमच्या नाशाचा आहे, पण ती पाळणे सर्वथा अशक्य आहे. ठीक आहे. मी निर्णय घेतो. याबद्दल मला मांत्रिक मंडळ मोडीत काढतील याबद्दल शंका नाही. पण भविष्यात केव्हातरी आम्हाला सहभागी होता यावे यासाठी मी तुमच्या मदतीला तयार आहे. अतींद्रीय शक्ती वापरायला आम्हाला बंदी आहे. पण पुढचे संकट तुम्हाला सांगितलेच पाहिजे. चवथी पायरी तुम्हाला गाळावी लागेल.”
“का?”
“पुढच्या पट्टीत पृथ्वी नाही,”
“पृथ्वी नाही? “समर्थ आश्चर्याने म्हणाले.
“काहीच नाही. सर्व सूर्यमालाच नामशेष झाली आहे. मांत्रिकमंडळ अधिकारात येताच समर्थांनी एक प्रचंड भूमिगत संघटना स्थापन केली होती. ती नष्ट करण्यासाठी मंडळाने सी-१४ चक्राची अणूक्रिया वापरण्याचा प्रयत्न केला. पण सर्व क्रिया अनियंत्रित होऊन पृथ्वीचा स्फोट झाला. त्या उत्सर्जित शक्तीच्या आघाताने सूर्याचा तोल बिघडला आणि सूर्य नोव्हा अवस्थेत फेकला गेला. सर्व सूर्यमाला बेचिराख होऊन गेली. आता तेथे फक्त अतितप्त धूळकणांचा गदारोळ आहे. या स्फोटाचे धक्के अवकाशात दूरवर पोचणार आहेत. ती पायरी तुम्ही गाळलीच पाहिजे.”
समर्थ काही क्षण विचारमग्न अवस्थेत होते.
“मी तुम्हाला मदत करतो. एवीतेवी माझं अस्तित्व संपुष्टात येणारच आहे. माझ्यात साठवलेली शक्ती तुम्ही वापरू शकता. तयार व्हा.”
समर्थानी माझा हात पुन्हा एकदा हातात घेतला. एक लखलखाट झाला.. समोरचा तो अजब पसारा क्षणार्धात नाहीसा झाला.
चवथी पायरी :

पाचवी पायरी :
नकळत मी डोळे घट्ट भिटून घेतले होते ते उघडले. आधी समोर काही दिसेनाच. बारीक बारीक चमचमते बिंदूच तेवढे समोर नाचत होते. जरा, वेळाने नजरेला तोल आला आणि मग समोरचा देखावा स्पष्ट झाला. माझ्या चेहऱ्याला जवळ जवळ स्पर्श करणारी एक धातूची लवंचिक जाळी मला दिसत होती. डोळ्यांच्या इतकी जवळ असल्याने नजर तिच्यावर ठरत नव्हती. पहिला धक्का ओसरल्यावर मी हात वर आणून जाळी हातांनी चाचपून पाहिली. स्पर्शाला मऊ होती, गार होती. थोडीशी मागे रेटली जात होती, पण अगदी थोडीशीच.
''आगीतून निघून फोफाटयात पडलो, नाही का अप्पा?" समर्थांचा आवाज आला. मी डावीकडे वळून पाहिले. तेही माझ्यासारखेच धातूच्या एका अखंड कोशात गुरफटले होते. शारीरिक पीडा काही होत नसली तरी सर्व हालचाली एकदम बाद झाल्या होत्या.
"मागे पहा, अप्पा." समर्थाच्या आवाजात एक नवल होतं. मी (जरा कष्टानेच) मागे मान वळवली. टेलीस्कोपसारखी एक अजस्त्र, खूप लांब नलिका आमच्या मागे पसरत गेली होती. तिच्या मुखात आम्ही होतो.
"आपण भविष्यात चाललो आहोत-किती काळ देवासच माहीत!" समर्थ म्हणाले, "पृथ्वी सोडली नसली म्हणजे मिळवली ..."
त्यांचे शब्द थांवले समोर झगझगीत प्रकाश झाला. कोणाची तरी पावलं वाजायला लागली. समोरची रंगपद्धती इतकी विलक्षण होती की भिंती (त्या असल्यातर)चे कोन व अंतर समजतच नव्हती. एक चिंचोळी काळी रेषा एका बाजूचे दार ठरली. त्यातून कोणीतरी आत आलं.
पांढऱ्याशुभ्र केसांचा, गुबगुबीत शरीराचा तो गृहस्थ लगबगीने चालत आमच्या जाळ्यांपाशी आला. प्रथम माझ्या आणि मग समर्थांच्या जाळीत त्याने डोकावून पाहिलं. त्याची काय अपेक्षा होती कोणास ठाऊक, पण आम्ही दिसताच त्याचा विलक्षण अपेक्षाभंग झालेला दिसला.
कमरेवर हात ठेवून तो आम्हा दोघांकडे रागाने पहात उभा राहिला.
"मांत्रिक मंडळाचे हात येथपर्यंत पोचले अं?" तो शेवटी म्हणाला.
"आपण कोग आहात मला माहीत नाही." समर्थ म्हणाले, "पण तुमचा असा ग्रह झालेला दिसतो की आम्ही - मांत्रिकमंडळाच्या बाजूचे आहोत. तो प्रथम मनातून काढून टाका. मी समर्थ आहे. आणि ते मला त्यांचा सर्वांत मोठा शत्रू समजतात."
"समर्थ! समर्थ!" त्याचा आपल्या कानावर विश्वास बसत नव्हता असं दिसलं. जवळ येऊन तो समर्थांकडे निरखून पाहू लागला.

"मांत्रिक मंडळ आहे म्हणजे समर्थही असलेच पाहिजेत!" समर्थ ठासून म्हणाले. पण एकाएकी त्यांचा आवाज खाली आला. "मागच्या एका मालिकेत ते त्यांच्या हातात कैदी झाले होते..."

"तुम्ही व्यूहभेदक लोक! च"त्यांनी एका बाजूचे काही गोलक मागेपुढे केले. आमच्या भोवतीची जाळी वर खेचली गेली. मोकळे होऊन आम्ही त्या पोलादी चौथऱ्यावरून खाली उतरलो. समर्थांकडे अजूनही तो गृहस्थ नवलाने पहात होता.

"माझ्यावर तुमचा विश्वास बसत नाही का?" समर्थ शेवटी म्हणाले.

"आता बसतो. तुम्ही मागच्या मालिकेचं वर्णन केलं तेव्हाच मला समजलं की तुम्ही वेगळ्या श्रेणीतले आहात. नाहीतर समर्थ असल्या साध्या जाळ्यात कधीच सापडणार नाहीत. समर्थ! काय माणूस!" समोर समर्थ उभे होते. त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत तो गृहस्थ हे विचित्र शब्द बोलत होता. समर्थांच्या चेहऱ्यावर एक अस्पष्ट हास्य आले.

"आपल्या कोठल्यातरी प्रयोगात आमच्याकडून व्यत्यय आला आहे हे मला दिसतं. त्याबद्दल मी आपली माफी मागतो. मांत्रिकमंडळाचा तुम्हाला संशय का आला?"

"आमच्या प्रयोगांवर ते नाराज आहेत. अवकाशाची मर्यादा संकुचित करून संदेशनाचा वेग वाढवण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत."

"याला त्यांचा विरोध का असावा?"

"त्यांना दूरविचाराची कला अवगत आहे, त्यांना या कृत्रिम साधनांची आवश्यकता पटत नाही. सर्वसामान्य मानवांचा संपर्क अतिदूर अंतरावर 'पसरावा यासाठी आमची खटपट आहे."

"तरीही त्यांचा विरोध कशासाठी हे समजत नाही."

"आमच्या प्रयोगनलिकांत अवकाशाचे गुणधर्म बदलतात. व्यूहभेदकांचा ते तिरस्कार करतात. विकृत अवकाशात श्रेणी बदलण्याची शक्यता आहे असे त्यांचे मत आहे-हं! निर्बुद्ध लोक!"

"पण ते आपली नाराजी कायद्याने अधिकृत करू शकत नाहीत."

"सुदैवाने त्याची सत्ता इतकी निरंकुश नाही. त्यांच्याविरुद्ध समर्थ उभे आहेत आणि न्यायाला आशा आहे."

"पण तुम्ही मला फारशी किंमत देत नाही! "समर्थ हसत म्हणाले.

"तुम्ही खरे समर्थ नाही आहात. आमच्या सृष्टीपटावरून सरकत जाणारा एक प्रेक्षक आहात. हवेतून जाणाऱ्या ढगाच्या सावलीसारखे. "

"पण मांत्रिक मंडळाला व्यूहभेदकांचा धोका वाटतो."

“तो माझा प्रांत नाही. आमच्या प्रयोगात तसं काही होणार नाही एवढंच माझं मत होतं. पण तेही आता बदललं आहे आणि तुमच्या आगमनाची वार्ता एव्हाना मांत्रिकमंडळापर्यंत पोचलेली असणारच....”
“अगदी बरोबर-” एक उद्धट आवाज मागच्या बाजूने आला. प्रत्येक शब्दात गर्व आणि धमकी होती. आवाज येताच समर्थ एकदम ताठ झाले होते. कोणतीही घाईची हालचाल न करता ते सावकाश मागे वळले आणि मीही वळलो. लाल-काळ्या गणवेशातला एक उंच मनुष्य नलिकेच्या मुखापाशीच उभा होता. हातातलं हत्यार नेमकं समर्थावर रोखलेलं होतं. उद्दाम, नजर आम्हा तिघांवरून फिरत होती.
“शेवटी तुमची घटिका आली, समर्थ. “तो म्हणाला आणि त्याने हत्याराचा चाप दाबला. त्या क्षणार्धात मनात किती जलद विचार येऊन गेले! हा आमचा शेवटचा क्षण, मला वाटलं. इतरांना जरी आम्ही प्रक्षेपांसारखे वाटत असलो तरी आमच्यापुरतं प्रत्येक क्षणिक जग खरं होतं. त्या वेळेपुरते जड वास्तवाचे नियम आम्हालाही बंधनकारक होते. धारदार अस्त्र किंवा स्फोटक रसायन आमचा नाश सहजपणे करू शकणार होते. समर्थ आणि त्यांचे उदात्त जीवन...संपले सारे काही!
पण आसपास दुसरंच काहीतरी होत होतं. त्या उद्दाम माणसाच्या शस्त्रातून एक प्रखर प्रकाशशलाका निघाली खरी...पण ती समर्थापर्यंत येऊन पोचण्यापूर्वीच गडप झाली.. एक क्षणार्ध मनात कोलाहल माजला. मनाला भोवंड आल्यासारखं झालं. आणि पुढच्याच क्षणी तो शस्त्रधारी माणूस एका प्रखर तेजाने लखाखणाऱ्या गर्तेत नाहीसा झाला.. वास्तविक हे सर्व अल्प वेळात होऊनही गेलं असलं पाहिजे. डोळ्यांच्या पटलांवर त्या प्रतिमा मागाहून बराच वेळ रेंगाळत राहिल्या होत्या आणि त्यामुळे त्या घटनांना एक फसवा मंदपणा आल्यासारखा वाटत होता. आता खोलीत आम्ही तिघेच उरलो होतो.
त्या वृद्ध संशोधकाच्या वागणुकीत एकदम बदल झाला होता. आता तो जेव्हा आमच्याकडे वळला तेव्हा तो समर्थाकडे खूपच आदराने पहात होता.
‘‘मी माझी ओळख करून देतो. “तो अगदी नम्र, विनयशील आवाजात म्हणाला. “मी प्राध्यापक कर्ताम आहे. आपण समर्थ. हे कोण?”
“हा अप्पा, माझा सहकारी.” समर्थ हसत म्हणाले.
“आताच मी एका विलक्षण शक्तीचे प्रदर्शन पाहिले. आपण काय केलेत ते सांगू शकाल काय? “कर्ताम विचारत होता.
“आम्ही व्यूह छेदताना मधली एक पातळी गाळली होती. कारण तिथ अनर्थ आहे. पृथ्वीचा स्फोट होऊन गेलेला आहे. मुक्त शक्तीकणांचा अनिबंध संचार चालला आहे. या नतद्रष्ट माणसाचा संबंध मी त्या पातळीशी जोडला.”

“आणि तो त्या प्रचंड उद्रेकात खेचला गेला?” काम मोठ्या समाधानाने म्हणाला, “उत्तम! उत्तम! फारच नामी योजना!”
“पण आमचा शोध अजून पुरा झाला नाही. “समर्थांनी कामला आजवरची हकीगत अगदी थोडक्यात सांगितली.” मांत्रिकमंडळाला सर्वस्वी अनुकूल अशा पातळीत मेनका दडवून ठेवलेली असणार. त्या पातळीचा शोध आम्ही घेत आहोत. तुम्ही आमच्या बरोबर येऊ शकाल?”
कर्तामची मान ठामपणे नकारार्थी हलली. “असल्या साहसांचं माझं वय राहिलेलं नाही. पण पुढच्या प्रवासाला मी मदत करू शकतो.” त्याच्या चेहऱ्यावर एक मिस्किल हास्य उमटलं. “मांत्रिकमंडळाच्या शक्तिरेषा कोठून कशा जातात हे माझ्या संशोधनानं मला अनाहूतपणे समजलं आहे. ती शक्ती तुम्हाला वापरता येईल अशी मी व्यवस्था करू शकेन.”
“आपले मोठेच उपकार होतील. एक प्रश्न विचारू?”
“अवश्य.”
“हे वर्ष कोणते आहे?”
“वर्ष -? ओ हो! सन चार हजार पाचशे वीस!”
“दोन हजार वर्षांची मजल!” समर्थ आश्चर्याने म्हणाले.
“छेदरेषा तिरकस असली पाहिजे” कर्ताम म्हणाला.
“हो, पण केवढा उतार!”
कर्ताम आणि समर्थ कशासंबंधी बोलत होते याचा मला अजिबात उलगडा होत नव्हता. आणि ही स्पष्टीकरणाची वेळही नव्हती. कर्तामच्या खुणेसरशी आम्ही परत एकदा त्या पोलादी चौथऱ्यावर उभे राहिलो, आतापर्यंत इतर दृश्ये जशी विरघळली तसेच हेही विरघळणार होते. सेहेचाळीसाव्या शतकातला संशोधक कर्ताम! किंवा मागच्या श्रेणीतले विचारशील यंत्र! माणसाच्या स्वभावात फारसा फरक पडत नाही, मला वाटलं, सहानुभूती आणि शत्रुत्व माणसाची सोबत ते शेवटपर्यंत करणार आहेत . . कर्तामचा हात नियंत्रक गोलकांकडे गेला ...
सहावी पायरी...
माझ्या आसपास काही नव्हतं. प्रकाश तर नव्हताच, पण काळोखही नव्हता. काळोखात अभावाने प्रकाशाची कल्पना असते. येथे काहीही नव्हते. काळसुद्धा नव्हता. या रितेपणाचे वर्णन करायला कोणत्याही भाषेत शब्दच नाहीत. अगदी ताऱ्यांमधल्या पोकळीतही माणून विश्वाच्या प्रचंड स्पदंनापासून अलिप्त राहू शकत नाही. इथे फक्त रिता अवकाश होता.

मनात विलक्षण वैफल्य आले. कर्तामचा प्रयोग चुकला असावा, किंवा हसत हसत त्याने आमचा विश्वासघात केला असेल त्याच्या त्या यंत्राने आम्ही घटनाव्यूहातून दूर कोठे तरी भिरकावले गेले असू ज्या श्रेणीत विश्वाची निर्मिती हीच एक असंभाव्यता होती. काहीही नाही.
या अवस्थेत मी किती वेळ होतो कोणास ठाऊक. पण मला एक चमत्कारिक संवेदना जाणवत होती. भोवळ आल्यासारखी. स्वतःभोवती खूप गिरक्या घेतल्या की जसं वाटतं तसं. याचा अर्थ आतले सर्व अवयव निष्क्रीय झाले नव्हते. कानातल्या आतल्या भागातले द्रव माझा तोल राखण्याचा प्रयत्न करीत होते. इतर काही? मी हलकेच हात हलवण्याचा प्रयत्न केला . . . ती हालचालही मनाला जाणवली. याचा अर्थ शरीरातील सर्व अंतरेंद्रिये काम करीत होती. फक्त बाडेंद्रिये तेवढी निष्क्रीय झाली होती. आणि त्यांच्यावर बाहेरच्या गुरुत्वाकर्षणाच्या, कोरीयालीसच्या प्रेरणा कार्य करीत होत्या.
तात्पर्य, मी जिवंत होतो. बाहेरचा रितेपणा हा एक भ्रम होता.
हा नीरव, निरर्थक, निश्चल रितेपणा हा एक भास होता.
आणि यामागे मांत्रिकमंडळच असले पाहिजे. त्यांना हवे असलेले जग असेच असेल. बाह्यसंदर्भाखेरीज अतींद्रीय शक्ती निकामी ठरत होत्या. मांत्रिकमंडळाच्या हुकमतीखाली सर्व असामान्य लोक आले होते. त्यांनी निर्माण केलेल्या या कोशातून सुटका नव्हती.
सुटका नव्हती? समर्थही माझ्याबरोबरं याच जाळ्यात सापडले होते. ते माझ्यासाखे निष्क्रीय बसतील का? ते सुटकेसाठी काही हालचाल करणार नाहीत का? त्या क्षणासाठी मी तयार असले पाहिजे. माझी शक्ती फार नाही, पण विरुद्ध शक्ती समतोल असतील तर एका पारड्यात घातलेली क्षुद्र वस्तूही सर्व चक्र उलटवू शकते. मी तयार रहायला हवं होतं. कदाचित त्यावर आमच्या सर्व कार्याचं यश अवलंबून असणार होतं. एकदा (फार पूर्वी) समर्थ वेगळ्या मितीत गेले असताना माझ्या हातून त्यांना बहुमोल मदत झाली होती. तेव्हा सावधान, तयार रहा, एवढच मी स्वतःशी पुन्हा पुन्हा म्हणत होतो. - दूरवर प्रकाशाचा एक सूक्ष्म ठिपका दिसायला लागला. आधी वाटलं होतं तसा तो शिणलेल्या डोळ्यांना झालेला भास नव्हता. कारण तो मोठा मोठा होत जवळ येत होता. तो प्रकाशाचा ठिपका नव्हता. एक चेहरा होता. अवाढव्य, बीभत्स, सर्व अवकाश व्यापून टाकणारा.
रायसोनींचा चेहरा.
ते प्रचंड ओठ हलले आणि एक निःशब्द आवाज माझ्याभोवती घुमला.
“मूर्ख समर्थ आणि त्याचा लुडबुड्या मित्र! तुमची घटिका भरली!”

तो चेहरा आणखी जवळ आला. डोळेच केवढी जागा व्यापत होते! दृष्टीच्या या कडेपासून त्या कडेपर्यंत तो चेहरा पसरला होता. बुबुळापासून पांढऱ्या कॉर्नियाच्या मैदानावर जाणाऱ्या रेषा रक्ताच्या नद्या वाटत होत्या. प्रचंड जीवघेण्या ...आघातासाठी डोळ्यांत विखार जमा होत होता.

काही क्षणांपुरता मी समर्थांना विसरलो होतो. रायसोनी आणि त्यांचे मांत्रिकमंडळ त्यांच्या मागावर दिसलेली अनेक दृश्ये मला आठवत होती....उध्वस्त झालेले जग आणि घिरट्या घालणारे गिधाड, भयाखाली सतत कापणारी नगरे...सर्व सूर्यमालेची झालेली राख...एक विचारशील, सद्गुणी यंत्र कर्तामसारखा सुस्वभावी संशोधक या मांत्रिकमंडळाच्या उपद्यापाने सर्वत्र अनाचार, हालअपेष्टा पसरत होती सर्व दुःखाचे कारण, पापाचे धनी तेच होते...आता मला त्यानी एका अंधार कोषात जखडलं होतंआणि रायसोनींचा चेहरा त्या पडद्यामागून डोकावत होता....

आजवर कोणाचा आला नसेल इतका त्याचा मला संताप आला, त्यांना शक्य असतं तर त्यांनी आम्हाला किड्यासारखं चिरडून टाकलं असतं. मलाही त्यांच्याशी वेगळं वर्तन करण्याची इच्छा नव्हती. मनातली होती नव्हती ती सर्व शक्ती एकवटून मी रायसोनींच्या दिशेने ती भिरकावली. ...

वर्मी घाव बसल्यासारखा तो अजस्त्र चेहरा वेदनेने विकृत झाला. मागे मागे । सरकत खूप लांबवर गेला. पुन्हा एक प्रकाशित ठिपका झाला.

“उत्तम! उत्तम! शाबास, अप्पा! त्याला काही सेकंद तिथेच थोपवून धर! काही सेकंद फक्त!” समर्थांचा आवाज आला.

रायसोनींची लहानशी ठिणगी मालवली जात नव्हती. त्या ठिणगीभोवती रायसोनींचा प्रचंड काळा विस्तार होता. मनाच्या आताच्या उत्तेजित अवस्थेत मला जाणवलं की ते कोणत्यातरी अकल्पनीय प्रहारासाठी स्वतःची शक्ती एकवटत आहेत. ..

आसपासचा अंधार हिंदकळत होता. त्या दूरवरच्या ठिपक्याभोवती आणि माझ्याभोवती कसलातरी भयंकर उत्पात उसळत होता. स्थळकाळपटाचे आदिवस्त्र ज्या धाग्याने विणले आहे तेच ताणले जात होते. सर्व विश्वपटच उलटापालटा होऊ पहात होता.

आणि या अदृश्य वावटळीतून रायसोनींचा चेहरा पुन्हा एकदा जवळ येत होता, मोठा होत होता. दूरवरची ही ठिणगी आता एखाद्या सूर्यासारखी प्रकाशत होती. त्या विश्वात तोच तेवढा प्रकाश होता, आणि त्याच्यापासून मृत्यूचा उत्सर्ग होत होता. प्रलयाच्या तिसऱ्या अवस्थेत शंकराचा नेत्र असाच मृत्यू ओकत असेल. ..

रायसोनींचा चेहरा जवळ आला, आणखी जवळ आला.

आणि एकाएकी नाहीसा झाला.

मागून कोठून तरी विजेच्या तलवारीसारखा एक तप्त निळा प्रकाश झगागला होता. अंधारपटलाला त्याने वेडेवाकडे तडे गेले होते. त्या प्रकशाविरुद्ध रायसोनींची प्रचंड काळी छायाकृती रेखाटली होती. तडे वाढले, त्यांच्या प्रकाश आत आला ... रायसोनींचे उरलेले शरीर आता त्या प्रकाशाविरुद्ध स्पष्ट होऊ लागले. मग अंधाराचे उरलेले तुकडे विरघळून गेले. त्याची जागा प्रकाशाने घेतली,

अनेक दृश्ये माझ्या नजरेबर एकदम येऊन आघात करीत होती.

आम्ही एका लहानशा खोलीत होतो, खोलीच्या एका कोपऱ्यात एक भयभीत तरुणी उभी होती... ही मेनका! मी मनाशी विचार केला. तिच्यापाशी रायसोनी उमे होते. पिंजऱ्यात सापडलेल्या पशूसारखे ... एका बाजूला समर्थ उमे होते, दोन्ही हात वर करून ...

रायसोनी घायाळ झाले होते, पण अजून जिद्दीने ताठ उमे होते. त्यांनी स्वतःला सावरले आणि माझ्या दिशेने एक एक पाऊल टाकायला सुरुवात केली. पाऊल मोठ्या कष्टानं पडत होतं, पण ते पुढे येत होते.

पावलापावलागणिक सृष्टीला हेलकावे बसत होते. समोरचं चित्र झाकळून जात होतं, मालिका बदलत होती आणि वेगवेगळे देखावे अस्पष्टपणे उमटत होते. माझ्या मनाचा कोंडमारा होऊ लागला. रायसोनींच्या पिसाट शक्तीपुढे माझा क्षणभरही निभाव लागणार नव्हता. असहायपणे मी मदतीसाठी समर्थांकडे वळलो.

आणि मला एक अपूर्व देखावा दिसला.

समर्थ एकटे नव्हते. किंबहुना एकत्र आले होते. घटना कोणत्याही मार्गाने घडल्या तरी त्यात समर्थांना अवश्य स्थान होते, आता असं दिसलं की प्रत्येक मालिकेतील समर्थ (किंवा संपूर्ण समर्थांचा अंश) अलग होऊन बाहेर येत आहेत. समर्थांच्या मदतीला एकामागून एक असे ते ओळीने येत होते त्यांच्या शरीरात सामावले जात होते. आधीच प्रखर आणि तेजस्वी असलेली त्यांची मुद्रा आता तर एक प्रकारच्या आंतरिक अमीने प्रज्वलित झाल्यासारखी वाटत होती... आणि त्या प्रतिमा येतच होत्या ...

रायसोनी पावलापावलाने माझ्या दिशेने येत होते. कदाचित त्यांनी हेही हेरलं असेल की आमच्या शृंखलेतला मी कमजोर दुवा होतो; म्हणूनही ते माझा नाश करण्यासाठी उद्युक्त झाले असतील...

ते माझ्यापर्यंत पोचले आणि समर्थांचा आवाज आला.

“ही तुझी मर्यादा, रायसोनी. जे तू आमच्यासाठी मनात योजलं होतंस ते आता स्वतःच भोग ...!”

सर्व अंश एकत्र येऊन परिपूर्ण झालेल्या समर्थांनी आता पहिलाच, एकच आणि शेवटचा प्रहार केला. डोळ्यांना तो तप्त नीलप्रकाशकणासारखा वाटला, कानांना कडकडल्यासारखा वाटला, पायांना तो भूकंपासारखा वाटला. सर्व इंद्रिये कल्लोळ करून उठली ... वास्तविक, पाचही इंद्रिये!

एक क्षणभर रायसोनी स्वस्थ उमे राहिले ...

मग माझा माझ्या डोळ्यांवरचा विश्वासच उडाला. ज्या ठिकाणी रायसोनींची एक प्रतिमा दिसत होती तिथे दोन झाल्या; दोनाच्या चार झाल्या; चाराच्या आठ झाल्या... प्रत्येक पहिल्यापेक्षा जराशी अस्पष्ट आठाच्या सोळांच्या बत्तीसच्या चौसष्टच्या एकशेअठावीस ...

त्यांच्यातला घनपणा केव्हाच निघून गेला होता. आता ते एकावर एक ठेवलेल्या असंख्य फोटो निगेटिव्हसारखे दिसत होते, पण तीही स्पष्टता काही वेळात कमी झाली त्यांच्यातली एकएक अत्यंत पातळ प्रतिमा सरकून दूर होत होती आणि हवेत विरवळत होती ... काही वेळानंतर तिथे काही राहिले नाही. ती जागा रिकामी होती..

समर्थांचे हात सावकाश खाली आले. त्यांचा चेहरा थकलेला दिसत होता. ते सावकाश त्या भेदरलेल्या तरुणीकडे वळले.

“तू मेनका, हो ना?” ते म्हणाले, “चल. तुझ्यासाठीच आम्हाला एवढी यातायात करावी लागली.”

समर्थ खोलीच्या दाराकडे वळले. ते, त्यांच्यामागोमाग मेनका आणि शेवटी मी असे त्या जिन्याने खाली आलो कपाटाच्या दारापाशी. ज्या सहा पायऱ्या चढायला आम्हाला अनेक अकल्पनीय प्रसंगांतून जावं लागलं त्या उतरताना सहा पावलं पुरली. मला हा प्रकार समजला नव्हता, पण प्रश्न विचारीत बसण्याची ही वेळ नव्हती. कपाटातून खाली उतरताना मी शेवटची एक नजर त्या जिन्याकडे टाकली– पण आता तो एक साधा, निरुपद्रवी, नागमोडी जिना होता. -

खोलीचं मोडलेलं दार तसंच एका बिजागरीवर दारुड्यासारखं लोंबकळत होतं. बाहेरचा बोळ रिकामा होता. अजून बाहेर अंधार होता. आम्ही त्या चमत्कारिक जिन्यावर पाय ठेवल्याला किती वेळ झाला होता याची काहीच कल्पना करता येत नव्हती.

खोलीतून बाहेर आलो. कोणाचीही चाहूल लागत नव्हती. ही शांतता किंवा सामसूम मात्र अनैसर्गिक वाटत होती. समर्थ वळले. तिकडे रायसोनींची खोली होती. त्या खोलीचं दार त्यांनी सावकाश उघडलं आणि आतून एक खूप मोठा, परिचित आवाज आला.

“या, समर्थ या! तुमच्यासाठीच मी इथं थांबलो आहे!”

केशवराव कोरदंड!
आम्ही तिघे आत गेलो. रायसोनींच्या प्रशस्त टेबलामागे केशवराव आरामात बसले होते. एखादा मोठा उंदीर मटकावलेल्या बोक्यासारखा त्यांचा चेहरा आत्मसंतुष्ट दिसत होता. आणि त्याचं कारणही समोर होते. रायसोनींच्या दोन प्रचंड आलमाऱ्या उघड्या होत्या.
"केशवराव?! तुम्ही इथे कसे?" समर्थ जरा आश्चर्याने म्हणाले.
"काल रात्री तुम्ही या बंगल्यात येणार ही माझी खानी होती." केशवराव म्हणाले, "तुम्ही आणि अप्पा आत गेलात त्या क्षणापासून माझं बंगल्यावर लक्ष होतंच. आतून पिस्तुलाचे बार ऐकू येताच आम्ही आत प्रवेश केला. आतल्या लोकांच्या हालचाली संशयास्पद होत्या. दोघा-तिघांनी पळून जायचाही प्रयत्न केला. त्या सर्व मंडळींना खालच्या एका खोलीत डांबून ठेवलेलं आहे. तुमचा शोध घेण्याच्या निमित्ताने मी सर्व खोल्यांची तपासणी केली. तुमची काळजी घ्यायला तुम्ही समर्थ आहात हे मला माहीत होतंपण ते निमित्त मला पुरेसं होतं. आणि आमज्या हाती इतका विलक्षण पुरावा लागला आहे की त्या रायसोनींवर एक सोडून दहा खटले भरता येतील."
"रायसोनी परत येत नाहीत. "समर्थ म्हणाले.
"परत येत नाहीत? आणि या कोण? "केशवराव म्हणाले, "थांबा! सांगू नका! या मेनकाबाई! हा प्रकार आहे तरी काय?"
"सगळंच गुंतागुंतीच आहे, केशवराव. आतापुरता मेनकेचा प्रश्न मिटला आहे. श्रीरंगवरचे सर्व आरोप काढून टाकायला हरकत नाही. रायसोनी कायद्याच्या भीतीने बेपत्ता झाला आहे अशी नोंद करा. तो परत येत नाही. काही दिवसांतच मेनका आणि श्रीरंग यांचा विवाह होईल आणि आमचे केशवराव कोरदंड एक पायरी वर चढतील. कारण त्यांनी एका महाभयंकर गुन्हेगारी कारस्थानाचा बीमोड केला आहे."
"समर्थ, तुमची थट्टा जरा बाजूला ठेवा-" केशवराव उठत म्हणाले, "खरा प्रकार काहीतरी वेगळाच आहे."
"तो आपल्या खाजगी बैठकीत केव्हातरी सांगेन." समर्थ एका खुर्चीत बसत म्हणाले, "आधी कॉफीची सोय करा पाहू-"
रायसोनींच्या तिजोरीतील कागदपत्रांवरून आणि बंगल्यात हाती लागलेल्या लोकांच्या साक्षीवरून रायसोनींच्या गुप्त आणि भयानक हालचालींवर भरपूर प्रकाश पडत होता. समाजकंटक आणि सराईत गुन्हेगारांची त्यांनी एक भक्कम संघटना बनवली होती. हेरगिरी, बनावट नोटा, शस्त्रांची चोरटी आयात, राष्ट्रद्रोह-कोगताही

गुन्हा घ्या-रायसोनी त्यात अगदी गळ्यापर्यंत बुडले होते. पण या अजब संघटनेचा हेतू काही केल्या उघड झाला नाही. निदान सर्वसामान्य लोकांना तरी नाही.

''अतिमानवी किंवा असामान्य शक्ती असलेले लोक अधूनमधून जन्माला येत असतात. पूर्वी यांतले कितीतरी आपल्याला भेटलेच आहेत. "समर्थ म्हणाले. केशवराव, मी, श्रीरंग आणि मेनका असे सर्वजण एका संध्याकाळी हॉलमधे जमलो होतो. "विश्वाची रचना, त्याचे कार्य यासंबंधात त्यांना एक प्रकारची अंर्तदृष्टी असते. ज्या साध्या गोष्टी शोधून काढायला तत्त्वज्ञांना वर्षानुवर्षे लागतात त्या यांना अनुभवाने माहिती होतात. भविष्यकथनावर बुद्धिवादी माणूस विश्वास ठेवणार नाही; कारण भविष्यातील सर्व घटना जर आधीच निश्चित झालेल्या असतील तर मग त्याच्या इच्छास्वातंत्र्याला वाव तरी कोठे राहतो? याउलट अशी काही उदाहरणे आहेत की ज्या ठिकाणी भविष्यातल्या घटना अचूक वर्तवल्या गेल्या होत्या. भविष्यकथनासाठी साधन कोणते वापरले जाते हा प्रश्न गौण आहे. कोणी पत्रिका पाहतो, कोणी हस्तरेषा पाहतो, कोणी काचेच्या स्फटिकात पाहतो, कोणी नुसतेच डोळे मिटून ध्यानस्थ बसतो. महत्त्वाचा मुद्दा हा आहे की योगायोगाने, अपघाताने, अशी एखादी वेळ येते की त्याला भविष्य स्पष्ट दिसते. काळाचा टप्पा ओलांडून पुढच्या काही घटनांशी संपर्क साधणे ही एक असामान्य अतिमानवी शक्ती आहे. काहींना ती जन्मजात, कोणत्याही साधने-उपासनेशिवाय उपलब्ध झालेली असते. आणि तत्त्वज्ञांना हजारो वर्षे चिंतन करून ज्याचा उलगडा होत नाही, ते रहस्य यांना अनुभवाने व अवलोकनाने उलगडते.

"भविष्यकाल हा एक, एकमार्गी, ठराविक असा नाही. प्रत्येक प्रसंगापासून जे वेगवेगळे पर्याय निघतात, त्यांच्यापासून एक एक स्वतंत्र, अलग, शक्यतेत येऊ शकणारी अशी एक घटनामालिका असते. या असंख्य पर्यायांत निवड करण्याचे स्वातंत्र्य माणसाला असते. या मालिकांमध्ये मूलगामी फरक कोणता आहे? कपाटातला जिना पहाताच मला अशी शंका आली होती की रायसोनींनी त्या ठिकाणी मुख्य घटनाप्रवाहाचे विघटन केलेले आहे. विघटन अनेक तत्त्वांनुसार करता येते. काळानुसार करणे हा एक प्रकार आहे. पण हे कळण्याआधी मला वास्तवशास्त्रतील एका नामांकित प्राध्यापकांची मदत घ्यावी लागली. त्यांना कल्पनाही नाही की ज्या गोष्टी ते मला केवळ गणिती अंदाज किंवा सूत्रे म्हणून सांगत होते त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात असा अनपेक्षित उपयोग केला गेला होता."

"डनेची कल्पना मी आधी सांगितलीच आहे. प्रत्येक घटनेमागे तो एक सीरीज् ची कल्पना करतो. या अनंत पटलामधला भेद मला हायजेनबर्गच्या अनिश्चितता

तत्त्वाच्या सूत्रात सापडला. त्या सूत्राचा मुख्य भाग असा आहे “समर्थांनी एक कागदावर काही अक्षरे त्या क्रमाने लिहिली.
“जरा क्लिष्ट भाग आहे, पण त्याचा मतितार्थ समजूत घ्या.” समर्थ म्हणाले, “समीकरणात डाव्या हाताला पी आणि क्यू येतात. 'पी' हा या कणाचा मोमेंटम किंवा संवेग आहे; 'क्यू' हा जनरल कोऑर्डिनेट किंवा निबंधक आहे; 'एच' हा प्लॅंकचा स्थिरांक आहे; 'पाय' ही एक साधी संख्या आहे आणि ' आय् ' हा उणे एकचा वर्गमूळ आहे. ही क्रिया व्युत्क्रमी नाही आणि उजवी बाजूच महत्त्वाची आहे. त्यात 'पाय' आणि 'आय् ' हे निव्वळ अंक आहेत. 'एचू ' हा वास्तवशास्त्रातला एक महत्त्वाचा स्थिरांक गणला जातो. विश्वात सर्वत्र संचार करणाऱ्या क्वाँटम या या शक्तिकणांचा तो आवश्यक आणि महत्त्वाचा घटक आहे. शक्तिसंचयाला कंपनानं भाग दिला की एच येतो. आणि त्याची किंमत अतिसूक्ष्म आहे. पण त्याच्या व्याख्येतच काल येतो. प्रतिसेकंदास इतके अर्ग अशी त्याची व्याख्या आहे. या 'एच' मधे जरी थोडासाच बदल झाला तरी सर्व विश्वाची शक्ति-पातळीच बदलेल! या बदलांचाच रायसोनींनी वापर केला होता आणि नेहमी एकसंघ वाटगाऱ्या घटना वेगवेगळ्या पातळीवर पसरविल्या होत्या. एकावर एक रचलेल्या पातळ पट्ट्या वरून किंचित सरकवल्या होत्या-
“आपले जग हे अशा अनेक जगांचे मिळून बनलेले आहे. त्यातल्याच काही शक्यता रायसोनींनी वेगळ्या काढल्या होत्या. एकापेक्षा दुसरीची शक्तिपातळी वेगळी होती. ‘एच’ बदलला की काळही बदलतो. आपण दरवेळी जास्त जास्त काल ओलांडून एका नव्या जगात प्रवेश करीत होतो. पण चौकट तीच होती, पात्रेही तीच होती- म्हणून आपल्याच प्रतिकृती सर्वत्र वावरत होत्या. रायसोनी तर सर्वत्र होतेच, त्यांचं ते मांत्रिकमंडळही होतं, केशवरावही होते आणि अर्थात् मीही होतो. पुढच्या कोणत्या भविष्यकाळात यापैकी एखादे जग अस्तित्वात येईलच याची शाश्वती नाही, पण अनेक शक्यतांपैकी या काही आपण पाहिल्या. काळात जो दोन हजार वर्षांचा फरक पडला होता त्यालाच उद्देशून मी व कर्ताम बोलत होतो. जो क्षण आपल्याला 'आता' वाटतो, तोच क्षण त्या ठिकाणी दोन हजार वर्षानंतरचा होता. ‘एच’,- प्लँकचा स्थिरांक बदलायला लागला की त्याला हा काल येतो. त्या अक्षावरून आपण चाललो होतो.
“आपल्याला भेटलेले लोक आपण आणि अनुभवलेल्या घटना या संपूर्ण ख-या नाहीत, पण संपूर्ण खोट्याही नाहीत. त्यांच्यातली सत्यता अंशात्मक आहे. सर्व घटनाप्रवाह एकत्र झाले की पूर्ण सत्य जग साकार होते. माणसे काही वेळा भ्रमिष्टासारखी वागतात, आपण त्यांना वेडे म्हणतो. असंही शक्य आहे की काही

कारणाने त्याची सत्यसृष्टीवरची पकड ढिली होते, जाणीव किंवा अस्मिता ही मुख्य प्रवाहावरून घसरते आणि एखाद्या समांतर जगात वावरू लागते. त्याच्यासाठी ते जग, ते अनुभव हे संपूर्ण खरे असतात. प्रसंगी तो प्राणही गमवायला तयार असतो, पण आपल्या अनुभवावरचा विश्वास गमवायला तयार नसतो.

"घटनाप्रवाहातले हे अंश किंवा घटक दूर केल्यावर मग रायसोनींनी त्यातला स्वतःला सर्वात सोयीस्कर असा प्रवाह निवडला. त्यांच्या त्या जगात मांत्रिकमंडळ सत्तेवर आहे. आपण ज्या एका अंधाऱ्या कोषात सापडलो होतो त्यात ते कोणालाही जखडून ठेवू शकतात. ज्यांनी त्यांची मर्जी संपादन केली आहे अशांनाच बाह्य जग अनुभवायचे स्वातंत्र्य. इतरांच्या जीवनाला काही अर्थच नाही; स्थळकाळाचा पट दृष्टीआड झाला की माणसाच्या सर्व शक्ती निरुपयोगी ठरतात. कारण तरफेला काम करायला जसा कोणता तरी एक भक्कम टेकू आवश्यक आहे तसा माणसाच्या बुद्धीला, इतकंच नाही अतिंद्रीय शक्तीनासुद्धा बाह्य जगाचा संदर्भ आवश्यक आहे. त्याच्या आधारावरच माणूस प्रयत्नशील आणि कार्यान्वित होतो. येथे तोच आधार काढून माणसाला हतबल करून टाकले होते. "

समर्थांचा आवाज गंभीर झाला.

"अप्पा, तेथे आपल्याला विलक्षण धोका होता. अशा अर्थी की, जर रायसोनी मूर्खपणाने ढवळाढवळ करायला आले नसते तर आपण दोघेही त्या कोशात आयुष्याच्या अंतांपर्यंत खितपत पडलो असतो. एकमेकांशी आणि बाह्यजगाशी आपला कोणताही संपर्क राहिला नव्हता. पण शेवटी त्यांचा मूर्खपणाच त्यांच्या अधःपाताला कारणीभूत झाला. आपल्याला तेवढी एकच संधी हवी होती आणि ती सुदैवाने मिळाली.

"हा आपल्या शोधाचा शेवट होता. मेनका येथेच कोठेतरी असली पाहिजे ही माझी खात्री होती. संधी मिळताच आक्रमक पवित्रा घ्यायचे मी ठरवले होते. समर्थांचा मागोवा आपल्याला प्रत्येक पातळीवर लागला होता. चांगले आणि वाईट यांतला हा संघर्ष सर्व वेळी चालला होता. मांत्रिक मंडळाशी समर्थांचा झगडा प्रत्येक पातळीवर चालला होता. काही ठिकाणी ते हरले होते, काही ठिकाणी डावाची बरोबर झाली होती, पण समर्थः सर्वत्र होते.

"आणि आता मी माझे शस्त्र वापरले. जी गोष्ट एक मनुष्य करू शकतो तीच दुसराही करू शकतो. रायसोनींनी घटनांचा डाव विस्कळित केला होता, तो मी एकत्र केला. मी, समर्थ, माझ्या सर्व प्रतिकृती एकत्रित करीत होतो. सर्व काळांतून आणि सर्व स्थळांवरून ते तिथे आले. घटनेच्या एका चौकटीत आम्ही सर्व एकत्रित झालो होतो. याउलट रायसोनी एका अंशमय अवस्थेत होता; कारण त्याने एक अंशमय जग

साकार केले होते. माझ्यात जमा झालेली मानसिक शक्ति अकल्पनीय होती. ती रायसोनींवर एकत्रित होताच त्याच्या अक्षरशः चिंधड्या उडाल्या त्यांचाच डाव मी आता त्यांच्यावर उलटविला होता. त्यांच्यापुरते सर्व घटना प्रवाहाचे संपूर्ण विघटन झाले होते. ज्या लक्षावधी शक्यता आहेत त्या त्या प्रत्येक पातळीत त्याचा एकएक अंश विभागला गेला. सर्व -हेच्या जगांतून त्याचा एक एक अंश पसरला आहे. तो आता सर्वत्र आहे, पण एकत्रित असा कोणत्याही घटनाप्रवाहात नाही. त्याच्यापासून निर्माण झालेल्या प्रतिमा पापुद्र्यासारख्या तरल, निरुपद्रवी होत्या. त्यांचा संपूर्ण नाश झाला आहे. कोणत्याही स्थळी आणि कोणत्याही काळी त्याच्यापासून कोणालाही उपद्रव व्हायचा नाही.

“हे सर्व घटनाप्रवाह अलग ठेवणारी शक्ती रायसोनींची होती. त्याच्या मनाचा असा चक्काचूर होताच या अनैसर्गिक विघटनामागचा आधारच काढून घेतल्यासारखा झाला आणि सर्व मालिकांनीच मुख्य प्रवाहात आपापली अंशतः_ स्थाने घेतली. अर्थ एवढाच की आपण दोघे परत एकदा रोजच्या जगातआलो. ”

ते मेनकेकडे वळले.

“मेनका, तुझ्या नजरेत मी एक अघोर कृय केले आहे असे तुला वाटेल. तुझ्या जन्मदात्या पित्याचा मी नाश केला आहे. पण हे अगदी आवश्यक आणि अपरिहार्य होते. त्यांच्यापासून आज ना उद्या सर्व जगाला धोका होता.”

मेनकेचा चेहरा थंडच राहिला. ती कडवट आवाजात म्हणाली,

“समर्थ, बाबा आणि मी यांच्यात खऱ्या अर्थाने प्रेम असे कधी नव्हतेच. आणि आता श्रीरंगवर माझ्या निमित्ताने कोणता मोठा गुन्हा रचण्याचे त्यांचे कारस्थान जेव्हा मला समजले तेव्हा तर माझ्या मनात त्यांच्यासंबंधी यत्किंचितही करुणा राहिलेली नाही. समर्थ, तुम्ही नसतात तर काय झालं असतं कल्पनाच करवत नाही!”

मी काहीच बोललो नाही. मला मागचे अनेक प्रसंग आठवत होते. सभर्थाचे दुष्ट शक्तींशी अनेक संघर्ष झाले होते. प्रत्येक वेळी त्यांना एखादी अदृश्य शक्ती सहाय्यासाठी धावून आल्यासारखी वाटली होती. पण आता त्या कोड्याचाही थोडासा उलगडा झाला होता. संपूर्ण नाही; पण थोडासा. अजस्त्र चित्रावरचा पडदा एका कोपऱ्यापाशी जरासा हलला होता आणि आतल्या अकल्पनीय आणि अविश्वसनीय सत्याची एक थरारक कल्पना आली होती.

हेही काही अल्प समाधान नाही!

□□□